ISSN 2320 – 0197

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका
(Included in UGC CARE List Group -1)

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४५
(जानेवारी-जून २०२३ / खंड १५, अंक १)

- भांडवलशाही व्यवस्थेतील अस्थिरता: पर्यायी अर्थशास्त्राची प्रतीक्षा
- महाराष्ट्राचा महिला केन्द्रित अर्थसंकल्प
- वंचितांचे सबलीकरण
- Analytical Note on the Status of Agriculture in the Indian Economy
- भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम
- जागतिक आनंदी निर्देशांक आणि भारत
- नवीन शैक्षणिक धोरण: संधी आणि आव्हाने
- भारताचा अर्थसंकल्प २०२३-२४
- यवतमाळ जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याचे स्वरूप: एक पाहणी
- २१ शतकातील मौद्रिक धोरण: संदर्भ बेन बर्नान्के यांच्या पुस्तकाचा
- ग्रंथ परिचय - भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे: सिंहावलोकन आर्थिक बदलांचे

********************************* ISSN 2320-0197 **

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेची
तज्ज्ञ परीक्षित संशोधन पत्रिका

(Included in UGC CARE List Group-1)

अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९४५
(जानेवारी – जून २०२३ / खंड १५, अंक १)

☐ मुख्य संपादक ☐
धीरज सु. कदम

☐ संपादक मंडळ ☐
श्रीनिवास खांदेवाले
दि. व्यं. जहागिरदार
प्रतिभा काळमेघ
सुनील शिंदे
आशिष महातळे

☐ संपादकीय पत्रव्यवहार ☐
धीरज सु. कदम
फ्लॅट नं - २०१, श्रीकृपा हाईट्स,
बजरंग किराणा जवळ, मानवसेवा नगर,
सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६ मो. नं.
९९२२२८१५४१
इमेल : dhiraj.kadam@gmail.com

अनुक्रमणिका

- भांडवलशाही व्यवस्थेतील अस्थिरता: पर्यायी अर्थशास्त्राची प्रतीक्षा
  - श्रीनिवास खांदेवाले ………………१
- महाराष्ट्राचा महिला केन्द्रित अर्थसंकल्प
  - अंजली कुलकर्णी …………………९
- वंचितांचे सबलीकरण
  - रमेश एल. बिडवई……………………२१
- Analytical Note on the Status of Agriculture in the Indian Economy
  - Sagar S. Kondekar ………………२८
- भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम
  - सिद्धार्थ हरिदास मेश्राम ………………४०
- जागतिक आनंदी निर्देशांक आणि भारत
  - समित माहोरे …………………………५१
- नवीन शैक्षणिक धोरण: संधी आणि आव्हाने
  - मृणालिनी तापस…………………६३
- भारताचा अर्थसंकल्प २०२३-२४
  - प्रशांत हरमकर……………………७२
- यवतमाळ जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याचे स्वरूप: एक पाहणी
  - धीरज सु. कदम ……………………८७
- २१ शतकातील मौद्रिक धोरण: संदर्भ बेन बर्नान्के यांच्या पुस्तकाचा
  - एच. ए. हुद्दा …………………९५

ग्रंथ परिचय

- भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे: सिंहावलोकन आर्थिक बदलांचे
  संपादक : दि. व्यं. जहागिरदार
  - वनिता चोरे ……………………११४

विदर्भ अर्थशास्त्र परिषद कार्यकारिणी
(२०२३-२४)

☐ **कार्याध्यक्ष**
डॉ. एच. ए. हुद्दा

☐ **अध्यक्ष**
डॉ. करमसिंग राजपूत

☐ **उपाध्यक्ष**
डॉ. राजू श्रीरामे

☐ **सचिव**
डॉ. संजय कोठारी (अमरावती विभाग परिक्षेत्र)
डॉ. विठ्ठल घिनमिने (नागपूर विभाग परिक्षेत्र)

☐ **प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'**
डॉ. धीरज सु. कदम

☐ **जिल्हानिहाय प्रतिनिधी:**
डॉ. माधुरी लेने (नागपूर शहर)
डॉ. सुनील शिंदे (नागपूर ग्रामीण)
डॉ. विठ्ठल ठावरी (चंद्रपूर)
डॉ. श्रीकृष्ण भुरे (भंडारा)
डॉ. श्रीकृष्ण बोढे (वर्धा)
डॉ. मंगला धोरण (अमरावती)
डॉ. पंकज तायडे (अकोला)
डॉ. हनुमंत भोसले (बुलढाणा)
डॉ. संजय राचलवार (यवतमाळ)
डॉ. गजानन कुबडे (वाशीम)
डॉ. संजय महाजन (गडचिरोली)
डॉ. वर्ष गंगणे (गोंदिया)

☐ **अक्षर जुळवणी व मुद्रक**
आयडियल कॉम्पुटर (महादेव कामतकर)
नागपूर, मो. नं. ९०२१६७४८९१
इमेल : kamatkarmahadeo@gmail.com

आजीव सदस्यता शुल्क : रू. १५०० /- आहे, ही रक्कम सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने, सहयोगी प्राध्यापक, श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जिल्हा वर्धा यांचेकडे "विदर्भ अर्थशास्त्र परिषद" या नावाने डिमांड ड्राफ्टने पाठवावी किंवा डॉ. विठ्ठल घिनमिने यांच्याशी ९६८९६४२४४९ या नंबरवर संपर्क साधावा.

स्वागत मूल्य:
१) परिषद सभासद - १५० रू.
२) शैक्षणिक संस्था – २०० रू.

संपादकीय .....

अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेचा खंड १५, अंक १ (जानेवारी-जून २०२३) हा संपादक म्हणून दुसरा अंक सादर करतांना अत्यंत आनंद होत आहे. विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे माजी व वर्तमान कार्याध्यक्ष आणि अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य या सर्वांची हा अंक सिद्ध करत असतांना मदत झाली; तसेच अर्थमीमांसाच्या संपादक मंडळाने योग्य ते मार्गदर्शन केले आहे. यापूर्वीच्या अंकाचे आपण सर्व सभासद व वाचकांनी केलेले स्वागत व कौतुक माझ्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे, त्याबद्दल मी आपण सर्वांचे आभार व्यक्त करतो. अर्थात याचे खरे श्रेय हे अर्थमीमांसामध्ये अभ्यासपूर्ण लेखन करणाऱ्या सर्वच जेष्ठ तसेच तरुण अभ्यासकांना दिले पाहिजे!

प्रस्तुत अंकात, वेगवेगळया महत्त्वाच्या आर्थिक व सामाजिक विषयांवरील ८ लेख, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या वार्षिक अधिवेशनामध्ये 'आर्थिक ग्रंथातील विचारविश्व' या व्याख्यानमाले अंतर्गत डॉ. एच.ए. हुद्दा यांनी *"21st Century Monetary Policy: The Federal Reserve from The Great Inflation to COVID-19"* या बेन बर्नान्के यांच्या गाजलेल्या पुस्तकावर दिलेल्या भाषणाचा सारांश व एक ग्रंथ परिचय अशा एकूण नऊ साहित्यकृतींचा समावेश आहे.

आज जागतिक पटलावर सर्वदूर भांडवलशाही व्यवस्थेचे अधिराज्य पहावयास मिळते. मानवी कल्याणाचा मार्ग याच व्यवस्थेतून सर्वाधिक सुकर होईल अशी आशा व अपेक्षा जागतिक धोरणकर्त्यांमध्ये दिसून येते. या पार्श्वभूमीवर डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी आपल्या *"भांडवलशाही व्यवस्थेतील अस्थिरता: पर्यायी अर्थशास्त्राची प्रतीक्षा"* या लेखात वर्तमान काळातील महागाई, बेरोजगारी, वाढत्या विषमता आणि सातत्याने उद्भवणारी आर्थिक अरिष्टे या प्रश्नांच्या अनुषंगाने, जागतिक बँकेचे महत्त्वाचे अहवाल तसेच प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ *रॉबर्ट हायेक, स्वान व पीडकॉक* आणि *ॲडम टूझ* यांच्या गाजलेल्या पुस्तकांचा संदर्भ देत; भांडवलशाही व्यवस्थेतील विसंगती, वैगुण्ये व मर्यादांवर बोट ठेवले आहे. या व्यवस्थेला पर्याय म्हणून कालसंगत, संवैधानिक सामाजिक व्यवस्था संकल्पनेचा सैद्धांतिक विकास होणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे .

८ मार्च हा दिवस हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून दर वर्षी साजरा केला जातो त्या निमित्ताने .डॉ. अंजली कुलकर्णी यांनी महाराष्ट्रातील महिलांच्या सबलीकरणासाठी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासनाने केलेले प्रयत्न व त्याची फलश्रुती याचा अभ्यासपूर्ण आढावा आपल्या *"महाराष्ट्राचा महिला केंद्रित अर्थसंकल्प"* या लेखामध्ये घेतला आहे. तर डॉ. रमेश बिडवई यांनी त्यांच्या "वंचितांचे सबलीकरण" या

लेखात वंचितांच्या सक्षमीकरणाचा विचार करत असतांना स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता, या प्रश्नाकडे समानतेच्या दृष्टीकोनातून बघावयास हवे अशी व्यापक भूमिका घेतली आहे. विविध वंचन निर्देशके व तथ्यांच्या आधारे भारतातील वंचितांची स्थिती विषद करून, त्याला उत्तरदायी असणाऱ्या ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक घटकांचा आढावा घेतला आहे, तद्वतच त्यांच्या सबलीकरणासाठी प्रभावी उपाययोजनेची चर्चा करून विश्वाच्या उन्नती आणि प्रगतीसोबत सामान्य उपेक्षितांच्या संघर्षाचा देखील अंत होईल अशी आशा व्यक्त केली आहे.

सागर कोंडेकर यांनी आपल्या *"Analytical Note on the Status of Agriculture in the Indian Economy"* या शीर्षकाच्या शोध निबंधात भारतीय अर्थव्यवस्थेतील प्राधान्य क्षेत्र असलेल्या आणि सर्वाधिक श्रमशक्तीला सामाऊन घेणाऱ्या कृषी क्षेत्राच्या वर्तमान स्थितीचे विवेचन केल आहे. भारतामध्ये गेल्या ७५ वर्षात कृषी आणि ग्रामीण विकासाकरिता जे विविध कार्यक्रम राबविण्यात आले याचा आढाव घेऊन देशाच्या सकल मूल्य वर्धनात (GVA) व वृद्धीदरात कृषी क्षेत्राचा हिस्सा, तसेच महत्त्वपूर्ण पिके, मत्स्य व पशुपालन उत्पादनाची प्रवृत्ती इत्यादी बाबींचे तथ्यात्मक विश्लेषण या निबंधात करण्यात आले आहे. भारतात सध्या किमंत वाढ ही सर्वात गंभीर समस्या ठरते आहे. या संदर्भात सिद्धार्थ मेश्राम यांनी आपल्या शोधनिबंधात भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम याचा चिकित्सक आढावा घेतला आहे.

अलीकडे एखाद्या देशाच्या प्रगतीचे मूल्यमापन करतांना आर्थिक निर्देशकांच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनातील सुख आणि समाधान या अभौतिक घटकांना महत्त्व देत आहेत आणि त्यातूनच आनंद निर्देशांकाच्या संकल्पनेने अल्पकाळातच लोकप्रियता मिळविली आहे. डॉ. समित माहोरे यांनी आपल्या लेखात 'World Happiness Report, 2023'चा संदर्भ घेत; जागतिक आनंदी निर्देशांक, त्याचे निर्धारक, मापन आणि त्यानुषंगाने भारताच्या कामगिरीचे विश्लेषण प्रस्तुत केले आहे.

भारताला *ग्लोबल नॉलेज सुपरपावर* बनविणे या उद्देशाने शासनाने २९ जुलै २०२० ला 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' जाहीर केले. सध्या केंद्र आणि राज्य स्तरावर त्याची जोरात अंमलबजावणी सुरु आहे. त्यानुषंगाने डॉ. मृणालिनी तापस यांनी *"नवीन शैक्षणिक धोरण: संधी आणि आव्हाने"* या शीर्षकाच्या आपल्या लेखात नवीन शैक्षणिक धोरणाचे विविध पैलू आणि बाबींचा उद्बोधक आढावा घेतला आहे. तसेच या धोरणाच्या अनुषंगाने असणाऱ्या संधी आणि त्याच्या अंमलबजावणीतील आव्हानांची अभ्यासपूर्ण चर्चा केली आली आहे. तर डॉ. प्रशांत हरमकर यांनी "भारताचा अर्थसंकल्प २०२३-२४" चे अंतरंग उलगडून

दाखवले आहेत. डॉ. धीरज कदम यांनी आपल्या निबंधात प्रत्यक्ष पाहणीवर आधारित प्राथमिक समंकाच्या सहाय्याने यवतमाळ जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याच्या स्वरूपाचे विश्लेषण केले आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून कौटील्य ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंटर फॉर एकॉनोमिक अँड सोशल स्टडीज, अमरावतीने डॉ. दि. व्यं. जहागिरदार संपादित *"भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे: सिंहावलोकन आर्थिक बदलांचे"* हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्योत्तर 75 वर्षातील आर्थिक बदलांचा समष्टी अर्थशास्त्रीय विश्लेषणात्मक आढावा घेणारे पुस्तक प्रकाशित केले त्याचा परिचय डॉ. वनिता चोरे यांनी करून दिला आहे.

हा अंक सिद्ध करण्यासाठी सर्व लेखकांनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो. सोबतच, अधिकाधिक लेखकांनी आपले अभ्यासपूर्ण लेख अर्थमीमांसेसाठी पाठवावे असे आवाहन करतो. आयडियल कॉम्पुटरचे महादेव कामतकर यांनी मुद्रणाचे कार्य सुबकपणे व वेळेत करून दिल्याबद्दल त्यांचे देखील आभार!

दिनांक : ५ जुलै २०२३

स्थळ : नागपूर

(डॉ. धीरज सु. कदम)

प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'

भांडवलशाही व्यवस्थेतील अस्थिरता: पर्यायी अर्थशास्त्राची प्रतीक्षा

डॉ. श्रीनिवास खांदेवाले
संचालक,
रुईकर इंस्टीट्यूट ऑफ लेबर
अँड सोशिओ कल्चर स्टडीज, नागपूर

प्रस्तुत लेखाला आर्थिक वर्ष 2023-24 ह्यातील प्रकर्षाने जाणविणाऱ्या महागाई; बेरोजगारी; मंद गती विकास दर; वाढत्या उत्पन्न विषमता; कोरोनामुळे प्रतिष्ठानांच्या उत्पादक कार्यांमध्ये आलेला विस्कळीतपणा, रशिया युक्रेन युद्धामुळे जगाला रशियातून होणारा तेल पुरवठा, आणि युक्रेन मधून युरोपीय राष्ट्रांना होणारा कृषी उत्पादनाचा पुरवठा प्रभावीत झाल्यामुळे वाढलेली जागतिक महागाई, ह्या प्रश्नांचा संदर्भ आहे. यातील काही प्रश्न तात्कालिक, काही प्रश्न दीर्घकाळ चालत आलेले, काही विशिष्ट भौगोलिक, तर काही सार्वत्रिक असे मिश्रण पाहाव्यास मिळते. काही तात्कालीक व भौगोलिक प्रश्न लवकर सुटून जातात, तर काही प्रश्न दीर्घकाळ रेंगाळत राहतात व ती त्या आर्थिक व्यवस्थेची वैगुण्ये बनतात. काही वैगुण्ये दुर्लक्ष करण्यासारखी असतात, ती सामान्यपणे दुर्लक्षित केलीही जातात. नंतरही जी वैगुण्ये सतत निर्माण होऊन टिकून त्या व्यवस्थेस जेरीस आणतात, ती खरी आव्हानात्मक ठरतात; अशावेळी धोरणात्मक विचार करणाऱ्यांना हतबल वाटू लागते व व्यवस्थात्मक परिवर्तनाची गरज भासू लागते.

कोरोना नंतर विकास प्रक्रिया जलद गतीने ('V' अक्षरासारखी) ताळ्यावर येईल असे जगातील अनेकांना वाटत होते पण तसे घडले नाही. आता उपलब्ध आकडेवरून असे दिसत आहे की अपेक्षित (किंवा आवश्यक) वेगापेक्षा मंद गतीने जागतिक अर्थव्यवस्था सुधारेल. त्यावर काही उपाय दिसत नाही, ही चिंता आहे व तोच या निबंधाचा विषय आहे.

जागतिक बँकेचे अभ्यास-

सदस्य राष्ट्रांचे वेगवेगळ्या आधारावर अल्प उत्पन्नाचे देश (Low Income Countries= LIE's); विकसनशील देश (Developing Countries); उदयोन्मुख बाजार आणि विकसनशील अर्थव्यवस्था (Emerging Market and Developing Economies= EMDE's) इत्यादी वर्गीकरण करून जगात विकासाशी संबंधित प्रश्नांची उकल करणारे अहवाल सतत प्रकाशित होत असतात. प्रस्तुत

लेखात जागतिक बँकेच्या दोन अहवालांची चर्चा केली आहे.

१. *"A Decade After the Global Recession: Lessons and Challenges for Emerging and Developing Economies"* – जागतिक महामंदी नंतरचे दशक: उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी धडे आणि आव्हाने"

२. "Falling Long-Term Growth Prospects (Trends, Expectations and Policies"- "दीर्घकालीन वृद्धीच्या घटत्या शक्यता (प्रवृत्ती, अपेक्षा आणि धोरणे")

विषयाची चर्चा सुरू करण्यापूर्वी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे; तो म्हणजे, भांडवलशाहीत, त्यात भाग घेणाऱ्या सर्वांच्या अनियंत्रित आर्थिक व्यवहारांचा संकलित परिणाम असल्यामुळे, अंगभूत अस्थिरता असते. ती अस्थिरता सुसह्य व्हावी म्हणून जे नियंत्रणात्मक कायदे, नियम तयार केले जातात तेवढ्यापुरती ती व्यवस्था म्हटली जाते. पहिल्या जागतिक महायुद्धानंतर (युद्धकालीन वस्तू व सेवांची मागणी कमी झाल्यामुळे) 1921 पासून 1929 पर्यंत तीन ते चार वेळा अल्पकालीन मंदी येऊन, शेवटी तिचे रूपांतरण जागतिक महामंदीत (1929-36) झाले त्या काळातील तीव्र बेकारीमुळे युरोपमध्ये जर्मनीत *नाझिवाद* व इटलीमध्ये *फॅसीझम* उदयास येऊन, दुसरे जागतिक (1939-45) महायुद्ध घडून आले. त्या युद्धानंतर साम्राज्यवाद नष्ट होऊन वसाहतींचे सार्वभौम देशात रूपांतर झाले. हे सगळे देश साम्राज्यवादी वारशाने भांडवलशाहीच होते. संख्येने इतक्या जास्त असलेल्या भांडवलशाही देशांचे अंतर्गत नियमन व समायोजन कसे करायचे हा युद्धोत्तर काळातील मुख्य प्रश्न होता. त्यानुशांगाने, मौद्रिक विषयासाठी 'आंतरराष्ट्रीय मुद्रानीधी' आणि विकास प्रश्नांसाठी 'जागतिक बँक' या दोन जुळ्या संस्था 1944 मध्ये स्थापन केल्या गेल्या, तर जागतिक मुक्त व्यापारातील अडचणी सोडविण्यासाठी 'जागतिक व्यापार संघटना स्थापन व्हायला पन्नास वर्षांच्या अंतराळानंतर 1994 साल उजाडले. आवश्यक ते तीन आधारस्तंभ उभारल्यानंतर जागतिक भांडवलशाही ही उन्मेशी स्थिर आणि जगातील सर्व जनतेला आशादायक व चांगले जीवनमान देणारी असावयास हवी होती.

प्रत्यक्षात मात्र तसे न घडता, 2008 मध्ये जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा कोसळली. *रॉबर्ट हायेक* या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने समाजवादाला विरोध करत त्यावर *'Road to Serfdom'* (*'वेठबिगारीचा मार्ग'*) असा ग्रंथ लिहिला होता. त्या शीर्षकावर टीकात्मक उपशीर्षक देऊन भांडवलशाहीवर टीका करणारे *'The Other Road to Serfdom'* (*'वेठबिगारीचा दुसरा मार्ग'*), *'The clash of 2008'* (*2008 चे अधःपतन*) या शीर्षकाचा ग्रंथ *स्वान आणि पीडकॉक* यांनी 2009 मध्ये प्रकाशित केला.[3] त्याचे दुसरे उपशीर्षक *"How Unregulated Capital*

Caused The Clash of 2008" असे आहे, आणि तिसरे उपशीर्षक आहे, *"A History of The Abuse and Misuse of Money From Plato to NATO & Beyond: 2400 B.C. to 2008 A.D."* हे शीर्षक व उपशीर्षक घेऊन भांडवलशाही व्यवस्था कशी निरनियंत्रित वागते व त्याचे दुष्परिणाम सर्व जगाला कसे भोगावे लागतात हे स्पष्ट होते.

दुसरे एक पुस्तक, प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ *ॲडम टूझ* यांचे आहे. त्याचे शीर्षक आहे *'Crashed' (How a Decade of Financial Crises Changed The World)*[4]. ह्यात 2007 पासून 2017 पर्यंतचे दशक विचारात घेतले आहे. त्यातील सहाव्या प्रकरणाचे शीर्षक आहे- *"The Worst Financial Crises in Global History"*. त्याला '*Sub-Prime Loan Crisis'* किंवा 'गौण कर्जाचे संकट' म्हटले जाते. 2006च्या आधीपासूनच अमेरिकेतील बँकांकडे युरोपातील देशांकडून पैसा गुंतवणुकीसाठी येत होता. तसेच अमेरिकेतील वेगवेगळ्या राज्यांमधून, बँकांकडून बचती गोळा करून मोठ्या बँकांनी त्या घरे बांधणी उद्योगात (रियल इस्टेट) गुंतवल्या होत्या. इतर क्षेत्रात गुंतवणुकीच्या संधी जवळपास संपुष्टात आल्यामुळे कर्ज देणाऱ्या संस्था, घर-बांधणी क्षेत्राकडेच लक्ष केंद्रित करू लागल्या. कर्जाचे अधिक वाटप करणाऱ्या व्यवस्थापकांना कर्जदात्या संस्था बोनस देऊ लागल्यामुळे, त्यांनी असुरक्षित कर्जे (सब प्राईम लेंडिंग) द्यावयास सुरुवात केली. कमी परतफेड क्षमता असलेल्या ग्राहकांना आवाढव्य कर्जे दिली गेली. माहिती होते की ही कर्ज परत येणार नाहीत; ती आलीच नाहीत त्यामुळे दिलेला पैसा ठीक ठिकाणी अडकून पडला. अनेक संस्थांनी या प्रक्रियेत थोड्या नफ्याच्या आधारावर रकमा गुंतविल्या. पण कमी पगार आणि अवाढव्य कर्जे अशा कोंडीत खालून कर्जांच्या रकमा येणे बंद झाल्यावर लोकांनी 'अ'' कंपनीचे पैसे न भरल्यामुळे 'अ' कंपनी आपल्या खातेधारकांचे व 'ब' कंपनीचे पैसे परत करू शकत नाही. असे होत, अमेरिका व युरोपमधील लहान बँकांच्या जवळील रोख संपून मोठ्या बँकांमध्ये खडखडाटाची अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली.

ॲडम टूझ लिहितात, *".... the impact of the funding crisis on a string of big European lenders was divesting... all faced failure."*[5] ते पुढे म्हणतात, *"Real business activity was collapsing on both sides of the Atlantis. In Europe no less than in the United States it was the crisis of 2008.... that marked the decisive break in investment consumption and unemployment. From the second half of 2007, as banks Great and Small in Germany, France, Britain, Switzerland and Benelux begin to acknowledge the scale of thesis losses, landing collapsed".*[6]

"What made the collapse of 2008 so sever and was its extraordinary Global synchronisation of the 104 countries for which World Trade Organisation collects data… Every country and every type of traded goods… experience decline."[7]
ॲडम टूझ नोंदवितात की, *Since 2007 the scale of the financial crisis has raised… relationship between democratic policies and demands of capitalist governance under immense stress."*[8]
आणि त्यांच्या ग्रंथाच्या शेवटी टूझ प्रस्तुत निबंधाच्या शीर्षकातील प्रश्न उपस्थित करतात; तो असा की, *"Is the uneven and combine development of global capitalism the driver of all instability?"*

अर्थात, टूझ ह्या प्रश्नाचे उत्तर देत नाहीत! सारांश, 1994 पर्यंत जागतिक भांडवलशाहीला स्थिरता आणण्यासाठी संस्थात्मक संघटना निर्माण करूनही, 2007-08 ची जागतिक मंदी निर्माण झाली आणि आता जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, 2030 पर्यंत दीर्घकालीन घसरता उत्पादन वृद्धीदर राहण्याची शक्यता आहे. त्यावरही अभ्यासकांची म्हणणे असे आहे की, भांडवलशाहीच्या स्थिरतेबद्दल आपण पहिले महायुद्ध संपल्यापासून उत्तर मागत आहोत; पण शंभर वर्षे झाली तरी समाधानकारक उत्तर मिळत नाही.

प्रश्न कायमच -

जागतिक बँकेचे प्रमुख आर्थिक सल्लागार असताना 2015 मध्ये प्रा. कौशिक बसू यांनी तेथील सहकाऱ्यांना प्रश्न विचारला होता की, (भारतासारख्या) ज्या राष्ट्रांनी बाजार व्यवस्था स्वीकारली अशा उभरत्या बाजार आणि विकसनशील अर्थव्यवस्थांची काय स्थिती आहे?

त्यावर जागतिक बँकेने, *"Slowdown in emerging markets: Rough pattern or prolonged weaknesses?"* ("उभरत्या अर्थव्यवस्थातील मंद विकास: अल्पकालीन संकट की दीर्घकालीन दुर्बलता") अशा शीर्षकाचा अहवाल प्रकाशित केला. त्यात 2010 ते 15 ह्या काळाकरिता असे मत व्यक्त केले गेले की, त्या मंद गतीला चक्रीय आणि संचनात्मक कारणे जबाबदार आहेत. त्यापैकी चक्रीय कारणे ही अधिक महत्त्वाची असून चक्रीय उच्चावचन विरोधी धोरणांचा अवलंब केल्यास गतिमंदता दुरुस्त करता येईल. परंतु आता 2023 पर्यंत असे दिसून येत आहे की विकास प्रक्रियेत संरचनात्मक कारणे निश्चितपणे अधिक महत्त्वाची झाली आहे आणि त्यामुळे उभरत्या बाजारा व्यवस्था दीर्घकालीन गतीमंदतेच्या मध्यात आहेत.

वरील निष्कर्षांचा अर्थ असाही होतो की उभरत्या बाजार व्यवस्थांनी ही व्यवस्था

स्वीकारण्यात घाई केली का किंवा ही व्यवस्था त्यांच्यावर थोपविल्या गेली; अशी परिस्थिती निर्माण केली का?

'A Decade', हा अहवाल नोंदवतो की, 2009 नंतर " Despite unprecedented stimulus the post crisis recovery in advance economies was anaemic... EMDE's on the hole managed the Global recession relatively well, especially those that were less dependent on external trade and finance and those with strong pre-crisis fundamentals… Because advanced economy where most adversely affected by the financial crisis, the role of the EMDE's increase in the global economy."[10]

येथे दोन-तीन महत्वाचे प्रश्न निर्माण होतात,

पहिला म्हणजे, 2009 च्या मंदीनंतर स्थिती सुधार आपोआप नाही आला; त्याकरिता विकसित राष्ट्रातील उत्पादकांना सुद्धा प्रोत्साहने द्यावी लागली आणि ती सुद्धा 'अभूतपूर्व'! का म्हणून? आणि तरी विकसित राष्ट्रांमध्ये स्थिती सुधार दुर्बलच होता का म्हणून? आपण नेहमी विचार करतो की, विशेषतः विकसित देशांमध्ये विकासाची गाडी पूर्व-पदावर 'आपोआप' येते व पूर्ण ताकतीने येते! हा समज दूर होणे आवश्यक आहे. अभूतपूर्व प्रोत्साहनांचा आर्थिक भार श्रीमंतांवर पडतो की अल्प उत्पन्नाच्या वर्गांवर? अर्थात, अल्प उत्पन्न हाती येणाऱ्या लोकांवर. सुधार (रोजगार वाढ) मंद गतीने झाल्यास तितका काळ बेरोजगारी कोणाला सहन करावी लागते? अर्थातच, श्रमिक वर्गाला; परंतु मुख्य चर्चा ही व्याजाचे दर, अर्थसंकल्पीय तूट इत्यादींचीच होते.

दुसरी विसंगती अशी की आर्थिक जागतिक जागतिकीकरणाचा आत्मा मुक्त व्यापार तत्त्वात आहे. त्याचा अर्थ एकमेकांच्या बाजारातून वाढती आयात, परस्परांच्या बाजारात वाढती निर्यात व त्यावर आधारित उत्पादन वाढ आणि विकास. त्यालाच 'बहुपक्षीयता' (Multilateralism) असेही म्हटले जाते परंतु 2009 च्या नंतर विकसनशील देशांमधील मंदीची परिस्थिती सुधारण्याबाबत 'A Decade' हा अहवाल असा अनुभव ग्रंथीत करतो की विकसित देशांच्या तुलनेत, विकसनशील देश सांभाळले गेले व विशेषतः जे देश निर्यातीवर आणि आंतरराष्ट्रीय वित्तावर अवलंबून नव्हते! त्याचा अर्थ ज्यांचे पूर्ण जागतिकीकरण झाले नव्हते म्हणजे बऱ्याच अंशी ते स्वायत्त होते.

तिसरी विसंगती अशी की 2009 च्या मंदीने विकसित अर्थव्यवस्थांवर परिणाम झाल्यामुळे विकसनशील अर्थव्यवस्थांचे महत्व अधिक वाढले. हे सर्व विपरीत घडत आहे तरीही त्यास 'व्यवस्था' म्हणायचे का? आणि मग त्यातील चूक काय आणि बरोबर काय? 2019च्या, ह्या 156 पृष्ठांच्या अहवालाची शेवटची दोन वाक्य अशी आहेत-

"... that the Global economy remains weak post-crisis despite unprecedented policy stimulus illustrate the limitation of cyclical stimulus. It is a reminder of the need for reforms that foster growth-led by the private sector and driven by productivity."[11]

या दोन वाक्यांमधील विसंगती पहा: 2007 ते 17 च्या दशकातल्या मंदीवर भाष्य करीत हा अहवाल म्हणतो की अभूतपूर्व प्रोत्साहन देऊन सुद्धा जागतिक अर्थव्यवस्था चक्रीय तेजी-मंदी नियंत्रित करण्यात अपयशी ठरली आहे. त्यात भारत, चीन, व्हियेतनाम ह्या देशांमधील सुसार्वजनिक क्षेत्र व त्यांचे यश लक्षात घेऊन सुद्धा हा अहवाल सदस्य राष्ट्रांना शेवटच्या वाक्यात सुचवून देतो की खाजगी क्षेत्राच्या नेतृत्वात विकास करणारे सुधार करण्याची गरज आहे.

आता आपण जागतिक बँकेच्या २०२३च्या "Falling Long Term..." ह्या अहवालाचे (अद्त्यावत आवृत्ती) विश्लेषण करू! हा अहवाल लेखाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे २०२०-३० ह्या दशकासाठी, संभाव्य वृद्धी दर घटत जाऊन निम्मा होईल असे म्हणतो. (याठिकाणी 'संभाव्य दर' म्हणजे विशेष महागाई नसलेला वृद्धी दर होय) जागतिक बँकेचे अध्यक्ष *डेव्हिड मलपास* लिहितात की, सध्याचे दशक हे गमावल्यातच जमा आहे. ह्या घटनेचे, आपल्या काळात, जगाने आपल्या अर्थव्यवस्थांचे संयोजन करण्यात, जी विविध प्रकारची आव्हाने निर्माण होत आहेत, त्याचे गंभीर परिणाम होत आहेत. हे परिणाम मोजक्या देशांवरील नसून सगळ्या जगावर, विशेषतः विकसनशील देशांवर होणार आहेत. त्यावर उपाय (काहीतरी केलेच पाहिजे) म्हणून, विशेषकरून सहा उपायांची चर्चा आहे: १) गुंतवणूक वाढवणे; २) वित्तीय आणि राजकोषीय संरचनांचा मेळ घालणे; ३) व्यापाराचा खर्च कमी करणे; ४) सेवा क्षेत्राच्या विकासाकरिता गुंतवणूक वाढविणे; ५)महिला श्रमिकांचा श्रमबळातील सहभाग वाढविणे, तसेच ५५ वर्षापेक्षा वयाने अधिक असलेल्यांना पुन्हा श्रमबळाकडे आकर्षित करणे; ६) सोव्हियत संघाच्या पतनानंतर, त्या घटनेचा फायदा घेण्यासाठी जे जागतिक सहकार्य दिसून आले, तसे सहकार्य पुन्हा दिसले नाही, ते निर्माण करणे इत्यादी.

सैद्धांतिक प्रश्न असा आहे की १९८९ मधील सोव्हियत पतन, १९९१-९२ मध्ये जागतिकीकरणाचा रेटा आणि १९९४ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची स्थापना; ह्यांचा आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम २००६ पर्यंत म्हणजे केवळ १२ वर्षे टिकला. २००७ पासून जी मंदी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली, ती निदान २०३० पर्यंत, म्हणजे सुमारे २३ ते २५ वर्षे थोड्या-फार फरकाने, चालूच राहणार आहे. ह्याचे सांख्यिकी रेखाटन नको, आर्थिक सिद्धांतांवर आधारित उत्तर पाहिजे! ते उत्तर कोणाजवळ तयार

नाही. म्हणून "Falling Long Term…" या अहवालावर 'Advance Praise' (प्रकाशनपूर्व प्रशंसा) करणारे काही अर्थशास्त्रज्ञ म्हणू लागले आहेत की आतापर्यंतच्या ज्ञात अशा धोरणांनी प्रश्नांची उत्तरे मिळत नसतील तर भांडवलशाही संरचनेपलीकडे जाऊन, 'Out of the box' विचार करून नवे मार्ग विचारात घ्यावयास हवे! त्या संबंधीची मानसिक तयारी भांडवलशाही देशांमध्ये आहे का? असा विचार केल्यास उत्तर नकारार्थी येते.

'द हिंदू' या दैनिकामध्ये व्यवस्थापन तज्ज्ञ आणि (आता बंद केलेल्या) तत्कालीन योजना आयोगाचे सदस्य अरुण मैरा ह्यांनी नुकताच 'A New Economics for a New World' या शीर्षकाचा लेख प्रकाशित केला आहे.[12] त्यांचे असे मत आहे की, "Economists do not have a systemic solution for this 'Poly-crisis' (inflation, trade and unemployment)… in complex organic systems- which all natural and social- economic systems are root causes contribute to many outcomes. Moreover, outcomes circle back to feed the root too. Therefore, the behaviour of the system cannot be explained by linear causes and effects. The causes interact with each other, and effects also become causes… Einstein said that working harder to solve systemic problems with the same thinking that caused them is madness. Global solutions and economic theories inverted in the West have caused problems, for which new solutions are essential."

भांडवली व्यवस्थेतील सततच्या आर्थिक अस्थिरतेचे विघातक परिणाम जर मानव कल्याणावर होत आहेत तर भारतासारख्या, जगातील सर्वात मोठी लोकसंख्या व चालत आलेली विषमता व दारिद्र्य असलेल्या देशातील अर्थशास्त्राज्ञांनी पर्यायी आर्थिक- सामाजिक– राजकीय व्यवस्थेचा विचार सुरु करणे आवश्यक आहे.

कालसंगत, संवैधानिक सामाजिक व्यवस्था हा त्यापैकी एक पर्याय असू शकतो. त्या संकल्पनेचा सैद्धांतिक विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ व टिपणे:

1. Kose, M. Ayhan, and Franziska Ohnsorge, eds. (2020). A Decade after the Global Recession: Lessons and Challenges for Emerging and Developing Economies. Washington, DC: World Bank. doi:10.1596/978-1-4648-1527-0. License: Creative. Commons Attribution CC BY 3.0 IGO.

2. Kose, M. Ayhan (ed.); Ohnsorge, Franziska (ed.). (2023). Falling Long-Term Growth Prospects: Trends, Expectations, and Policies. © World Bank: Washington, D.C.
http://hdl.handle.net/10986/39497 License: CC BY 3.0 IGO.

3. Swan, Arthur and Pidcock, David M. (ed.). (2009). The Crash of 2008: 'How Unregulated Capital Caused it', Pentagon Press Exclusively for Shree Book Centre; 8 Kakad Industrial Estate, S. Keer Marg, off L. J. Road, Matunga west, Mumbai- 16. SBN,9788182743861 (ISBN10: 8182743869)
*(**टीप-** ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य असे आहे की, मुस्लीम धर्मात व्याज आकारण्याला मान्यता नाही आणि नेपोलियन व इंग्लंड यांचे युद्ध, नेपोलीयांचा व्याज आकारण्याऱ्या ब्रिटीश बँकिंग आणि ती व्यवस्था फ्रान्सवर लादली जाण्यास विरोध होता; नेपोलियनने स्वतः मुस्लीम धर्म स्वीकारला होता आणि स्वान आणि पिडकॉक ह्या लेखकद्वयांनीसुद्धा मुस्लीम धर्म स्वीकारला आहे. हे मुद्दे ज्यांना अधिक रस असेल त्यांनी ते तपशिलात तपासून घेणे आवश्यक आहे. परंतु ह्या पुस्तकात लेखकांनी, विकसित देशांनी विकसनशील देशांना कर्ज देणे व त्याच्या आधारावर तेथे आपली निर्यात वाढवण्याच्या कृत्रिमपणाचाही विरोध केला आहे, आणि सार्वजनिक कर्ज घेऊन सार्वजनिक खर्च वाढवण्याला केन्सने जो विरोध केला होता त्यात केन्सचे समर्थन करतात.)*

4. Tooze, Adam. (2018). Crashed: How a decade of financial crises changed the world. Allen Lane, Penguin Random House, Great Britain.
5. Ibid, P.154
6. Ibid, P. 155
7. Ibid, P. 159
8. Ibid, P. 614
9. Ibid, P. 615
10. 'A Decade after the Global Recession', op. cit., p.121.
11. Ibid. p. 155.
12. Maira, Arun. (2023). '*A new Economics for a New World'.* The Hindu (Daily), Hydarabad, April 5, 2023. P.8.

महाराष्ट्राचा महिला केंद्रित अर्थसंकल्प

डॉ. अंजली कुलकर्णी
निवृत्त प्राध्यापक व माजी विभागप्रमुख,
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

८ मार्च हा दिवस हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून दर वर्षी गौरवित केला जातो. त्या निमित्ताने स्त्रियांच्या सबलीकरणावर, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायावर बरीच चर्चा होते. UNDP ने आपल्या मानव विकास अहवालात प्रथम स्त्री विकासात्मक निर्देशांक (Gender Development Index) व त्यात पुढे सुधारणा करीत स्त्री सबलीकरण निर्देशांक (Women Empowerment Index) काढून त्यांत विविध घटकांचा (विशेषतः स्त्रियांचा प्रशासकीय, राजकारणातील सहभाग, उत्पन्न, संपत्तीतील योगदान इ.) समावेश केला व त्यास अनुसरुन स्त्री सबलीकरणाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील वास्तवावर प्रकाशझोत टाकला. धोरणात्मक दृष्टीकोनातून पहाता स्त्रियांना आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने त्यांचे शिक्षण, आरोग्य, त्यांचा उद्योगातील सहभाग या बाबतीत देखील बऱ्याच उपाययोजना केल्या गेल्या. स्त्रीची भूमिका ही केवळ लाभार्थ्यांपुरती मर्यादित नसून, त्या विकास प्रक्रीयेतील प्रभावी अभिकर्त्या आहेत व त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात अंतर्भूत केल्यावरच विकासाचा गुणात्मक दर्जा अधिक उंचावेल हे वारंवार सांगितले जात आहे.

अर्थसंकल्पातील विविध प्रस्तावांचे महिला केंद्रित विश्लेषण म्हणजेय 'जेंडर बजेट' होय. सार्वजनिक पैसा खर्च करतांना लिंग समभावाचा विचार करणे व त्याला अनुसरून सुयोग्य धोरणे आखणे, सरकारची धोरणात्मक बांधिलकी व अर्थसंकल्पाद्वारे केले जाणारे निधीचे वाटप व तरतूद यातील सुसंवाद व विसंवाद शोधणे, स्त्रियांचे सक्षमीकरण घडावे यासाठी धोरणे आखणे; अशा अनेक बाबींसाठी विश्लेषण आवश्यक आहे.

यंदा महाराष्ट्राचा अर्थसंकल्प ९ मार्चला सादर झाला आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी, उच्च सांस्कृतिक वारसा लाभलेल्या राज्यात स्त्रियांच्या सबलीकरणावर अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विकास साध्यण्याचे शासनाने केलेले प्रयत्न व त्याची फलश्रुती याचा येथे आढावा घेणे योग्य होईल. त्यासाठी 'महिला केंद्रित बजेट' (Gender Budget) ची संकल्पना, त्यांचे अर्थसंकल्पातील स्थान व त्यात समाविष्ट असलेल्या शासकीय योजना याचा येथे थोडक्यात मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय राज्यघटना सर्वांना समानतचे आश्वासन देते. स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व सर्वसमावेशक स्थान उंचावण्यासाठी

त्यांना समान पातळीवर आणण्यासाठी व सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय विषमता दूर करण्यासाठी देशाच्या तसेच राज्याच्या अर्थसंकल्पात विविध तरतूद करणे आवश्यक असते, किंबहूना शासनाची ही स्त्री सबलीकरणाच्या संदर्भातील महत्त्वाची जबाबदारी समजली जाते. स्त्रियांचे लोकसंख्येतील महत्वपूर्ण प्रमाण (४८%) पाहता त्यांनी विकासातील विविध संधींपासून दूर राहू नये, संसाधनांपासून वंचित राहू नये, आत्मनिर्भरतेसाठी त्यांना पायाभूत सोयी उपलब्ध करुन द्याव्यात या दृष्टीने अर्थसंकल्पात स्वतंत्रपणे केलेली वित्तिय तरतूद, स्त्रियांची सुरक्षा, न्यायालयीन लढाई, हिंसाचार यासाठी देखील तरतूद करण्यात येते.

अर्थसंकल्प म्हणजे केवळ राज्याच्या उत्पन्न व खर्चाचा लेखाजोखा नसून आर्थिक नियोजन आणि धोरण निश्चितीचा एक महत्त्वाचा भाग आहे. आर्थिक/सामाजिक/राजकीय समानतेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन त्यासाठी केवळ भाराभार योजना जाहीर न करता स्त्रियांच्या गरजांची क्रमवारीता व त्यानुसार आर्थिक तरतूद हे जेंडर बजेटचे महत्त्वाचे कार्य आहे.

केंद्र शासनाने २००४ मध्ये जेंडर बजेटची संकल्पना स्वीकारली व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभागांसाठी सूचना जारी केल्या. अर्थसंकल्पाची रचना, त्यातील तपशील व सांख्यिकी यात काही सुधरणा करुन अनुकुल असे बदल पण केले.

महाराष्ट्राने २०१३ मध्ये जेंडर बजेट स्वीकारले असल्याचे केंद्र सरकारच्या २०१५ च्या दस्तऐवजात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या महिला केन्द्रित अर्थसंकल्पाची संक्षिप्त माहिती

२०१९-२० च्या अर्थसंकल्पात महिला केन्द्रीत बजेट स्टेटमेंट प्रथम प्रकाशित करण्यात आल्या. खालील तक्ता क्र.-१ मध्ये त्याचा तपशील दिला आहे.

तक्ता क्र.-१

महिला केंद्रित अर्थसंकल्प

(रु. कोटीत)

अ. क्र.	बाब	२०१९-२० प्रत्यक्ष खर्च	२०२०-२१ सुधारित अंदाज	२०२१-२२ बजेट अंदाज
१.	**एकूण खर्च**	३,७८,६६७	४,३७,३९१	४,८४,०९०
२.	**महिला केन्द्रित अर्थसंकल्प**	७६७१	१२२९३	१३९१५
३.	**एकूण खर्चापैकी महिला केन्द्रित अर्थसंकल्पाच्या खर्चाची टक्केवारी**	२.०३	२.८१	२.८७

२०२१-२२ दरम्यान २७.८ टक्के ने वाढ झाली व त्याचे एकून अर्थसंकल्पाशी असलेल्या प्रमाणात २.०३ टक्के वरुन २.८१ टक्के पर्यंत वाढ झाली. त्यांचे लोकसंख्येतील ४८ टक्के प्रमाण पाहता २.८ प्रतिशत हे प्रमाण अत्यल्प वाटते.

शासनाच्या काही योजनांमधील १०० टक्के निधी केवळ महिलांसाठीच राखून ठेवला जातो. अशा योजनांची माहिती जेंडर बजेट स्टेटमेंटमध्ये अ-१-२ विभागांतर्गत मांडली जाते. तर विविध विभागांच्या ज्या योजनांमधील किमान 30 टक्के निधी महिलांसाठी उपयोगात आणला जाणार आहे अशा योजनांची माहिती स्टेटमेंट विभाग 'ब' अंतर्गत मोडतो.

केन्द्रपुरस्कृत योजनांच्या संदर्भात २०१९-२० ते २०२१-२२ कालावधीत वित्तिय सहाय्यात ८२ टक्के वाढ झाली (रु.७६७१कोटी - रु.१३९१५ कोटीपर्यंत) असल्याचे पुढील तक्ता क्र. २ वरून दिसून येते.

सामाजिक न्याय व विषेश सहाय्य विभागातील सुमारे १६०० कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला नाही. (म. टाइम्स २०१६) यासाठी जेंडर बजेट स्टेटमेंट उपयुक्त ठरेल.

तक्ता क्र. २

महाराष्ट्राच्या महिला केन्द्रित अर्थसंकल्पाची विभागणी

(महिला, मुली / तृतीयपंथी वरील 100 टक्के खर्च)

(रु. कोटीत)

		२०१९-२० प्रत्यक्ष खर्च	**२०२०-२१ सुधारित अंदाज**	**२०२१-२२ बजेट अंदाज**
केन्द्रपुरस्कृत योजना व महाराष्ट्र राज्य	भाग अ -१	२२४९	६६७८	६५८३
जेन्डर बजेट	भाग अ -१	२२७४	६७०४	६६०६
	भाग अ -२	५३९७	५५९०	७३५०
एकूण जेन्डर बजेट		७६७१	१२२९३	१३९२५

युनिसेफ (UNICEF) महाराष्ट्राच्या एका अभ्यासानुसार महाराष्ट्राचे रु. ३०० कोटीचे जेंडर बजेट (२ टक्के प्रमाण राज्याच्या बजेटशी) (२०२०-२१चे) हे स्त्रियांच्या सबलीकरणाच्या दृष्टीने फारसे अनुकूल नसून त्यात स्त्री समानतेच्या दृष्टीने फारसे प्रयत्न केलेले आढळत नाही.

स्त्रियांच्या आरोग्या संदर्भातील उणिवा/दोष दूर करण्यासाठी किंवा त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विचारविनिमय केंद्र (Counselling Centres) साठी त्यात फारशी वित्तिय तरतूद केलेली आढळत नाही. उच्च शिक्षणासाठी देखील विद्यार्थी गळती थांबवण्याच्या दृष्टीने फारसे प्रयत्न केलेले आढळत नाही.

तक्ता क्र. २-अ

भाग अ-1 महिला/मुली/तृतीयपंथी यांच्यावरील १०० टक्के खर्च

(केन्द्र पुरस्कृत योजना)

(रु. हजारात)

अ. क्र.	विभाग	२०१९-२० प्रत्यक्ष खर्च	२०२०-२१ सुधारित अंदाज	२०२१-२२ बजेट अंदाज
१	बहुजन कल्याण विभाग	१९१९२१	१०००००	१४००००
२	उच्च आणि तंत्र शिक्षण	८५६८	९६१०१	१०६२५३
३	गृह	११२४३९	१५७६७००	१४२४९००
४	गृहनिर्माण	---	३६९९४९९७	४२५०४९९५
५	कामगार	---	७०९००	२०६७००
६	अल्पसंख्याक विकास	८९७३५	२०७०००	७००००
७	सार्वजनिक आरोग्य	१२०८३८९	१०३२९४९	१०९४६००
८	गर्मीन विकास	३८७७६०३	९०४५४००	९२७१९००
९	शालेय क्रीडा	२८६५९	१४००२	२८००२
१०	सामाजिक न्याय	२२८३८०	४२५०००	५०००००
११	नगर विकास व महिला बाल विकास	१६७४१४८२	१७२२७०३७	१०३१२२९८
	एकून खर्च	**२२४९३१७६**	**६६७८००८७**	**६५८२९६४८**

उच्च शिक्षणासाठी केवळ संपूर्ण शैक्षणिक बजेटच्या १ टक्केच तरतूद केलेली दिसते.

कृषीतील विधवा व परित्यक्ता ज्या सर्वस्वी कृषीवर अवलंबून आहेत त्यांच्या दृष्टीने कृषी व कृषीशी संबंधीत वित्तिय तरतूद केवळ रु. २९ कोटी (२०२०-२१) केलेली दिसते, तसेच विशिष्ट कौशल्य योजनांचा व रोजगारांच्या संधी निर्माण कण्याच्या दृष्टीने, ज्याचा लाभ शारीरिकदृष्ट्या कमजोर, तृतीयपंथी किंवा वेश्याव्यवसायातून सुटका झालेल्या स्त्रियांच्या रोजीरोटीच्या दृष्टीने व अनौपचारिक क्षेत्रात बेराजगारांसाठी बेरोजगारी भत्ता (Allowance) साठी केले जाते त्याकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही.

महाराष्ट्राचे २०२३ चे जेंडर बजेट

महिलांना लाभ होण्याच्या दृष्टीने २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात 'लेक लाडकी' या नवीन कार्यक्रमाची घोषणा केली गेली. त्यानुसार, पिवळया व केशरी रंगाच्या रेशन कार्ड धारण करणाऱ्या कुटुंबातील मुलींसाठी भरघोस वित्तिय

निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यांना जन्माच्या वेळी ५००० रुपये, जेव्हा प्रथम वर्गात तिचा प्रवेश होईल तेव्हा रु. ४०००/-, सहाव्या वर्गात गेल्यावर रु. ६०००, ११वीत गेल्यावर रु. ८००० व रु.७५००० हे १८ वर्ष पूर्ण झाल्यावर देण्यात येतील (रोकड रकमेच्या स्वरुपात).

राज्य परिवहन मार्गाच्या बसने (एस.टी.बस) ने प्रवास करणाऱ्या सर्व वयोगटातील स्त्रियांना फक्त ५० टक्केच तिकीटाचे पैसे द्यावे लागतील.

तसेच मासिक रु. २५००० उत्पन्न कमाविणाऱ्या स्त्रियांना व्यवसाय कर माफ करण्यात आला आहे. (पूर्वीची उत्पन्न मर्यादा रु.१०००० होती).

स्त्रियांना संपत्ती खरेदीत म्हणजे स्वतः राहण्यासाठी घराची खरेदी केल्यास त्यांना १ टक्केची स्टॅम्प ड्यूटीत सवलत मिळेल. तसेच ती संपत्ती पुरुषास १५ वर्ष न विकण्याचे घातलेले बंधन देखील सैल करण्यात आले आहे.

४ कोटी स्त्रिया व मुलींना आरोग्य तपासणी व वैद्यकीय सेवा, *'माता सुरक्षित तर घर सुरक्षित'* या योजने अंतर्गत देण्यात येईल.

स्वयंसेवी संस्था च्या माध्यमातून जवळ जवळ ३७ लक्ष ग्रामीण महिलांच्या उदरभरणाची सोय आजपर्यंत झाली. पुढील काळात तिचे सातत्य रहावे या दृष्टीने तालुरला *'बांबू क्लस्टर'* व कोल्हापूरला *'चप्पल कस्टर'* च्या माध्यमातून त्यांच्या पोटा-पाण्याची/रोजगाराची सोय करण्यात येईल.

स्त्रियांनी स्वयंसेवी गटाच्या माध्यमातून त्यांच्या उत्पादनांची विक्री करणे सुलभ व्हावे म्हणून मुंबईत *'युनिटी मॉल'* ही केन्द्र सरकारची योजना अमलात आणली जाईल.

पूर्वीच्या दोन योजनांचे एकत्रिकरण करुन *'शक्ति सदन योजना'* कार्यान्वित केली जाईल त्यात गृह अत्याचारास बळी पडलेल्या, लैंगिक अत्याचारापासून बचाव झालेल्या व अडचणीत असलेल्या स्त्रियांसाठी आश्रय, कायदेशीर सल्ला व कौन्सीलिंग ची सुविधा उपलब्ध करण्यात येईल. त्यासाठी ५० शक्ति सदनची स्थापना केली जाईल. तसेच नोकरी करणाऱ्या स्त्रियांना शहरात राहण्याची सोय उपलब्ध करण्याच्या दृष्टीने ५० होस्टेलची सोय करण्यात येईल.

अंगणवाडीतील शिक्षिकांचे मानधन रु. ८३२५ पासून रु.१०००० वाढविण्यात येईल तसेच छोट्या अंगणवाडीतील सेविकांसाठी ते रु.५९७५ पासून रु.७२०० पर्यंत वाढविले जाईल. तसेच अंगणवाडीतील २०००० सेविकांच्या रिक्त पदांची नोकर भरती होईल असे आश्वासन वित मंत्र्यांनी दिले.

आशा प्रवर्तक व प्रमोटरचे मानधन देखील प्रत्येकी रु.१५०० ने वाढविण्यात येईल.

राज्य शासनान लवकरच ४ थे महिला धोरण तसेच महिला केन्द्रित पर्यटन धोरण जाहीर करेल असे पण आश्वासन दिले.

आजपर्यंत राबविण्यात आलेल्या महिला केन्द्रित अर्थसंकल्पाचा स्त्रियांचा रोजगार, त्यांची कौशल्यप्राप्ती, स्त्री सक्षमीकरण, बाल व अर्भक मृत्यूदर, प्रसूतीदरम्यान होणारे स्त्रियांचे मृत्यू ह्यावर

किती अनुकूल परिणाम झाला आहे हे देखील तपासून पहावे लागेल.

बजेटच्या माध्यमातून स्त्री-उन्नती, स्त्री सक्षमीकरणासाठी केलेले प्रयत्न जरी प्रशंसनीय असले तरी लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण पाहता (५० टक्के) त्यांच्यासाठी केलेली वित्तिय तरतूद ही पंचामृतातील एका सूक्ष्म थोंबापेक्षाही कमी आहे त्यातून त्यांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या वित्तीय तरतूदींची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते त्यावर जेंडर बजेटची यशस्वीता अवलंबून राहाते. प्रशासकीय विलंब, आश्वस्ततेचा अभाव, सामाजिक बांधिकलीची अपुरी जाणीव या सर्व बाबींमुळे स्त्रियांच्या सबलीकरण व सक्षमीकरणावर या तरतुदींचा लक्षणीय प्रभाव पडलेला जरी आढळत नाही तरी त्या निदेशने त्यांची वाटचाल वेगाने चालू आहे. त्याचे प्रत्यंतर लवकरच येईल.

महिला केन्द्रित अर्थसंकल्प व स्त्रियांचे सक्षमीकरण

अर्थसंकल्पातील महिलांसाठी केलेल्या वित्तिय तरतूदींचा लाभ स्त्रियांना किती झाला ह्यावर जेंडर बजेटची फलश्रुती अवलंबून राहील. आरोग्याच्या दृष्टीने त्यांच्या प्रसूतीदरम्यानचा मृत्यूदर (माता मृत्युदर) प्रजनन दर त्यांच्या आरोग्याचा बालकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परीणामांचा येथे थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. सक्षमीकरणाच्या दृष्टीने त्यांची कार्यरतता, आर्थिक उपक्रमातील योगदान, सहकार, निर्णय क्षमता इ. बाबींचा विचार करणे योग्य होईल. तसेच सबलीकरणाच्या दृष्टीने त्यांचा राजकीय सहभाग, प्रशासकीय सहभाग, ह्यावर देखील एक दृष्टीक्षेप टाकणे आवष्यक आहे.

'राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण-५ वी आवृत्ती' (२०१९-२१) ह्या दृष्टीने (आरोग्यावरील परीणाम) विचारात घेणे उपयुक्त ठरेल. महाराष्ट्रातील या सर्वेक्षणातील ५३ टक्के कुटुंब ग्रामीण भागातील असून, १५ टक्के कुटुंब स्त्रीप्रधान होती.

वर उल्लेख केलेलया सर्वेक्षणानुसार स्त्रियांच्या प्रजनन दरात (fertility rate) प्रत्येक स्त्रीमागे १.८७ मुलांवरुन १.७ मुलांपर्यंत घट झाली, यावरुन स्त्री शिक्षणाचा परीणाम त्यांच्या प्रजनन दरावर अनुकुल झालेला दिसतो व परीणाम स्वरुप त्यांचे आरोग्य सुधारण्याची संधी देखील प्राप्त होते.

बालमृत्यूदरात देखील दर हजारी जीवंत जन्मामागे २३.९ वरुन (NFHS-4) वरुन २३.२ पर्यंत घट झाली, जेंडर बजेटच्या माध्यमातून दिलेल्या सुविधांचा बालमृत्यूदरावर अनुकूल परीणाम झालेला असू शकतो.

परंतु स्त्रियांच्या 'रक्तक्षय' (Anemic) स्थितीवर फारसा अनुकूल परीणाम झालेला दिसून येत नाही कारण जवळ जवळ ५४ टक्के स्त्रियांची स्थिती अनेमिक आढळली. तसेच ६ ते ५९ महिन्यांच्या ६९ टक्के मुलांची स्थिती देखील अनेमिक दिसून आली. त्यात ५४ टक्के वाढ झाली (NFHS-4 च्या तुलनेत)

तसेच लसीकरणाचा विचार केल्यास १२ ते २३ महिन्यांच्या मुलांपैकी फक्त ७३.५ टक्के मुलांचे, टी.बी., डायरीया (diphtheria), लखवा (tetanus), पोलीयो (Polio) कांजिण्या

(measles, pertussis) पासून सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने लसीकरण झालेले दिसते.

वरील माहितीच्या आधारे स्त्रियांच्या आरोग्यावरील निधीचा त्यांच्या मुलांच्या आरोग्यावरील अनुकुल परीणामांची कल्पना येते.

स्त्रियांच्या मानसिक आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मनोधैर्य, ही योजना महाराष्ट्र राज्य राबविते, बलात्कारास बळी पडलेल्या स्त्रिया व मुलांसाठी ह्यात वित्तिय तरतूद केली जाते.

तसेच *'अस्मिता'* योजनाच्या माध्यमातून, मुलींना/स्त्रियांना सॅनिटरी नॅपकीन सवलतीच्या दरात दिले जातात.

'जिजामाता-जिजाऊ मातृ-बाल आरोग्य व पोषण योजना' या योजनेतून स्त्रिया व मुलांमधील पोषणहीनता (malnutrition) कमी करण्यावर भर दिला जातो.

स्त्री-रोजगार-महाराष्ट्र

जेंडर बजेटतील वित्तिय तरतूंदीमुळे स्त्रियांना रोजगारांच्या संधी प्राप्त होऊ शकतात. स्त्रियांना काम करण्याची संधी प्राप्त होते हे देखील स्त्री सबलीकरणाचे महत्वाचे निर्देशक आहे. महाराष्ट्राच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) जरी महत्त्वाचे स्थान असले तरी लिंगाधारित निर्देशकांचा विचार केल्यास महाराष्ट्राचा क्रम बराच खालच्या पातळीवर दिसून येतो. महाराष्ट्राचे लिंगाधारीत गुणोत्तर (Sex ratio) १००० पुरुषांमागे ९५८ स्त्रिया असे असून त्याचा भारतात या बाबतीत १६ वा क्रमांक लागतो. लिंगाधारीत मुलांच्या गुणोत्तर देखील ८९४ मुली १००० मुलांमागे असे आढळते. स्त्री शिक्षण व स्त्रियांच्या सुरक्षिततेचा विचार केल्यास ७५ टक्के स्त्रिया या सुशिक्षित होत्या (२०११ जनगणना) क्रमवारीतेत त्याचा क्रमांक (भारतातील राज्यांची क्रमवारीता) १४ वा आढळतो. स्त्रियांचा रोजगारातील सहभाग हा महत्त्वाचा स्त्री सक्षमीकरणाचा निर्देशक आहे. महाराष्ट्र २०१७-१८ त स्त्रियांचा रोजगारातील सहभाग ३१ टक्के अनुमानित करण्यात आला आहे. श्रम सहभागीता दर (labour force participation rate) राष्ट्रीय सरासरीपेक्षा (२३ टक्के) जास्त आढळतो, यात प्रामुख्याने ग्रामीण स्त्रीयांच्या कार्यसहभागीता दराचे योगदान जास्त आहे. मात्र स्त्रीयांचा शहरी सहभागीता दर हा राष्ट्राच्या कार्यसहभागीता दराच्या जवळपास आहे. (१६.८ टक्के)

जेंडर बजेटची महाराष्ट्रात सुरुवात प्रथम २०१३ मध्ये झाली. त्यापुर्वीच्या कालावधीचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या ग्रामीण स्त्री कार्यसहभागीता दरात २००४ पासूनच ऱ्हासास सुरुवात झाली. २०११-१२ ते २०१७-१८ तील घट ही लक्षणीय होती. (अंदाजे १० टक्के)

ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्री व पुरुष कार्यसहभागीता दरात बराच फरक आढळतो. तो राष्ट्रीय पातळीशी अनुरुप आहे. परंतु हा फरक शहरी भागात, ग्रामीण भागापेक्षा बराच जास्त दिसून येतो. परंतु मजूरीवर आधारीत रोजगारात ६.९ टक्क्यानी वाढ झाली (शहरी भागात) व ३.१ टक्क्यांनी ग्रामीण भागात वाढ झाली. (२०११-१२ ते २०१७-१८)

स्त्रियांचा व्यवसायानुरुप कार्यसहभागीता दर

२०११-१२ पासून शहरातील स्त्रियांच्या स्वयंरोजगारात घट झालेली दिसून येते. (६.१ टक्केने) परंतु नियमित स्वरुपाच्या मजूरीवर आधारीत रोजगारात वाढ झाली (२०११-१२ पासून). त्यांच्या नियमित स्वरुपाच्या रोजगारात शहरी भागात ६.९ टक्के वाढ झाली तर ग्रामीण भागात ३.१ टक्के ने वाढ झाली. व सेवाक्षेत्रानंतर तो वस्तूनिर्माण क्षेत्र व स्वयंरोजगारात झालेली घट व त्याच बरोबरीने नियमित मजूरीवर आधारीत कामगार स्त्रियांचे वाढलेले प्रमाण त्यांच्या नियमित रोजगाराकडे झुकलेला कल दाखवितात.

महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागात स्त्रियांचा किरकोळ रोजगारातील सहभाग कमी होत चाललेला आढळतो, किरकोळ रोजगारातील स्त्रियांच्या प्रमाणात २०११-१२ ते २०१७-१८ त १.८ टक्क्यांनी घट झाली. रोजगार संधीचा ग्रामीण भागातील अभाव व त्यांचा किरकोळ रोजगारातील स्त्रियांच्या सहभागावर झालेला परिणाम ह्यावर अधिक विचार करणे आवश्यक आहे.

वर उल्लेख केलेल्या प्रवृत्ती मजूरीवर आधारीत रोजगाराच्या बदलत्या स्वरुपाचे निदर्शक आहेत. स्त्रियांचा करारावर आधारीत रोजगारातून नियमित स्वरुपाच्या रोजगाराकडे वाढलेला कल दिसून येतो.

स्त्री कामगारांचे नियमित स्वरुपाच्या कामाचे व्यवसायानुरुप वर्गीकरण (२०१७-१८)-

महाराष्ट्रातील शहरी विभागात स्त्रियांच्या नियमित स्वरुपाच्या रोजगारांत २००४ पासून वाढ होतांना दिसून येते. यात ७० टक्के रोजगार सेवाक्षेत्रात आढळतो. सेवाक्षेत्रातील स्त्रियांच्या रोजगारात प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य क्षेत्रात, फायनान्स इ.चा अंतर्भाव होतो. पारंपरिक स्वरुपाच्या व्यवसायात उदा. शिक्षण (२८ टक्के) त्यांचा प्रादुर्भाव आढळतो. ग्रामीण भागात देखील स्त्रियांच्या रोजगारातील हीच प्रवृत्ति आढळते. नियमित स्वरुपाच्या रोजगारात शिक्षण, सार्वजनिक प्रशासन, आरोग्य आणि सामाजिक सेवा यात त्यांचा सहभाग प्रामुख्याने दिसून येतो.

ग्रामीण भागात व्यापार, हॉटेल, रेस्टोरेंट (७.७ टक्के), स्त्रिया गुंतलेल्या असून, दळणवळण-वाहतूक, वगैरे व्यवसायाचे त्यांचे ६.८ टक्के योगदान दिसते. वस्तूनिर्माण क्षेत्रात त्यांचे प्रमाण ग्रामीण भागात ६.३ टक्के आढळते.

व्यवसायातील स्त्रियांची स्थिति

स्त्रियांचे नियमित स्वरुपाच्या रोजगारात जरी स्थित्यंतर झाले असले तरी त्यांची त्यातील स्थिती फारशी सुखावह नाही. जवळ-जवळ ७५.९ टक्के स्त्रिया या कोणत्याही लिखित करारानुसार काम करत नाही, त्यातील ४७.१ टक्के स्त्रियांना पगारी सुट्टीचा लाभ मिळत नाही. आणि ४३.२ टक्के स्त्रियांना कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुरक्षा सुविधांचा लाभ होत नाही. म्हणजे स्त्रियांना जरी नियमित रोजगार प्राप्त झाला असला व उत्पन्नाची उपलब्धता असली तरी त्यांची कार्यसंस्कृती फारशी चांगली नाही.

किरकोळ स्वरुपाच्या व्यवसायात स्त्रिया-

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात २००४ पासून किरकोळ रोजगारात घट होत आहे. त्यांचा त्यातील सहभाग ४१.५ टक्के आहे. त्यातील ९७.५ स्त्रिया या कृषी क्षेत्रात अस्तित्वात

बांधकामातील त्यांचे प्रमाण ०.८ तर सेवाक्षेत्रात केवळ १.१ टक्के आढळते.

NSSO (२०१९-२०) च्या नुसार मनरेगा (महात्मा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना) मध्ये हे प्रमाण २.१ टक्के होते.

महिला केन्द्रित अर्थसंकल्प व आरोग्य-

महिला केन्द्रित अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आरोग्य, सुविधा व पोषणासाठी दिलेल्या निधीचा दोन दृष्टीकोनातून विचार करणे योग्य होईल. स्त्रिया या आरोग्यविषयक सुविधांच्या लाभार्थी असतात, तसेच त्या सुविधा प्रदान करण्याच्या अभिकर्त्या (Agent) देखील असतात. स्त्रियांचा लाभार्थी म्हणून विचार केल्यास त्यात शासनाचा हस्तक्षेप तीन प्रकारच्या सुविधा देण्यासाठी महत्त्वपूर्ण व आवश्यक आहे. त्यांच्या प्रजनन काळातील सुविधांच्या संदर्भातील शासनाने केलेला हस्तक्षेप, त्या व्यतिरिक्त पुरविण्यात आलेल्या आरोग्य सेवा व पोषणासाठी शासनाने केलेला हस्तक्षेप. त्यासाठी यार्वजनिक आरोग्य विभागाची लिंगाधारीत लाभार्थींची माहिति उपलब्ध असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वार्षिक जेंडर बजेट स्टेटमेंट मध्ये दिलेल्या माहितीनुसार २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये १ प्रतिशतपेक्षाही कमी निधीची तरतूद महाराष्ट्राच्या जेंडर बजेटमध्ये आरोग्य व पोषणासाठी केलेली आढळते. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात देखील जेंडर बजेटसाठी दिलेले स्थान देखील दुय्यम आढळते कारण त्यात केवळ ३ टक्केच निधीची तरतूद जेंडर बजेटसाठी केलेली दिसते. त्यातील (जेंडर बजेटमधील) केवळ १६ टक्के निधीची तरतूद २०१२१-२२ च्या अर्थसंकल्पात केलेली दिसते. २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात रु.२१८९ कोटी ची तरतूद आरोग्य व पोषणासाठी केली होती; त्यापैकी ७४ टक्के निधी गरोदर व बाळास दूध पाजणाऱ्या स्त्रियांसाठी केली आहे.

तक्ता क्र. ३

महाराष्ट्राच्या महिला केंद्रीत अर्थसंकल्पात आरोग्य व पोषणासाठी वित्तिय तरतूद

(रु. कोटीत)

		२०१८-१९ प्रत्यक्ष खर्च	**२०१९-२० प्रत्यक्ष खर्च**	**२०२०-२१ सुधारित अंदाज**	**२०२१-२२ अर्थसंकल्पीय अंदाज**
१	आरोग्य	४६५	६६२	७००	७६९
२	पोषण	१८१३	२१७२	२१८२	१४२०
३	एकूण	२२७८	२८३४	२८८२	२१८९
	आरोग्य व पोषणाचे महाराष्ट्राच्या बजेटमधील एकूण खर्चाशी प्रमाण	**०.७५ %**	**०.७५ %**	**०.६६ %**	**०.४५ %**

(स्रोत- जेन्डर बजेट स्टेटमेंट २०२०-२१, २०२१-२२)

स्त्रिया व मुलींसाठी अर्थसंकल्पातील तरतूद

यात तीन प्रकारच्या शासकीय हस्तक्षेपांचा समावेश करण्यात येतो.

1) स्त्रियांच्या प्रजनन सेवांषी निगडीत बजेटः

यात गरोदर स्त्रियांची वैद्यकीय तपासणी, नुकत्याच जन्मलेल्या मुलाची तपासणी, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, माहेर घर इ. प्रसूतीपूर्व व प्रसूती पश्चात सुविधांचा समावेश होतो, त्यात २०१९-१९, २०१९-२०, २०२०-२१ मध्ये अनुक्रमे ५५ कोटी, ११९ कोटी व ६६ कोटी अशी अर्थसंकल्पीय तरतूद केलेली दिसते.

जेंडर बजेट व केन्द्रीय अर्थसंकल्प

भारताच्या अर्थसंकल्पातील महिला केन्द्रीत अर्थसंकल्पाच्या आकाराचा विचार करता त्याचे एकूण खर्चाशी ४ ते ६ प्रतिशत प्रमाण आढळते. तर सकल राष्ट्रीय उत्पन्नाशी त्याचे प्रमाण १ प्रतिशत पेक्षा कमी आढळते. मात्र २०२०-२१ चा अर्थसंकल्प यास अपवाद आहे. कारण त्या वर्षी कोविड-१९ च्या महामारीच्या अरिष्टात सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतूने त्याचे प्रमाण १.०६ प्रतिशत पर्यंत वाढले. प्रामुख्याने केन्द्राची जन धन योजना व उज्ज्वला योजनांवरील खर्चाची तरतूद यास कारणीभूत होती. परंतु खर्च मात्र ०.७७ टक्केच झाला.

खालील तक्त्यात २००५ ते २०२२-२३ या कालवधित जेंडर बजेडचे एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनाशी (GDP) प्रमाण निर्देशित केले आहे.

तक्ता क्र. ४

केन्द्र शासनाच्या जेंडर बजेटचे सकल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण

अर्थसंकल्पीय वर्ष	GDP शी प्रतिशत	अर्थसंकल्पीय वर्ष	GDP शी प्रतिशत
२००५-०६	०.६७	२०१४-१५	०.६६
२००६-०७	०.५२	२०१५-१६	०.५९
२००७-०८	०.४६	२०१६-१७	०.६३
२००८-०९	०.९०	२०१७-१८	०.५४
२००९-१०	०.८८	२०१८-१९	०.६१
२०१०-११	०.८८	२०१९-२०	०.६२
२०११-१२	०.८८	२०२०-२१	०.७७
२०१२-१३	०.७९	२०२१-२२	०.७२
२०१३-१४	०.७६	२०२२-२३	०.६६

(स्रोत- केन्द्रीय अर्थसंकल्प-२००५-०६ ते २०२२-२३)

तक्ता क्र.- ५

भारताचे केंद्रिय पातळीवरील जेंडर बजेटचे एकूण अर्थसंकल्पीय खर्चाशी प्रमाण

अर्थसंकल्पीय वर्ष	जेंडर बजेटचे एकूण अर्थसंकल्पीय खर्चाशी प्रमाण	अर्थसंकल्पीय वर्ष	जेंडर बजेटचे एकूण अर्थसंकल्पीय खर्चाशी प्रमाण
२००५-०६	४.७७	२०१४-१५	४.८८
२००६-०७	३.८३	२०१५-१६	४.४
२००७-०८	३.५	२०१६-१७	४.८८
२००८-०९	५.६१	२०१७-१८	४.१९
२००९-१०	५.१	२०१८-१९	४.१९
२०१०-११	५.६०	२०१९-२०	४.९८
२०११-१२	५.९०	२०२०-२१	४.०६
२०१२-१३	५.४	२०२१-२२	४.१
२०१३-१४	५.४८	२०२२-२३	४.३३

(स्रोत- केंद्रीय अर्थसंकल्प २००५-०६ ते २०२२-२३)

२००८ ते २०१३ पर्यंत जेन्डर बजेटचे अर्थसंकल्पाच्या खर्चाशी असलेले प्रमाण ५ टक्के ते ५.९ टक्के पर्यंत दिसते. परंतु २०१५ ते २०२२-२३ या कालावधीत ४.१ टक्के ते ४.८८ टक्के पर्यंत घसरलेले दिसते.

नॅशनल इंस्टीयूट ऑफ पब्लीक फायनान्स (NIPFD) च्या एका अभ्यासानुसार महिलीकेन्द्री विविध योजनांसाठी जरी बजेटमध्ये वित्तीय तरतूद केली असली तरी प्रत्यद्क्षात तो खर्च केला जात नाही. उदा. निर्भया फंडासाठी पोलीस विभागाने रु.१००० कोटींची तरतूद केली होती (२०२०-२१), परंतु २०२०-२१च्या सुधारित अंदाजात त्याचे आकारमान केवळ १० कोटी केले गेले.

केन्द्रीय स्तरावर ग्रामीण विकास, स्त्रीया आणि बालविकास, कृषी, आरोग्य व कुठुंब कल्याण या विभागात त्याचे केन्द्रीकरण झालेले दिसते. पुढे देखील हीच प्रवृत्ती दिसते. फक्त प्रधान मंत्री आवास योजनेवर जास्त खर्चाची तरतूद करण्यात आली होती.

महिलांचे लोकसंख्येतील प्रमाण व त्यांचे विकासातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष योगदान पाहता जेन्डर बजेटच्या माध्यमातून त्यास विशेष प्राधान्य देणे आवश्यक वाटते. अर्थसंकल्पातील भरीव स्वरुपाची वित्तीय तरतूद त्यांचा कायापालट करून त्यांचे सबलीकरण करण्यात नक्कीच आधारभूत ठरू शकते. त्यासाठी अर्थसंकल्पात त्यांच्यासाठीच्या वित्तीय तरतुदींचे गौण स्थान दूर करून त्यास प्राधान्य देणे अपरिहार्य आहे.

संदर्भ :

- Ministry of Health and Family Welfare Government of India. (2021). Retrieved from http://rchiips.org/nfhs/NFHS-5Reports/Maharashtra.pdf
- Gov (2023). Periodic Labour Force Survey (PLFS) – Quarterly Bulletin, Jan- Mar
- https://finance.maharashtra.gov.in/
- https://main.mohfw.gov.in/
- https://pin.gov.in

वंचितांचे सबलीकरण

डॉ. रमेश एल. बिडवई
उमरखेड.
rameshbidwai44@gmail.com

विश्वामध्ये सर्वप्रथम महिलांच्या दुर्बलतेच्या विषयावर न्यूयॉर्क स्थित शिवणकाम महिला कामगारांनी आवाज बुलंद केला. परिणामतः अन्यायाच्या दबावाखाली जगणाऱ्या न्यूयॉर्कमधील अत्याचाराची माहिती जगासमोर आली. तो दिवस होता 8 मार्च 1857 आणि पुढे तोच दिवस "जागतिक महिला दिन" म्हणून पाळल्या जाऊ लागला. या घटनेपासून प्रेरणा घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने 1976 ते 1985 चे दशक 'महिला वर्ष' म्हणून पाळले. या क्रियेमुळे महिलांच्या शशक्तीकरणाला जगभर प्राधान्य आणि चालना मिळाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने विश्वभर अनेक राष्ट्रात स्त्रियांना राज्यपदे मिळू लागली समाजामधील त्यांचा दर्जा उंचावला. स्त्री वर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलू लागला.

स्वातंत्र्य भारताला 8 मार्च 1996 मध्ये उशिरा का होईना जाग आली आणि महिलांच्या सशक्तीकरणाच्या दृष्टीने एक महिला ' सक्षमीकरण समितीची ' रीतसर स्थापना करण्यात आली. 73 वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे भारतात महिला वर्गांना शासकीय यंत्रणेमध्ये सहभाग मिळू शकला. ग्रामपंचायत स्तरावर पंचायत समितीमध्ये स्त्रियांना संधी मिळू लागली.

देशी आणि विदेशी स्तरावरील अनेक शासकीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी महिलांना अनेक क्षेत्रात सन्मानाचे स्थान मिळावे असा प्रयत्न केला. असे असले तरी अद्याप पावतो म्हणजे (2022) पर्यंत जगातील मोठ्या संख्येने स्त्रिया आणि स्वतंत्र भारतातील 90 ते 95% स्त्रियांच्या स्थितीत फारसा बदल घडून आलेला नाही. भारताच्या ग्रामीण परिसरातील स्त्रिया मात्र अद्याप पावतो 17 ते 18 व्या शतकातील स्त्री जीवन जगत असताना दिसतात. विद्यमान भारतातील महिला अर्थ-वंचित, धन-वंचित, संपत्ती-वंचित आहेतच परंतु त्या मोठ्या प्रमाणावर संधी वंचित, रोजगार वंचित, निर्णय वंचित, सन्मान वंचित, प्रतिष्ठा वंचित, राहिल्या आहेत. शारीरिक, मानसिक, प्राकृतिक आणि सामाजिक कारणामुळे त्या वंचित राहिल्या असा समज झाला आहे.

महिलांचे सबलीकरण हा विषय अत्यंत जटील व गुंतागुंतीचा आहे. त्यासंदर्भात कौटुंबिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक व राजकीय आणि महत्त्वाचे म्हणजे स्त्रीची शरीररचना

व समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या घटनांचा तो एकत्र असा संयुक्त परिणाम आहे. असे अनेक जाणते, अभ्यासक, संशोधक यांचा निष्कर्ष आहे. महिला विविध बाबतीत दुर्बल आहेत. म्हणून त्यांचे सबलीकरण आवश्यक असल्याचे सर्व स्तरावरून वाटू लागले आहे. परिणामतः महिला सबलीकरणासाठी अनेक मार्ग खुले केले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून विविध पातळीवरून असे प्रयत्न केले जात असताना दिसतात. परंतु अपेक्षित यश मात्र साध्य होऊ शकलेले नाही, ही शोकांतिका म्हणावी लागेल.

एक फेब्रुवारी 2023 ची भारताची एकूण लोकसंख्या 142.86 कोटी असल्याचे मत जागतिक लोकसंख्या अभ्यासकांचा आहे. यु. एन. ओ. च्या माहितीनुसार 18 फेब्रुवारी 2023 ची भारताची लोकसंख्या 141.56 कोटी आहे. संयुक्त राष्ट्र संघाने नवीनतम डेटाच्या बलडो मीटरच्या विस्तारावर आधारित लोकसंख्याविषयक माहितीचे संकलन केलेले आहे. भारताच्या ग्रामीण भागात 67% तर नागरी भागात 33% लोकसंख्या राहते. जागतिक लोकसंख्येच्या 17.6% लोक भारतात आहेत. भारतात दारिद्र्यरेषेखाली सुमारे 30% आणि दारिद्र्यरेषेच्या लगत 20% लोकसंख्या राहते. ग्रामीण भागात या मानकापेक्षा अधिक प्रमाणावर दरिद्री नारायानाचे अस्तित्व आहे. असे खाजगी अभ्यासकांच्या निष्कर्ष आहे. एकूण लोकसंख्येत सर्व भागात 50 टक्के महिलांचा समावेश असतो. देशातील महिलांपैकी सुमारे 64 कोटी महिला अनेक प्रकारे दुर्बल झाल्या आहेत. म्हणून त्याचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. हे सर्वांना पटले असेल. त्या दृष्टीने अनेक योजना राबविल्या जात आहेत. परंतु यासंदर्भात यश प्राप्ती मात्र किती झाली? हा वादाचा विषय होऊ शकतो. असे असले तरी भारतातील निव्वळ स्त्रियाच अबल आहेत. हे मान्य करता येणार नाही. ज्याप्रमाणे स्त्रिया असाहाय्य, परस्वाधीन, अनेक प्रकारे वंचित आहेत त्याचप्रमाणे भारतातील विशेषतः ग्रामीण तरुण, वृद्ध, बालक, पुरुष वर्गही अर्थ वंचित, संधी वंचित, विकास वंचित, रोजगार वंचित, सन्मान वंचित, राजकीय अधिकार वंचित आढळतात. शहरी भागातील पुरुषाची अशी संख्या तुलनात्मक दृष्टीने अल्प असेल परंतु गरीबीमुळे ते सर्वजण सर्व प्रकारच्या वंचिताचे शिकार झालेले आहेत. त्यामुळे वंचित महिलांकडे ज्या दृष्टीने लक्ष देणे आवश्यक वाटते तितकेच लक्ष वंचित पुरुष वर्गाकडेही देणे आवश्यक नाही का? भारतातील ग्रामीण भागात 105 कोटी पेक्षा अधिक (75 टक्के) वंचित गरीब स्त्री आणि पुरुष राहतात. त्या सर्वांचे सबलीकरण अत्यावश्यक आहे. पुरुष हे महिला इतकेच अबल आहेत. पुरुषांना नैसर्गिक शरीररचना या दृष्टीने सबल ठरवल्या जात असेल तर तो एक दोष म्हणावा लागेल. चारित्र्याच्या परिभाषेच्या आधारावर स्त्रीला अबला मानल्या गेले आहे. स्त्रियांना स्वच्छ चारित्र्य आवश्यक आहे, पुरुषांना तसे नको काय? पुरातन समाज विचार शैलीमध्ये

परिवर्तनाची आवश्यकता वाटते. याचा अर्थ असा घेणे जरुरी आहे की स्त्री असो अथवा पुरुष असा भेदभावच मानावयास नको सर्व उपेक्षित वंचित स्त्री व पुरुषांचा समानतेने विचार करणे योग्य आहे आणि सर्वांना वंचित अवस्थेतून बाहेर काढण्याचा समानतेने प्रयत्न केला जावा, तेच आधुनिक युगात इस्ट होईल.

इष्ट मार्गदर्शनाचा आणि सहकार्याचा अभाव तसेच कर्जबाजारीपणा या सर्व घटना ग्रामीण तसेच गरीब स्त्री-पुरुषाचे अलंकार आहेत. यामुळे केवळ स्त्री सशक्तीकरण आवश्यक आहे, असे म्हणणे सदोष वाटते. 'देशातील मनुष्यबळ, स्त्री-पुरुष हे राष्ट्राच्या विकासाचे खरे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत' ***(देविका चावला)***. पृथ्वी तलावर मानवी जन्म ही एक अद्भुत घटना मानली जाते. इतर प्राणीमात्राच्या तुलनेत अधिक बुद्धिमान आणि चातुर्यसंपन्न प्राणी म्हणून मानवाकडे बोट दाखवल्या जाते. 'आजची प्रगत अवस्था निर्माण होण्यासाठी मानवास कितीतरी खडतर अवस्थेमधून मार्गक्रमण करावे लागले आहे; हे सर्वांना ज्ञात आहे. सुसंस्कृत व्यवस्थेकडे होणारी वाटचाल म्हणजे मानवाचा इतिहास होय' ***(डॉ. सरल धारणकर).***

भारताचा विचार करता, ब्रिटिश कारकीर्दीपासून भारतीय नागरिकांची स्थिती बिघडत गेली. नैसर्गिक आपत्ती आणि ब्रिटिश शासनकर्त्यांचे दुर्लक्ष या घटनांमुळे जनता पराधीन व दुर्बल बनली. महत्प्रयासानंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीमुळे भारतीयांची सर्व प्रकारची पीडा, दुःख नष्ट होईल असे जे वाटत होते, ते चुकीचे ठरले आहे. परिस्थितीमध्ये सुधारणा होण्याऐवजी स्वातंत्र्य व लोकशाही जपण्याच्या नाटकी हव्यासापाई स्वैराचारी प्रवृत्ती बोकाळली आहे. उपेक्षितांना जीवन जगणे कठीण झाले आहे. 1950 मध्ये देशात विकास युगाला प्रारंभ करण्यात आला. परंतु विकासाची फळे दुर्बलांना, गरिबांना, उपेक्षितांना चाखता आलेली नाहीत. दारिद्र्याचे प्रमाण वाढत गेले. ग्रामीण विचारांची व नागरी बेरोजगारांची संख्या वाढत गेली. "भारतात बेकारीचा प्रश्न एवढा भीषण आहे की बेकाराने मुंबईपासून रांग लावल्यास ती रांग 75000 किलोमीटर लांबीची असेल. संपूर्ण भारतीय उपखंडाला चार वेळा वेढा घालूनही रांग संपुष्टात येणार नाही." ***(डॉ. अशोक ढवळे)*** 'भारतीय समाजात हजारो वर्ष ज्यांच्यावर अत्याचार झाले ज्यांना बहिष्कृत व मागास ठेवले गेले अशा दलितांना आर्थिक विकासातून वंचित ठेवण्यात आले. भारतातील समस्या निव्वळ बेरोजगारीचीच नाही, तर आर्थिक, आरोग्य, सन्मान, समानता यांच्या वंचित अवस्थेची आहे. त्यामुळे वंचित व तळागाळातील बहुसंख्येने असणारी जनता उपेक्षितांचे, हलाखिंचे, जीवन जगत आहेत. या प्रकारची जाणीव सुद्धा त्यांना होऊ दिल्या जात नाही. ते आपल्या पूर्व जन्माला दोष देऊन, आहे त्यात समाधान म्हणून जीवन जगत आहे. ग्लोबल

हंगर निर्देशांकांत सूचित केल्या प्रमाणे, भारतात रोज 1.5 ते 2 कोटी लोक उपाशी असतात. ग्लोबल हंगर निर्देशांकातच असे नमूद केले आहे की जगातील पाच वर्षाच्या आतील कमी वजनाच्या मुलांमध्ये 42 प्रतिशत मुले एकट्या भारत देशात सापडतात. कुपोषित बालकांचे आणि कुपोषित स्त्री-पुरुषांचे प्रमाण देशात 25 ते 40 टक्के इतके भयानक आहे. देशातील बालमृत्यू दर 64 आहे. 74% स्त्री व पुरुष तणावग्रस्त आणि विविध शारीरिक मानसिक व्याधीने ग्रस्त आहेत. 50% पेक्षा अधिक महिला रक्तक्षयाने पीडित आहेत. जीवनसत्त्वाच्या अल्प आहारामुळे तरुण-तरुणीची कार्यक्षमता कमजोर झालेली आहे.

आजची 49% कुपोषित बालके (मुले-मुली) 2040-41 मध्ये कमावती होतील, परंतु त्यावेळी त्यांची कार्यक्षमतेची हानी झालेली असेल आणि तरुण-तरुणीची उत्पादकता घटलेली आढळेल. परिणामतः भारताला 50 अब्ज डॉलर इतके प्रचंड नुकसान सोसावे लागेल, असे *'सेव द चिल्ड्रन'* या संस्थेचा सर्वेक्षण अहवाल म्हणतो; तरुणांच्या बेरोजगारीमुळे, कार्यक्षमता हानीमुळे, बदललेला तरुण वर्ग कुंठीत अवस्थेत आलेला आहे. तर कृषक वर्ग आपला उद्योग सोडून जाण्याच्या तयारीत आहेत, असे हे प्रमाण सुमारे 42 टक्के इतके आहे. असा निष्कर्ष राष्ट्रीय आर्थिक सर्वेक्षणातून समोर आला आहे. कृषक वर्ग प्रचंड ऋणभार, कृषी मालाच्या अल्प किंमती म्हणून उत्पन्न कमी, आणि कर्जबाजारीपणा यामुळे आत्महत्या करू लागले आहेत. प्रती वर्ष चौदा हजार शेतकरी आणि 38 हजार शेत कामगार आत्महत्याचा मार्ग अवलंबित आहेत. म्हणजे एकूण आत्महत्यापैकी सुमारे 25% आत्महत्या कार्यक्षम पण गरीब लोकांच्या आहेत.

सबलीकरणाचा अर्थ :

1) स्त्री-पुरुषांना समानतेचा दर्जा देणे.

2) आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व प्रशासन व्यवस्थेत समानतेच्या आधारे दोघांनाही सहभागी करून घेणे म्हणजे सबलीकरण होय.

3) आर्थिक सुबत्ता, स्वावलंबन, सन्मानपूर्वक जीवन, निर्णय क्षमतेत मौल्यवान समान स्थळाचे प्राप्ती म्हणजे स्त्री-पुरुषांचे सबलीकरण असा अर्थ होतो.

देशात 72 वर्षापासून आर्थिक व सर्वांगीण विकासासाठी शेकडो योजना राबविल्या जात आहेत. प्रचंड विनीयोगही करण्यात आलेला आहे. त्यापैकी काही प्रमुख योजनांचा उल्लेख करता येईल. 1) किमान वेतन कायदा 1948, 2) बंद पत्रित मजूर निर्मूलन कायदा 1976. 3) भूमीहीनाना शेती वाटप 4) आवास योजना 5) मोफत धान्य वितरण योजना. 6) जवाहर रोजगार योजना. 7) मनरेगा 8) ऋण निर्मूलन योजना. 9) आय. आर. डी. पी. 1975. 10) बेरोजगारी भत्ता. 11) आरोग्य सुविधा इ. जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या मदतीच्या अनेक मोफत योजना कार्यरत आहेत.

अशा सुधारणा केल्या गेल्या असल्या तरी दुःखाची तीव्रता मात्र कमी झालेली नाही. त्यात अल्पसाही बदल झाला नाही, असे म्हणणे सदोष असले तरी पर्याप्त परिवर्तन मात्र घडून येऊ शकले नाही. तळागाळातील व सीमांत लोकांना अद्यापही आपले जीवन हे भार वाटते. देशातील बहुसंख्य जनता असाह्य, पराधीन व दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेली आहे. केवळ मतदानापुरते त्यांना सन्मानित केल्या जात आहे. तेवढेच त्यांचे मूल्य आहे. असे का होत आहे? त्याचे सूक्ष्म निरीक्षण केले असता पुढील घटक जबाबदार असल्याचे आढळते. 1) एक तर गरजवंतासाठी उपयुक्त योजना आखल्या जात नाहीत. 2) योजनांसाठी पर्याप्त व पुरेसा निधी मान्य करण्यात येत नाही. 3) योजनांची पुरेशी अंमलबजावणी होत नाही. 4) योग्य नियंत्रण राखल्या जात नाही. 5) लाच-लूचपत, भ्रष्टाचारी वृत्ती पराकोटीला पोहोचलेली आहे. इतर काही बाबीमुळे विकास व परिवर्तन योजना फलदायी ठरू शकल्या नाहीत; 6) शिवाय गरिबांना संघटित केल्या जात नाही इत्यादी. या ठिकाणी यानुशान्गाने एक दृष्टांत वाचकासमोर ठेवू इच्छितो, 'भोवरा' गतीने फिरतो तो त्याच्या अनकुचीधार 'आणिवर'. ती बोथट झाली तर? गतीला मर्यादा येणार. असा सर्वांना अगदी बालपणापासून उत्तम अनुभव आहे. अशीच एकंदर परिस्थिती विकास भोवऱ्याची बनवली गेली आहे, असे नाही का वाटत? वर सांगितलेल्या दोषामुळे विकास भोवऱ्याची स्थिती बोथट बनली आहे.

त्यामुळे अशा स्थितीत फलश्रुतीची अपेक्षा करणे चुकीचे आहे. अशा विकास बाधक परिस्थितीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पुढील उपाय योजना आवश्यक वाटते. असे झाले तर वंचिताचे सबलीकरण होऊ शकेल.

प्रभावी उपाययोजना :

विकासनशील भारतात आज सुमारे 5.98 लाख लहान मोठी खेडी गावे आहेत. या प्रत्येक गाव स्तरावर जनता सबलीकरण कार्यालय निर्माण करण्यात यावे. एका छताखाली सर्वांगीण विकास कार्य केल्या जावे. या विकास केंद्राचे अधिकारी आणि त्यांचे सहकारी पितृतुल्य निष्ठेने कार्यकर्ती अशी व्यवस्था केल्या जावी. प्रत्येक कुटुंबप्रमुख ज्याप्रमाणे कुटुंबाच्या उत्कर्षासाठी, संवर्धनासाठी जिवापाड मेहनत घेतो, वैयक्तिक हिताची तमा न ठेवता झटतो. त्या प्रकारे केंद्र अधिकारी गावाच्या सबलीकरणासाठी, उन्नतीसाठी तळमळीने कार्य करू लागतील, भ्रष्टाचाराला वाव देणार नाही, सैन्यातील जवान ज्या तळमळीने, जीवाची तमा न बाळगता देशासाठी लढतो, त्याप्रमाणे केंद्र अधिकारी गावच्या विकासासाठी कार्य करतील, त्यासाठी त्यांना प्रभावी असे उपयुक्त प्रशिक्षणही दिले जावे. त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवल्या जावे अशी व्यवस्था असावी. पारदर्शक कार्यातून गावाचा संपूर्ण विकास हे त्यांचे ध्येय असावे. कडक नियंत्रण आणि प्रभावी कार्यातून सर्वांचा विकास यशस्वीपणे पार पाडला जावा.

गावकऱ्यांच्या सहभागातून कार्याला गती प्राप्त करावी. अशा निष्ठेने कार्य करण्यात आल्यास सर्व प्रकारच्या वंचितांच्या दारी सुखाची गंगा व विकासाचे वातावरण उभे राहील. आणि रोजगार निर्मितीतून रोजगार संधी, उत्पन्न प्राप्तीची, समानतेची संधी उपलब्ध होऊन देश आपला आहे, देशाच्या विकासासाठी आपण झटले पाहिजे, सर्वांना समानतेची वागणूक दिली पाहिजे अशी मानसिकता उदयाला येईल.

देशातील बहुसंख्य जनता-जनार्दन गरीब, बेरोजगार, अर्थ वंचित असल्यामुळे त्यांची गती कोंबडी समान झालेली आहे. कोंबडीची अंडी घारीने उचलल्यानंतर असह्य कोंबडी निवळ जाग्यावरच त्रागा करू लागते. आदळ आपट करू लागते. तिची प्रतिकारक्षमता शून्य असते, अशीच परिस्थिती देशात वंचितांची झालेली आहे, त्यात परिवर्तन घडवून आणण्याचा नारा किंवा काळजी करून भागणार नाही. आजपर्यंत 72 वर्षात शासन स्तरावर हेच करण्यात आले आहे सुधारणा किंवा अपेक्षित परिस्थितीतून विकास गंगा निर्माणच झालेली नाही, ती 25 वर्षे इतकी सुद्धा यशस्वी झालेली दिसणार नाही. त्यामुळे प्रत्येक गावात विकास केंद्राचे स्वतंत्रपणे आयोजन करून अपेक्षित फलश्रुती साध्य करता येऊ शकते, देश व देशाची जनता सबल होऊ शकते हे निश्चितपणे सांगता येईल.

विश्वातील उन्नती आणि प्रगतीसोबत सामान्य उपेक्षितांच्या संघर्षाचा अंत होईल, सुखा समाधानाचे जीवन त्यांना जगता येईल, गरिबीने जर्जर झालेल्यांना महागाईने झोडपलेल्यांना, आनंदाने जगता येईल. अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरले आहे. बुद्धिवानाच्या चातुर्याचा उपयोग सामान्यांना लुटण्यात होताना दिसतो. जो क्रूरता करू शकतो त्याचे समाज मूल्य वाढले आहे. मनुष्य निर्मित छळ संपण्याऐवजी वाढत आहे सुधारणेबरोबर तो विस्तारित झाला आहे. हे सर्व तेव्हाच रोखता येईल, जेव्हा उपेक्षितांच्या व सामान्याच्या पाठीमागे प्रभावी शक्ती उभी केल्या जाईल, आणि वंचितांचे संरक्षण होईल.

संदर्भ सूची :

- GOM. (2008) समर्थ महिला समर्थ राष्ट्र, योजना मासिक, ऑक्टोबर, 2008, अंक तीन.
- बेरोजगारीचे अनर्थ शास्त्र धनंजय- गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधन माला लेखक डॉ अशोक ढवळे आणि अन्य
- कदम, डी. एस. (2020). सुधारोत्तर कालखंडात भारतीय कृषी जनशक्तीचा बदलता आकृतीबंध व प्रवृत्ती.
- युनूस, मोहम्मद एन. यु. व बेबर, कार्ल. (२००९). 'गरीबी मुक्त विश्वाची निर्मिती'.
- कुलकर्णी, हेरंब. (2019). 'दारिद्र्याची शोधयात्रा'.
- खरात, शंकर. (2003). भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे.

- ब्लॅकडेन आणि वोडॉन. (2006). आफ्रिकन महिला शेतमजुराचे अध्ययन, वर्ल्ड वाईड जरनल.
- महाराष्ट्र शासन. (2020). महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.
- Agarwal, Minu and Nelasco, Shobana. (2009). Empowerment of rural women in India, Kanishka pulblisher New Delhi.
- Shaikh, N. Meer and Rao, P U M. (2003). If for empowerment of women, Yojana Feb., 2003.
- Saikia, Nandita. (2008). Indian women, A social - Legal Perspective, Serials publication New Delhi.
- अर्थसंवाद, एप्रिल जून - 2011 खंड 35 अंक एक
- अर्थसंवाद, एप्रिल- जून 2011 खंड 34 अंक एक
- अर्थसंवाद, ऑक्टोबर- डिसेंबर 2011 खंड 35 अंक तीन
- अर्थसंवाद ऑक्टोबर डिसेंबर 2008 खंड 32 अंक तीन
- https://www.mactotvends.Inp 2023.

********************************* ISSN 2320-0197 **

Analytical Note on the Status of Agriculture in the Indian Economy

Dr. Sagar S. Kondekar,
Assistant Professor, SRTMUN,
Sub-Campus, Latur
sskondekar@gmail.com

Abstract:

In the last 75 years of the Indian economy, more than 50 programmes were introduced for the agriculture and rural sector. In this scenario, it becomes appropriate to study the current status of Indian agriculture which is a priority sector in India. This paper is an attempt to analyze the status of Indian agriculture which occupies the highest portion of the Indian labour force. The present study describes the different programmes implemented for agriculture and rural development in the previous 75 years. Moreover, the paper describes the trend of the share of the agriculture sector in Gross Value Added and the rate of growth of agriculture. It also evaluates the production trend of agricultural products, fisheries and livestock.

Keywords: GDP, GVA, HDI, growth rate

Introduction:

India is known as one of the growing economy in the world. It stands in the fifth position for its Nominal GDP worth $3.469 trillion only. India stands in the eighth rank for M-Cap Ranking, forty-fourth in the World Competitive Ranking, fifty-seventh in the World Innovation Index, and second in Internet Marketing. Moreover, India is known as an agricultural-based country. It stands first in the production of Sugar, Sugarcane, Milk, Banana and Jute. India stands second in the production of Rice, Fruits and Fish. Many aspects lie on the credit side of the Indian economy. On the debit side, India stands in the hundredth position on Global Hunger

Index. It stands in one hundred and thirty-second position on Human Development Index. It ranks one hundred and fourth-two in the world per capita GDP (nominal). It stands in one hundred and sixteenth position on Sustainable Development Index.

There are different rankings for different indices. India has a mixture of good and bad rankings in those combinations of indices. So far the concept of 'Development' is concerned, it has also changed over the period time of the previous ten decades or more. Conventionally long term consistent high growth rate of an economy was referred to as 'development'. It was the time when the Indian growth rate was also referred to as the 'Hindu growth rate'. Later the concept of 'human development' was introduced by the United Nations Development Programme (UNDP) in 1990. Further, the concept of 'Sustainable Development' was introduced at United Nations Conference on Environment and Development in 1992. Then, the concepts like 'Inclusive Development, Inclusive and Sustainable Development, ICT Development' etc. were introduced. Over time the concept of 'Development' is consistently changing its meaning. In this scenario, this paper is an attempt to analyse the status of Indian agriculture in the development process, where agriculture occupies the highest portion of the Indian labour force.

Objectives of the Study:

This paper is an attempt to analyse the status of Indian agriculture which occupies the highest portion of the Indian labour force. The objective of the study is to understand the different programmes implemented for agriculture and rural development in the previous 75 years. Moreover, the paper tries to understand the trend of the share of the agriculture sector in Gross Value Added (GVA) and the rate of growth of agriculture. It also evaluates the

production trend of agricultural products, fisheries and livestock.

Programmes for Agriculture and Rural Development:

For the last 75 years, policymakers of India have introduced many programmes/policies for Agriculture and Rural Development. We can classify those programmes into three categories. One is a programme for Agriculture and Rural Development, the other is a programme for Rural Wage Employment and the third is a programme for Rural Poverty Alleviation Programme. The first programme for Agriculture and Rural Development was introduced in 1952 entitled Community Development Programme (CDP). Later, the Intensive Agricultural Development Programme (IADP) was introduced in 1960-61. Further, the Intensive Agriculture Area Programme (IAAP) in 1964-65, High Yield Variety Programme (HYVP) in 1966-67, Rural Electrification Programme (REP) in 1969, the Scheme for Discriminatory Interest Rate in 1972, Accelerated Rural Water Supply Programme (RWSP) in 1972, Prime Ministers 20 Point Programme in 1975, National Fund for Rural Development (NFRD) in 1984, National Drinking Water Mission (NDWN) in 1986, Agriculture and Rural Debt Relief Scheme (ARDRS) in 1990, Rajiv Gandhi Grameen Vidyutikan Yojana (RGGVY) in 2005, National Horticulture Mission in 2005, Rashtriya Krishi Vikas Yojana in 2005, National Food Security Mission in 2005, Pradhan Mantri Fasal Bima Yojana (PMFBY) in 2014, Padhan Mantri Gram Sinchai Yojana (PMGSY) in 2015 were introduced with the priority purpose of Agricultural and Rural Development in India.

Apart from this, many programmes for Rural Wage Employment were introduced in the previous 75 years of the Indian Economy. It started with Rural Manpower Programme (RMP) in 1960. Further, Crash Scheme for Rural Employment (CRSE) in 1971, Food and Work Programme (FWP) in 1977,

National Rural Employment Programme (NREP) in 1980, Rural Landless Employment Guarantee Programme (RLEGP) in 1983, Jawahar Rojgar Yojana (JRY) in 1989, Employment Assurance Scheme (EAS) in 1993, Jawahar Gram Samridhi Yojana (JGSY) in 1999, Sampoorna Gramin Rojgar Yojana (SGRY) in 2001, Pradhan Manri Gramodaya Yojana (PMGY) in 2000, National Food for Work Programme (NFFWP) in 2005, Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act (MGNREGA) in 2005, Deen Dayal Upadhyaya Grameen Kaushalya Yojana (DDUGKY) in 2015, Shyama Prasad Mukharji Rurban Mission in 2016, National Apprenticeship Promotion Scheme in 2016, Startup India in 2016 were introduced to promote rural wage employment opportunities in India.

Indian planning was more concerned with rural poverty too. Policymakers introduced many programmes to alleviate poverty in rural India. Rural Poverty Alleviation Programmes include the Marginal Farmers and Agriculture Labours Scheme (MFAL) in 1969, the Small Farmers Development Agency (SFDA) in 1971, the Training of Rural Youth for Self Employment (TRYSEM) in 1979, the Integrated Rural Development Programme (IRDP) in 1979, Development of Women and Children in Rural Areas (DWCRA) in 1982, Indira Gandhi National Old Age Pension Scheme (NGOAPS) in 1995, Indira Gandhi National Widow Pension Scheme (IGNWPS) in 1995, National Family Benefit Scheme (NFBS) in 1995, Bhagyashree Bal Kalyan Yojana (BBKY) in 1998, Annapurna Yojana in 1999, Swarna Jayanti Gram Swarojgar Yojana in 1999, Antyodaya Anna Yojana (AAY) in 2000, Janani Suraksha Yojana (JSY) in 2005, Aam Admi Bima Yojana (AABY) in 2007, National Rural Livelihood Mission in 2011, Sansad Adarsh Gram Yojana (SAGY) in 2014, Aajeevika Grameen Express Yojana (AGEY) in 2017.

In the last 75 years of the Indian economy, more than 50 programmes were introduced for the agriculture and rural sector. In this scenario, it really becomes appropriate to study the current status of Indian agriculture which carries the highest portion of the Indian labour force. This study is an attempt in this direction.

Population and Agricultural Workers:

According to Census 1951, there were 69.9 million (71.9%) cultivators out of 97.2 total agricultural workers. They were cultivating their own lands. And, only 27.3 (28.1%) million were agricultural labours out of the total workers.

Table 1.1: Population and Agricultural Workers

[in Million (percentage)]

Year	Total Population	Rural Population	Total Workers	Agricultural Workers		
				Cultivators	Agri. Labourers	Total
1951	361.1	298.6 (82.7)	139.5	68.9 (71.9)	27.3 (28.1)	97.2 (69.7)
1961	439.2	360.3 (82)	188.7	99.6 (76)	31.5 (24)	131.1(69.5)
1971	548.2	439 (80.1)	180.4	78.2 (62.2)	47.5 (37.8)	125.7(69.7)
1981	683.3	525.6 (76.9)	244.6	92.5 (62.5)	55.5 (37.5)	148 (60.5)
1991	846.4	630.6 (74.5)	314.1	110.7(59.7)	74.6 (40.3)	185.3 (59)
2001	1028.7	742.6 (72.2)	402.2	127.3(54.4)	106.8(45.6)	234.1(58.2)
2011	1210.9	833.7 (68.9)	481.9	118.8(45.1)	144.3(54.9)	263.1(54.6)

Source: Registrar General of India

After implementing so many programmes and policies for agriculture and rural development, the total number of agricultural workers improved to 263.1 million but the proportion of cultivators reduced to 45% (118.8 million) whereas the agricultural labours improved to 55% (144.3 million) in Census 2011. Census 2021 is yet to publish. These numbers may widen more.

Share of Agriculture Sector in Gross Value Added:

If we compare the contribution of the agriculture sector in the Gross Value Added (GVA) at basic prices for the recent 12-13 years, it is observed that the contribution of the agriculture sector and industrial sector has declined marginally. Whereas the contribution of the service sector has improved significantly. In the year 2004-05, Agriculture, forestry and fishing contributions were 19.5% in GVA and it reached 17.2% in the year 2017-18. The contribution of the service sector was 48.4% in the year 2004-05 and it reached 53.5% in the year 2017-18. At present more than 50% of the GVA is contributed by the service sector and less than 20% of the contribution is led by the agriculture sector in India. The growth rate of GVA at constant prices for the agriculture sector was 4.8% in the year 2005-06. It became negative in the year 2008-09, 2009-10 and 2014-15. Fluctuated in the rest of the years and it was around 5% in the year 2017-18. The industrial growth rate was 9.6% in the year 2005-06. It also fluctuated in the decade and reached 5.9% in the year 2017-18. The service sector growth rate was 9.1% in the year 2005-06. It was the only sector that had fewer fluctuations compared to other sectors during the decade. The growth rate of the service sector in the year 2017-18 was recorded at 8.1% and it stood highest amongst the others.

Table 1.2 Sectoral Share in GVA and Sectoral Growth Rate

(Figures in percentage)

Year	Agriculture Sector		Industry Sector		Service Sector	
	Share in GVA	Growth Rate	Share in GVA	Growth Rate	Share in GVA	Growth Rate
2004-05	19.5	4.5	32.1	8.8	48.4	8.0
2005-06	19.2	4.8	32.2	9.6	48.6	9.1
2006-07	18.3	2.9	33.8	13.2	47.9	7.0
2007-08	18.3	5.5	33.7	8.0	48	7.8
2008-09	17.9	-0.2	33.2	4.0	48.9	6.5
2009-10	17.8	-0.9	33.2	8.8	49	8.7
2010-11	18.4	8.8	33.2	7.9	48.5	7.8
2011-12	18.5	6.4	32.5	3.6	49	5.9
2012-13	18.2	1.5	31.8	3.3	50	8.3
2013-14	18.6	5.6	30.8	3.8	50.6	7.7
2014-15	18.2	-0.2	30	7.0	51.8	9.8
2015-16	17.7	0.6	29.8	9.6	52.5	9.4
2016-17	17.9	6.3	29.3	7.7	52.8	8.4
2017-18	17.2	5.0	29.3	5.9	53.5	8.1

Source: Central Statistics Office

Production Trend in Major Crops, Fisheries and Livestock:

Now we look into the trend of the production of major crops fisheries and livestock to understand the status of agriculture at present, the trend of rice and wheat production in India looks symmetrical. The correlation between both is 0.952 and highly significant at 0.01 level. It reflects that both are symmetrically changed over time of period. It was a period between years 1999 to 2005 when the actual rainfall was less than the normal rainfall so the production of wheat and rice shows a declining trend during the period. Production of rice is always at high than the production of wheat. But the gap between the production of rice and wheat is narrowed recently. The gap between the production of rice and wheat is more up to the year 2008-09 but it is much narrowed down after 2009-10.

Table 1.3: All India Production of Major Crops, Fisheries and Livestock Product

(Cotton in million bales; Eggs in Billion no's; Fish '000 tonnes & all others in million tonnes)

Year	Rice	Wheat	Sugarcane	Cotton	Milk	Eggs	Fish
1985-86	63.83	47.05	170.65	8.73	44	16.1	2876
1986-87	60.56	44.32	186.09	6.91	46.1	17.3	2942
1987-88	56.86	46.17	196.74	6.38	46.7	17.8	2959
1988-89	70.49	54.11	203.04	8.74	48.4	18.9	3152
1989-90	73.57	49.85	225.57	11.42	51.4	20.2	3677
1990-91	74.29	55.14	241.05	9.84	53.9	21.1	3836
1991-92	74.68	55.69	254	9.71	55.7	21.9	4157
1992-93	72.86	57.21	228.03	11.4	58	22.9	4365

1993-94	80.3	59.84	229.66	10.74	60.6	24.2	4644
1994-95	81.81	65.77	275.54	11.89	63.8	25.9	4789
1995-96	86.98	62.1	281.1	12.86	66.2	27.2	4949
1996-97	81.73	69.35	277.56	14.23	69.1	27.5	5348
1997-98	82.54	66.35	279.54	10.85	72.1	28.7	5388
1998-99	86.08	71.29	288.72	12.29	75.4	29.5	5298
1999-00	89.68	76.37	299.32	11.53	78.3	30.4	5675
2000-01	84.98	69.35	295.96	9.52	80.6	36.6	5656
2001-02	93.34	72.77	297.21	10	84.4	38.7	5956
2002-03	71.82	65.76	287.38	8.62	86.2	39.8	6200
2003-04	88.53	72.16	233.86	13.73	88.1	40.4	6399
2004-05	83.13	68.64	237.09	16.43	92.5	45.2	6305
2005-06	91.79	69.35	281.17	18.5	97.1	46.2	6572
2006-07	93.36	75.81	355.52	22.63	102.6	50.7	6869
2007-08	96.69	78.57	348.19	25.88	107.9	53.6	7127
2008-09	99.18	80.68	285.03	22.28	112.2	55.6	7616
2009-10	89.09	80.8	292.3	24.02	116.4	60.3	7998
2010-11	95.98	86.87	342.38	33	121.8	63	8231
2011-12	105.3	94.88	361.04	35.2	127.9	66.5	8666
2012-13	105.2	93.51	341.2	34.22	132.4	69.7	9040
2013-14	106.7	95.85	352.14	35.9	137.7	74.8	9572

2014-15	105.5	86.53	362.33	34.8	146.3	78.5	10164
2015-16	104.3	93.5	352.16	30.15	155.5	82.9	10796

Sources: Directorate of Economics & Statistics, DAC&FW, Department of Animal Husbandry Dairying & Fisheries

If we look at the production of cotton, up to 2004-05 it was less than 15 million bales. But after 2004-05 it was increasing very rapidly. Except for the year 2008-09, the production of cotton is rapidly increasing than any other crop. In the last 10 years, the production of cotton has increased very rapidly than the previous two decades. The rate of growth of cotton production is very high than any other crop during the years 2004-05 to 2013-14. Commercial crop sugarcane also showed an increasing trend in the last three decades. By its biological features, sugarcane is known as grass than crop. It is always high in production than any other crop production in India. There is a very steep fall in sugarcane production from 2003 to 2005 and 2008 to 2010. It was a period of scarce monsoon rain. India stands at the first position (as per 2014 data) in the world in the production of milk contributing 18.3% of the world's production. India stands in the third position (as per 2014 data) in the production of eggs after China and USA. If we look at the trend of Milk, Eggs and Fish there isn’t any major business cycle structure like in the production of rice, wheat, sugarcane and cotton. A major reason is; all these products are not dependent on monsoons but on some other non-natural factors.

Conclusions:

After implementing more than fifty programmes/policies for agriculture and rural development the agricultural share in the GVA stands at the bottom as compared to other sectors. Moreover, the rate of growth of the agriculture sector is

also on the lower side as compared to other sectors in India. As mentioned earlier, the number of agricultural workers in the total worker is declining significantly and it can be an alarming situation in the near future. There can be a huge scarcity of agricultural labour and it may harm the agricultural yield. It is also found that the number of self-cultivators is declining significantly and the engagement of agricultural labours increasing. On the one side, the engagement of agricultural labours increasing and on the other side scarcity of agricultural labour may lead to disturbances in the agricultural sector. Continuous improvement in the production of Eggs, Milk and Fisheries is welcoming side but it covers a limited part of the Indian region. Rest agricultural products are facing uncertain business cyclical fluctuations.

Most of the agricultural and rural development programmes were a kind of 'big push' to concerned sectors. It was top to a bottom approach adopted in most of the policies. There were homogeneous policy guidelines for the heterogeneous agricultural labours with the expectation of homogenous results. Even after 75 years of planning and implementing more than 50 programmes for agriculture and rural development, the sector is still lacking as compared to others and policymakers need to still pay serious attention towards the agriculture sector.

References:

- Acharya, S.P. & Basavraja, H. Kunnal (2012). Growth in area, production and productivity of major crops, Karnataka Journal of Agricultural Sciences, 25(4), 431-436.
- Binswanger, Mkhize, H.P., and D'souza, a. (2015). Structural change and agricultural performance at the state level in India: 1980-2010. Agricultural Economics Research Review, 28(1), 27-38.
- Binswanger & Mkhize, H. P. (2013). The stunted structural transformation of the Indian economy: agriculture,

manufacturing and the rural non-farm sector. Economic and Political Weekly, 48(26/27), 5-13

- Cantor L.M. (1967). 'A World Geography of Irrigation', Edinburg Oliver and Boyd. P.21
- Chand, R. (2007). Demand for foodgrains, Economic and Political Weekly. 42(52), 10-13.
- Ghosh B.N. (1985). 'Fundamentals of Population Geography: A Reader', McGraw Hill, New York. P. 31
- Joshi, P. K. & Gulati, A. (2004). Agriculture Divercification in South Asia: patterns, determinants and policy implications. Economic and Political Weekly, 39(24):2457-2467
- Pawar, C. T. (1987). 'Impact of Irrigation: A Regional Perspective, Himalaya Publication, Mumbai. P.52-71
- Singh, N. (2016). Agricultural diversification and contact farming in Punjab. Agricultural situation in India, 72(10), 19-31
- Viswanathan, B. (2001). Structural breaks in consumption patterns: India 1952-1991. Applied Economics, 33(9), 1187-1200.

भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती, कारणे आणि परिणाम

डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम
सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
भ्रमणध्वनी क्रमांक – 9970779085
Email Id. - siddhmeshram@gmail.com

प्रास्ताविक:

भारतात सध्या किमंत वाढ ही सर्वात गंभीर समस्या ठरते आहे. अर्थात, या समस्येला तशी दीर्घकालीन पार्श्वभूमी आहे. त्यामुळे, प्रस्तुत शोध निबंधात प्रामुख्याने किमंत वाढ म्हणजे काय? तीचे मापन कसे करतात? भारतातील किमंत वाढीची प्रवृत्ती कशी आहे? त्याची कारणे काय? या सर्व बाबींचा उहापोह करण्यात आला आहे. या शोध निबंधाच्या विश्लेषणाकारीत मुख्यतः द्वितीय साधन सामग्रीचाच वापर करण्यात आला आहे.

प्रथमतः हे लक्षात ठेवावे की, ठोक किंमत देशानांकाच्या आधारावर स्फीती किंवा किंमतवाढ किंवा भाववाढ (Inflation) व्यक्त केली जाते. या किंमतवाढीस काही प्रसार माध्यमातून ‘चलन वाढ’ हा शब्द वापरला जातो, तो तत्त्वतः चुकीचा आहे. कारण चलनवाढ म्हणजे अर्थव्यवस्थेतील चलनात (Currency) होणारा विस्तार किंवा वाढ होय; परंतु येथे जी वाढ (किंवा घट) झाली आहे ती वस्तू व सेवांच्या सामान्य किंमतीत (Prices) झालेली आहे. या किंमत वाढीची जी विविध कारणे असतात, त्यावरून स्फीती किंवा किंमत वाढीचे विविध प्रकार सांगता येतात. उदा. मागणी-कर्षक स्फीती, (Demand Pull Inflation) व्यय-प्रेरित स्फीती (Cost Push Inflation) इत्यादी.

अर्थशास्त्रात ज्या विविध संकल्पना महत्त्वाच्या आहेत त्यात स्फीती वा किंमतवाढ ही महत्त्वपूर्ण संकल्पना समजली जाते. स्फिती कशी मोजली जाते? तिचे अर्थव्यवस्थेवर आणि वेगवेगळ्या गटांवर उदा. गरीब व्यक्ती, मजूर, श्रींमत वर्ग, औद्योगिक श्रमिक इ. वर कोणते परिणाम होतात? अशा बाबींना व्यवहारात महत्त्व असल्याने ही संकल्पना व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली आहे. अर्थव्यवस्थेत जी विविध आर्थिक धोरणे अमलात आणली जातात त्यात मौद्रिक धोरण हे विशेष करून किंमत वाढ नियंत्रित करण्यासाठी वापरले जाते. विकास प्रक्रियेत मिश्र अंतर्गत उत्पादात, रोजगार पातळीत वाढ करणे हे उद्देश साध्य करतांना किंमतीमध्येही वाढ होत जाते. किंमत वाढ पूर्णतः थांबविणे शक्य नसले तरी ती नियंत्रित करता येते.

स्फीतीचे मापन :

किंमतीत सतत होणारी वाढ म्हणजे स्फिती होय. स्फिती किंवा किंमत वाढीमुळे देशातील मुद्रेचे मूल्य घटत जाते. उदा. 'क्ष' या वस्तूची किंमत प्रती नग किंवा मात्रा 20 रू. आहे. म्हणजेच 20 रू चे वस्तूत व्यक्त होणारे मूल्य 'क्ष' वस्तू होईल किंवा 1 रू चे मूल्य 1/20 'क्ष' वस्तू होईल. 'क्ष' वस्तूची किंमत वाढून प्रती नग 25 रू. झाली तर 1 रूपयाचे मूल्य हे 1/25 'क्ष' वस्तू होईल, म्हणजे हे मूल्य घटले (1/25 ही संख्या 1/20 पेक्षा लहान आहे). किंमत वाढ ही वस्तू व सेवांच्या किंमतीमधील सरासरी प्रवृत्ती दर्शविते. जर किंमतवाढ 10 प्रतिशत झाली तर याचा अर्थ प्रत्येक वस्तू किंवा सेवेची किंमत 10 प्रतिशतने वाढली असा होत नाही. कारण काही वस्तूंच्या किंमती 150 प्रतिशतने तर काहींच्या 6 प्रतिशतने किंवा 4 प्रतिशत वाढल्या असतील.

विविध वस्तू सेवांच्या किंमतीत जी वाढ होते ती सामान्य प्रवृत्तीच्या स्वरूपात व्यक्त केली जाते. त्यासाठी विविध वस्तू व सेवांच्या किंमती विचारात घ्याव्या लागतात. जेव्हा ठोक किंमतीमधील बदल मोजले जातात व त्यासाठी ठोक किंमतीचा विचार केला जातो व त्यावरून ठोक किंमत देशनांक तयार करतात. किंमत देशनांक तयार करतांना ज्या विविध वस्तू व सेवा विचारात घेतल्या जातात त्यांना उपभोग खर्चात सारखेच महत्त्व नसते. त्यामुळे प्रत्येक वस्तू व सेवांना विशिष्ट भार दिल्या जातो. भार निश्चित करण्याची प्रक्रिया बरीच जटील असते.

आणखी एका मुद्याचा विचार केला पाहिजे. ज्यावेळी आपण म्हणतो की 'क्ष' ची किंमत 10 प्रतिशत वाढली तेव्हा अन्य व्यक्ती म्हणेल की नाही किंमतीत जवळपास 30 प्रतिशत वाढ झाली आहे. आश्चर्याची बाब ही की दोघांचेही म्हणणे बरोबर असू शकेल! 'क्ष' वस्तूची किंमत 10 प्रतिशत वाढली असे म्हणणाऱ्या व्यक्तीच्या मनात त्या वस्तूची 2008 ची किंमत असेल. म्हणजे 2008 मध्ये असणारी किंमत 50 रू. आज 55 रू. झाली म्हणजे 10 प्रतिशतने वाढली. तर दुसरी व्यक्ती 2006 ची वस्तूची किंमी 45.50 रू. होती असे मनात ठेऊ आजची किंमत (रू.55) 20 प्रतिशतने वाढली असे म्हणत असेल. आजच्या सोन्याच्या किंमती दुप्पट झाल्यात असे म्हणणणाराही बरोबर आहे आणि त्या दहापट झाल्यात असे म्हणणारा ही बरोबरच आहे. फक्त दोघांनी तुलनेसाठी वेगवेगळया वर्षाच्या आधारभूत किंमती विचारात घेतल्या आहेत. त्यामुळे किंमतवाढ ही नेहमी आधारवर्षाच्या (Base Year) किंवा (Base period) कालखंडाच्या संदर्भात व्यक्त केली जाते हे लक्षात घेतले पाहिजे.

स्फितीचे मापन दोन पद्धतीने केले जाते-

1. ठोक विक्री किंमत निर्देशांक (Whole sale price index- WPI) – ह्यामध्ये वस्तूंच्या किंमतीत होणाऱ्या बदलाची घोषणा वाणिज्य मंत्रालय महिन्यातून एकदा करते.

2. ग्राहक किंमत निर्देशांक (Consumer price index- CPI) – ह्यामध्ये भूतकाळातील दर आणि वर्तमानकाळातील दर यांच्यावरून महागाई दर मोजला जातो. समजा मागच्या वर्षी पाण्याच्या बॉटलचा दर 20 रुपये होता आणि या वर्षी त्याच बॉटलचा दर 30 रुपये आहे, तर महागाई वाढली असे समजावे.

किंमत वाढ किंवा घटीमधील प्रतिशत बदल मोजण्यासाठी ठोक किंमत देशनांक आधारभूत साधन म्हणून स्वीकारले जातात. सध्या जे ठोक किंमत देशनांक प्रत्येक आठवड्याला प्रसिद्ध होतात आणि वर्षातील सर्व आठवड्यांच्या आधारावर सरासरीने वर्षाचा ठोक किंमत देशनांक मोजला जातो. पूर्वी प्रसिद्ध होणाऱ्या ठोक किंमत देशनांकाचे आधार वर्ष १९९३-९४ होते. यानंतर 2004-2005 हे वर्ष आधार वर्ष झाले; सध्या 2011-12 हे आधार वर्ष मानल्या जाते. म्हणजे 2011-2012 च्या किंमतीचा देशनांक १०० मानावा लागेल. त्यानुसार वेगवेगळया वर्षांचे व आठवड्याचे ठोक किंमत देशनांक सांगता येतील. ठोक किंमत देशानांक तयार करण्यासाठी ज्या विविध वस्तू व सेवांचा (697 वस्तूंचा) अंतर्भाव केला जातो, त्याचे तीन गट केले जातात. पहिल्या गटाला 'प्राथमिक वस्तू गट' म्हटले जाते. यात तांदूळ, गहू, डाळी, दूध, फळे, मासे, अंडी, तेलबिया इ. वस्तूंचा समावेश होतो. दुसऱ्या गटात इंधन, वीज, अशा सेवांचा अंतर्भाव होतो. तिसऱ्या गटाला 'निर्माणी वस्तू गट' म्हणतात. या गटात उद्योगात निर्माण झालेल्या वस्तूंचा समावेश होतो. ठोक किंमत देशनांक करतांना या तीन गटांना वेगवेगळे भार दिले जातात. पहिल्या गटात २२.०२ एवढा भार असून दुसऱ्या गटाला दिलेला भार १४.२३ असून सर्वाधिक ६३.७५ एवढा भार तिसऱ्या गटाला दिला आहे. या सर्व भारांची बेरीज अर्थातच १०० असते.

याव्यतिरिक्त भाव वाढ मोजण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांकाचा (Consumer Price Index) देखील वापर केला जातो. ग्राहक स्तरावरील महागाईचा दर काढण्यासाठी अशा निर्देशांकाचा वापर मजूर, शेतकरी, कारागीर यांचा मजुरी दर व महागाई भत्ता ठरविण्यासाठी ग्राहक किंमत निर्देशांक काढतांना वस्तू व सेवा असा दोन्हीचा विचार करतात. ग्राहक किंमत निर्देशांक हा प्रत्यक्ष नागरिकाला तोंड द्याव्या लागणाऱ्या परिस्थितीचा आरसाच असतो. त्यामुळे त्याला 'जीवन निर्वाह व्यय निर्देशांक' (Cost of Living Index) असे म्हणतात. सध्या या निर्देशांकाच्या आधारे

अमेरिका, इंग्लंड, जपान इत्यादी विकसित देशांमध्ये भाववाढ मोजली जाते.

भारतातील किमंततील बदलाची प्रवृत्ती:

भारतात अलीकडे भाववाढ किंवा महागाईची समस्या गंभीर होत असली तरी ती दीर्घकाळापासूनची मोठी समस्या आहे. अशा परिस्थितीत, हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की, स्वातंत्र्यानंतर भारतातील महागाईचा इतिहास काय आहे? कोणत्या वर्षांत किमंत वाढ जास्त कष्टप्राय ठरली आहे आणि कोणत्या दशकात लोकांना महागाईपासून दिलासा मिळाला. भारतातील किमंत वाढीच्या चढ उतारातील सांख्यिकीय माहिती पुढील तक्ता क्र. १ मध्ये सविस्तर दर्शविण्यात आली आहे.

तक्ता क्र. १

भारतातील महागाईचा दर व त्यातील वार्षिक बदलाची प्रवृत्ती

वर्ष	महागाईचा दर (%)	वार्षिक बदल	वर्ष	महागाईचा दर (%)	वार्षिक बदल	वर्ष	महागाईचा दर (%)	वार्षिक बदल
1960	1.78%	-0.08%	1981	13.11%	1.77%	2002	4.30%	0.52%
1961	1.70%	-0.08%	1982	7.89%	-5.22%	2003	3.81%	-0.49%
1962	3.63%	1.94%	1983	11.87%	3.98%	2004	3.77%	-0.04%
1963	2.95%	-0.69%	1984	8.32%	-3.55%	2005	4.25%	0.48%
1964	13.36%	10.41%	1985	5.56%	-2.76%	2006	5.80%	1.55%
1965	9.47%	-3.88%	1986	8.73%	3.17%	2007	6.37%	0.58%
1966	10.80%	1.33%	1987	8.80%	0.07%	2008	8.35%	1.98%
1967	13.06%	2.26%	1988	9.38%	0.58%	2009	10.88%	2.53%
1968	3.24%	-9.82%	1989	7.07%	-2.31%	2010	11.99%	1.11%
1969	-0.58%	-3.82%	1990	8.97%	1.90%	2011	8.91%	-3.08%
1970	5.09%	5.68%	1991	13.87%	4.90%	2012	9.48%	0.57%
1971	3.08%	-2.01%	1992	11.79%	-2.08%	2013	10.02%	0.54%
1972	6.44%	3.36%	1993	6.33%	-5.46%	2014	6.67%	-3.35%
1973	16.94%	10.50%	1994	10.25%	3.92%	2015	4.91%	-1.76%
1974	28.60%	11.66%	1995	10.22%	-0.02%	2016	4.95%	0.04%
1975	5.75%	22.85%	1996	8.98%	-1.25%	2017	3.33%	-1.62%
1976	-7.63%	13.38%	1997	7.16%	-1.81%	2018	3.94%	0.61%
1977	8.31%	15.94%	1998	13.23%	6.07%	2019	3.73%	-0.21%
1978	2.52%	-5.78%	1999	4.67%	-8.56%	2020	6.62%	2.89%
1979	6.28%	3.75%	2000	4.01%	-0.66%	2021	5.13%	-1.49%
1980	11.35%	5.07%	2001	3.78%	-0.23%	2022	6.50%	1.37%

स्रोत: Data basis: International Monetary Fund, World Bank and OECD Inflation CPI Indicator.

आलेख क्र.१



स्त्रोत: Data basis: International Monetary Fund, World Bank and OECD Inflation CPI Indicator (doi: 10.1787/eee82e6e-en)

किंमत वाढ कशी होते?

वस्तूची किंवा सेवेची किंमत त्या वस्तू व सेवेच्या मागणी पुरवठ्यावरून ठरत असते आणि जेव्हा पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असते तेव्हा वस्तूच्या किमती वाढतात आणि मागणी पुरवठ्यातील हे अंतर जितके जास्त तेवढ्या किमती वाढत जाऊन महागाई वाढते. मागणी पुरवठ्यात अशी विषमता निर्माण होण्यास अनेक आर्थिक तसेच आर्थिकेत्तर आणि मानवनिर्मित कारणे जबाबदार असतात. ती महागाई किंवा किंमत वाढीचे कारणे असतात.

वरील तक्यावरून असे लक्षात येते की, भारतातील किंमत वाढीचा जो काही अनुभव आला त्याचा आढावा घेतल्यास 1974 मध्ये झालेली किंमत वाढ ही भयावह स्वरुपाची व सर्वाधिक असल्याची दिसून येते.

स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्य नंतरचे दशक :

भारताला 1947 साली स्वातंत्र्य मिळाले आणि त्यावेळी 50 च्या दशकात महागाईचा दर सुमारे 2% होता. 1950 च्या दशकात शेतीच्या उत्पादनाची वाढ आणि वारंवार पडणा-या दुष्काळामुळे धोरणकर्त्यांना स्वातंत्र्याच्या सुरुवातीच्या दशकांत भाववाढीच्या संकटातून मार्ग

काढण्यासाठी फारच कमी कालावधी मिळाला. एप्रिल 1953 पासून उपलब्ध असलेल्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळ दोन अंकी किमंत वाढ व त्याची कारणेही वेगवेगळी होती. त्यावेळेच्या परिस्थितीने अर्थव्यवस्थेवर आघात केल्याने नागरिकांना महागाईचा सामना करावा लागला होता. दुष्काळ, युद्धे ते चलन अवमूल्यन आणि जागतिक वस्तूंच्या वाढत्या किंमतींमुळे, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तुंसाठी इतर देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिल्याने (त्यावेळच्या आकेडवारीनुसार भारताची 82 टक्के लोकसंख्या आणि धान्यांचे 75 टक्के उत्पादन असे प्रमाण होते) स्वतंत्र भारतात एप्रिल 1956 ते फेब्रुवारी 1957 दरम्यानच्या 11 महिन्यांत घाऊक बाजारात दोन अंकी चलनवाढीचा पहिल्यांदा सामना करावा लागला. 2010 सालच्या भाषणात आरबीआयचे तत्कालीन कार्यकारी संचालक दीपक मोहंती यांनी या चलनवाढीचे खापर सलग दोन वर्षे दुष्काळाशी आणि कृषी उत्पादनात झालेली घट यांच्यावर फोडले होते. हा हरित क्रांतीपूर्व काळ होता. जेव्हा उत्पन्न स्थिर झाले होते तेव्हा सरकारकडून किंमतीचे समर्थन सुद्धा नव्हते. परंतु 1950 ते 60 दरम्यान, महागाई दरात चढ-उतार होत राहिला आणि 1956-57 दरम्यान औद्योगिकीकरणाच्या उपाययोजनांमुळे तो 13.8 टक्क्यांपर्यंत वाढला. पण या दशकाच्या शेवटी हा दर पुन्हा ३-७ टक्क्यांवर आला.

1960 च्या दशकातील युद्धाचे परिणाम:

स्क्रिप बॉक्सच्या अहवालानुसार, 1960 नंतर महागाई दर सुमारे 6 टक्के राहिला. यादरम्यान भारताला 1962 मध्ये चीन आणि 1965 मध्ये पाकिस्तानशी युद्धही करावे लागले होते. तसेच 1965 साली दुष्काळ पडला. पुढे मार्च 1966 ते नोव्हेंबर 1967 दरम्यान 21 महिन्यांचा प्रदीर्घ काळ होता. मागील वर्षाप्रमाणे 1966 हे देखील दुष्काळी वर्ष होते आणि त्यातही भारतीय रुपयाचे अवमूल्यन झाले, त्यामुळे आयातीवर अधिक खर्च करावा लागला. त्यामुळे अधिक किमंत वाढ झाली होती. याचा आर्थिक विकासावर आणि औद्योगिकीकरणावरही मोठा परिणाम झाला. 1965 च्या सुमारास महागाई शिगेला पोहोचली होती आणि युद्धामुळे वस्तूंच्या किमती खूप वाढल्या होत्या. तथापि, सन 1969 पर्यंत ते स्थिर झाले आणि त्याला कृषी क्षेत्राचा चांगला पाठिंबा मिळाला. कारण हरित क्रांतीमुळे महागाई नियंत्रणात आली.

1970 मधील परिस्थिती :

70 चे दशक हे महागाईच्या अनिश्चिततेच्या दृष्टीने सर्वात गोंधळाचा काळ होता. 1970 च्या दशकात महागाई सरासरी 7.5% होती आणि 1973 च्या पहिल्या तेलाच्या धक्क्यादरम्यान 1974 मध्ये आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमती 250 टक्क्यांहून अधिक वाढल्या

होत्या. हे असे दशक होते जेव्हा स्वातंत्र्यानंतर प्रथमच 1973-74 मध्ये महागाईने 20% ची मर्यादा ओलांडली होती. तेलाच्या आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबित्व असल्याने देशातील तेलाचे दर खूप वाढले होते. कच्च्या तेलाच्या किमती खाली आल्यावर 1979-80 मध्ये महागाई नियंत्रणात आली.

1980 मध्येही महागाई हे संकट :

सरकारच्या विस्तारित वित्तीय धोरणांमुळे आणि त्याच्या मुद्रीकरणामुळे त्या वेळी महागाई या पातळीवर होती हे ज्ञात आहे. यानंतर वित्तीय तूट वाढली आणि यावेळी अधिक नोटा छापण्याचे निर्णय घेण्यात आले. तथापि, 1980 च्या दशकात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आंशिक उदारीकरणानंतर, परकीय खात्यातील असमतोल कायम राहिला.

1990 मधील परिस्थिती :

हे दशक सर्वाधिक महागाई दर असलेले दशक म्हणून ओळखले जाते.1990-91मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण केल्याने जागतिक अशांतता निर्माण होऊन तेलाच्या किमंती भडकल्या. फॉरेक्सच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर 1991-92 मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाले तेव्हा हा काळ नागरिकांना फार कष्टप्राय वाटत होता तसेच सरकारची परीक्षा पाहणारा होता. 1991 मध्ये येथील महागाईचा दर 13.9 वर गेला होता. पण नंतर हळूहळू ते कमी होत गेले.परंतु या दशकात अर्थव्यवस्थेबाबत अनेक महत्त्वाची पावले उचलली गेली, त्यात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण इ. 1999-2000 मध्ये आर्थिक सुधारणाच्या काळात विविध सेवांच्या किमंती शेतमालाच्या किमंतीच्या तुलनेत जास्त वाढल्यामुळे सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढला होता.

2000 मधील परिस्थिती :

जुलै 2008 मध्ये कच्च्या तेलाच्या किंमती प्रति बॅरल $147 वर गेल्यानंतर, 2009 आणि 2010 मध्ये महागाईने दुहेरी अंक ओलांडला. 2008 ते 2013 दरम्यान, जागतिक तेल आणि धातूच्या किमती वाढल्यामुळे महागाई दर वर्षी सरासरी 10.1% होती. अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आणण्यासाठी, सरकारने 2008 आणि 2009 मध्ये अनेक वित्तीय प्रोत्साहन पॅकेजची घोषणा केली, ज्यामुळे किमतींवर दबाव निर्माण होऊन वित्तीय तूट पुन्हा वाढली. तथापि, 2014 पासून आर्थिक मंदी आणि GST सारख्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे महागाईची पातळी खाली आली होती. 2020 मध्ये महामारीच्या काळात महागाई दर 6.6% पर्यंत वाढला.

सध्या देशातील किरकोळ महागाईने उच्चांक गाठला आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या महागाईने सर्वसामान्य हवालदील झाला आहे. देशातील नियंत्रणात ठेवण्यासाठी

भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या दोन महिन्यांत तीन वेळा रेपो दरात वाढ केली आहे. फक्त भारतातच नाही तर जगातील अनेक देशांमध्ये महागाई शिगेला पोचली आहे. सर्वाधिक महागाई असलेल्या 12 देशांच्या यादीत आता भारताचा समावेश झाला आहे.

जून महिन्याच्या किरकोळ चलनवाढीच्या दरानुसार भारताचा जगातील टॉप 12 देशांमध्ये समावेश आहे. जून 2022 मध्ये भारतातील किरकोळ महागाई 7.1 नोंदली गेली आहे. सलग सहाव्या महिन्यात रिझर्व्ह बँकेने ठेवलेल्या लक्ष्याच्या वर महागाई राहिली आहे.

कोणत्या देशात सर्वाधिक महागाई:

जून 2022 मध्ये जगात व्हेनेझुएला या देशात सर्वाधिक महागाई आहे. व्हेनेझुएलामध्ये महागाई 167 टक्के आहे, त्यानंतर तुर्कीमध्ये 78.6 टक्के, अर्जेंटिना 64 टक्के, रशिया 15.9 टक्के आणि पोलंडमध्ये 15.5 टक्के महागाईचा दर आहे. तर ब्राझीलमध्ये महागाई दर 11.9 टक्के आणि स्पेनमध्ये 10.2 टक्के आहे.

अमेरिकेत महागाई उच्चांकावर:

जून 2022 मध्ये अमेरिकेत महागाई दर 9 टक्क्यांपेक्षा जास्त आहे आणि 40 वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. यूकेमध्ये महागाई 9.4 टक्के, आयर्लंडमध्ये 9.1, पोर्तुगाल आणि स्वीडनमध्ये 8.7, नेदरलँडमध्ये 8.6, युरोझोनमध्ये 8.6 आणि कॅनडामध्ये 8.1 टक्के आहे. इटली आणि मेक्सिकोमध्ये महागाई 8.8 टक्क्यांवर गेली आहे.

भारतात जानेवारी 2023 मध्ये खाद्यपदार्थांचा महागाई दर 5.94 टक्क्यांवर पोहोचला आहे. डिसेंबर 2022 मध्ये महागाईचा दर 4.19 टक्के होता. जानेवारीत खाद्यपदार्थ महाग झाले आहेत. जानेवारी 2022 मध्ये खाद्यपदार्थांचा महागाई दर 5.43 टक्के होता. जानेवारी 2023 मध्ये दुधाचे दर वाढले असून त्याचा परिणाम किरकोळ महागाई दरावर दिसून येत आहे. खाद्यपदार्थांवरील किरकोळ महागाईचा दर बघित असतांना, दूध आणि दुधापासून बनवलेल्या उत्पादनांचा महागाई दर 8.79 टक्के आहे. मसालेही महागले आहेत आणि मसाल्यांचा महागाईचा दर 21.09 टक्के आहे. तृणधान्ये आणि उत्पादनांचा महागाई दर 16.12 टक्के आहे. मांस आणि माशांच्या महागाईचा दर 6.04 टक्के आहे, तर अंडीही महागली असून त्याच्या महागाईचा दर 8.78 टक्के आहे. पालेभाज्या आणि भाज्यांचा महागाई दर घटला असून तो -11.70 टक्के आहे. फळांचा भाव 2.93 टक्के होता. डाळींच्या महागाईचा दर 4.27 टक्के आहे. देशभरात सर्वसामान्यांना सर्वत्र महागाईचा फटका बसत आहे. एकीकडे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होत नाहीत, तर दुसरीकडे दैनंदिन वापरातील वस्तूही महाग होत आहेत. दूध, साबण, टूथपेस्ट यांसारख्या दैनंदिन जीवनाशी निगडीत वस्तूंची

किंमतही वाढताना दिसत आहे. जानेवारी 2022 मध्ये या वस्तूंच्या किमती तीन ते 20 टक्क्यांनी वाढल्या होत्या. त्यानंतर कच्च्या मालाच्या किमतीत ही दरवाढ वाढ झाल्याचं सांगण्यात आले आहे. भारतात गव्हाच्या पिठाची किंमतही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. रिपोर्टनुसार, भारतात गेल्या एका वर्षामध्ये पिठाची किंमत 40 टक्क्यांनी वाढली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, सुटे पीठ 38 रुपये प्रतिकिलो रुपयाने विकले जात आहे, तर पॅकेजिंगमधील पीठ 45-55 रुपये प्रतिकिलो आहे. निर्यातीवर बंदी असतानाही गहू आणि पिठाच्या वाढत्या किमतींमुळे केंद्र सरकारवर तणाव वाढला आहे.

किमंत वाढीमुळे झालेले परिणाम:

1. आर्थिक असमानतेत वाढ :

दीर्घकाळपर्यंत किंमती वाढत राहिल्या तर उत्पन्न आणि संपत्तीची विषमता वाढत जाते. स्थिर उत्पन्न असणारे कामगार, सरकारी कर्मचारी, शिक्षक इत्यादी लोकांची महागाईमुळे क्रयशक्ती घटत जाते. याउलट, उत्पादक आणि व्यापारी यांना भरमसाठ नफा मिळतो, ही प्रक्रिया जर ताबडतोब थांबविली नाही तर ज्यांचे रोख उत्पन्न जवळपास स्थिर असते. अशा लोकांची आयुष्यातील संपूर्ण बचत नष्ट होते आणि देशाची संपत्ती व्यापारी आणि उत्पादकांच्या हातात केंद्रित होते. भाववाढ झाल्यास लगेच वेतनदर सुधारल्या जात नाहीत आणि त्यामुळे निरनिराळ्या गटातील कामगारांचे वास्तविक वेतन घटत जाते. महागाईचा सर्वात जास्त तडाखा शेतमजुरांना बसतो कारण ते असंघटित आहेत. त्यांना पर्यायी संधि उपलब्ध नसल्यामुळे त्यांची वाटाघाटीची शक्तीही फारच कमी असते. सामान्यत: त्यांचे रोख वेतन पूर्वापार प्रथेनुसार ठरते आणि पैशाची क्रयशक्ती कमी झाली तरी त्यात बदल होत नाही. या तुलनेत औद्योगिक कामगार आणि सरकारी कर्मचारी यांच्या संघटना मजबूत असल्यामुळे त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण होते. महागाई वाढल्याबरोबर काही प्रमाणात तरी त्यांच्या वेतनात वाढ होते. मोठे शेतकरी, उद्योगपती आणि व्यापारी यांचा भाववाढीमुळे सर्वात जास्त फायदा होतो. त्यांच्या हातात संपत्ती एकवटल्यामुळे काही काळ मंदी आली तरी ही व्यापारी गृहे मालमत्ता मोठ्या प्रमाणावर खरेदी करताना आढळतात.

2. विकासाला अडथळा :

नियोजनकाळात सातत्याने भाववाढ झाल्यामुळे विकासाला अनेकदा अडथळा निर्माण झालेला आढळतो. योजनेचा नियतव्यय ताठर स्वरूपाचा असल्यामुळे हे घडते. किंमती वाढल्यामुळे योजनेच्या कार्यक्रमाचा खर्च दुरूस्त करणे आवश्यक असते परंतु असे घडत नाही. यामुळे ठराविक काळात विकास प्रकल्प पूर्ण होऊ शकत नाहीत. सतत किंमती वाढत राहिल्यास बचतीही कमी होत जातात. पश्चिम युरोपात बहुतांश

बचत खाजगी निगम क्षेत्रात (Corporate sector) केली जाते. याउलट, भारतात बहुतांश बचत घरगुती क्षेत्रात (household sector) होते. अमेरिका आणि पश्चिम युरोपातील देश महागाईच्या काळात बचत करतात. पुढे गुंतवणूक वाढविल्यामुळे अधिक नफा मिळविण्याची त्यांना आशा असते. याउलट, भारतात बचतीचे वास्तविक मूल्य घटेल या भीतीने बचत करणे टाळतात यामुळे वित्तीय स्त्रोत वाढत नाही आणि पुढे गुंतवणुकीचा दर कमी होतो.

3. सापेक्ष किंमतींमध्ये बदल :

किंमती वाढत असताना सर्व वस्तूंच्या किंमती सारख्याच प्रमाणात वाढत नाहीत. भारतात काही वर्षामध्ये शेतमालाच्या किंमती, कारखानी मालाच्या किंमतींच्या तुलनेत अधिक जलद वाढल्या. याउलट इतर वर्षामध्ये कारखानी मालाच्या किंमती शेतमालाच्या किंमतीपेक्षा अधिक जलद वाढल्या. शेतमालाच्या किंमती वाढताना मोठ्या शेतकऱ्यांचा बराच फायदा होतो. भारतात कृषी उत्पन्नाला आयकरापासून सूट मिळते. यामुळे सरकारला विकास प्रकल्पांसाठी या वाढीव उत्पन्नाचा कर किंवा इतर रूपाने फायदा मिळू शकत नाही. पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील मोठ्या शेतकऱ्यांनी हे वाढलेले उत्पन्न शेतीच्या यांत्रिकीकरणासाठी खर्च केले. यामुळे या राज्यांमध्ये शेतमजुरांची रोजगारी कमी झाली. मोठे शेतकरी श्रीमंत झाले परंतु ग्रामीण गरिबांची स्थिती अधिकच खालावली.

4. देण्याघेण्याचा आढाव्यावर प्रतिकूल परिणाम:

दुसऱ्या महायुध्दानंतर सर्व जगातच भाववाढ झाली. परंतु इतर देशांचे तुलनेत भारतात झालेली भाववाढ बरीच जास्त होती. याचा देशाच्या देण्याघेण्याच्या आढाव्याचे दृष्टीने दोन प्रकारचा परिणाम झाला. एक विदेशी बाजारपेठामध्ये भारतीय मालाची मागणी कमी झाली आणि यामुळे निर्यातवाढीचे उद्दिष्ट गाठणे कठीण झाले. याच वेळी देशी बाजारपेठेत नफा अधिक मिळू लागल्यामुळे उत्पादकांनाही निर्यात वाढविण्यात स्वारस्य नव्हते. दुसरे, भारतीय आयात व्यापाऱ्यांना विदेशी वस्तु स्वस्त मिळू लागल्यामुळे त्यांनी आयात वाढविण्याचा प्रयत्न केला. सरकारने अनावश्यक आयात मालावर विविध नियंत्रणे लादली. अलीकडे सरकारने आयातीबाबत उदार धोरण स्वीकारल्यामुळे व्यापारी तूट कमी करणे अधिकच कठीण झाले आहे. भाववाढीमुळे ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाल्याचे दिसून येते.

संदर्भ-

- जहागिरदार, दि.व्य. (2011). आर्थिक जगत (खंड -3),कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी संचालित, सेंटर फॉर एकॉनोमिक ॲन्ड सोशल स्टडीज, 12, गुलमोहर कॉलनी, कॅम्प, अमरावती.

- देशपांडे, विनायक आणि देशपांडे, श्रीधर (2004). भारतीय अर्थव्यवस्था ,हिमालया पब्लिशिंग हाउस, मुंबई, प्रथम आवृत्ती.
- टिपरसे, अशोक पुरभाजी. (2015). भारतातील भाववाढ परिणाम आणि भाववाढ नियंत्रण Val.-II, Issue-IX, Global Economic Research Journal, ISSN-2249-4081.
- https://data.worldbank.org/indicator/FP.CPI.TOTL.ZG?locations=OE
- https://hindi.news18.com/news/nation/history-of-inflation-in-India-since-1947-to-till-now-4205852.html
- https://scripbox.com/blog/history-of-inflation-in-india-and-what-to-expect-going-forward/

जागतिक आनंदी निर्देशांक आणि भारत

डॉ. समित माहोरे,
सहयोगी प्राध्यापक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

आज जगातील प्रत्येक देश जनतेला जास्तीत जास्त सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याकरिता अनेक देशांमध्ये जणू स्पर्धाच असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासूनच जनतेला वेगवेगळ्या सुविधा पुरविण्यावर भर देण्यात आला आहे. सरकार देशातील लोकांना अधिकाधिक सुविधा कशा पुरविता येतील यासाठी प्रयत्न करीत आहेत. अगदी सोप्या भाषेमध्ये सांगायचं झालं तर प्रत्येक देश कल्याणकारी राज्य निर्माण करण्याकरिता स्पर्धा करीत असल्याचे दिसून येते.

आज कल्याणकारी राज्याची संकल्पना बदलली आहे. सरकार सामान्यांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरविते यावरून जनतेला आनंदी ठेवण्याकरिता प्रयत्न केले जात आहे. आज वेगवेगळ्या घटकांचे मापन करण्याकरिता वेगवेगळ्या निर्देशांकांचा उपयोग करण्यात येतो. यूएनडीपी, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक आर्थिक परिषद, आशियाई विकास बँक यासारख्या अनेक जागतिक स्तरावरील संस्था विविध प्रकारच्या निर्देशांकांचे मापन दरवर्षी करीत असतात. अशाच प्रकारचा जागतिक आनंदी अहवाल मागील १० वर्षांपासून नियमित प्रकाशित केला जात आहे. हा अहवाल आंतरराष्टीय आनंदी दिनाचे औचित्य साधून दरवर्षी २० मार्चला प्रकाशित केला जातो झाले. यामध्ये जगातील जवळजवळ १५० देशांची आकडेवारी जाहीर करण्यात येते. मागील ३२ वर्षापासून UNDP मार्फत मानव विकास निर्देशांकांचे मापन नियमित केले जाते. आणि त्या संबंधित माहिती मानव विकास अहवालामध्ये यु. एन. डी. पी. मार्फत दरवर्षी प्रकाशित करण्यात येते. आज मानव विकास निर्देशांक हा जागतिक स्तरावरील एक महत्त्वपूर्ण निर्देशांक मानला जातो. हा निर्देशांक तयार करण्याकरिता आरोग्यदायी सुविधा, जगण्याचा दर्जा आणि ज्ञान या तीन घटकांचा उपयोग करण्यात येतो.

आनंद व सुखाचे मोजमाप

प्रत्येक व्यक्ती आपल्या जीवनामध्ये आनंद आणि समाधान शोधत असतो प्रत्येकाला

मिळणारा आनंद हा वेगवेगळ्या पातळीवर वेगवेगळा असू शकतो किंबहुना तो व्यक्ती परत्वे बदलतो. काही व्यक्तींना चांगलं आरोग्य असेल तर आनंद मिळतो, काहींची शरीर यष्टी चांगली असेल तर त्यामध्ये आनंद मिळतो, काहींना आपले जीवन सुरक्षित असेल तर त्यामध्ये आनंद मिळतो तर काहींना फिरायला जाण्यामध्ये आनंद मिळतो. तसेच लिहिणे, वाचणे, खेळणे, बोलणे, गाणे म्हणणे यासारख्या अनेक गोष्टींमध्ये कुठे ना कुठे आनंद मिळत असतो. आनंदाकडे वेगळ्या अर्थाने बघितले जाते. त्यामध्ये सामाजिक मूल्य शोधल्या जातात. म्हणूनच आज प्रत्येक व्यक्ती आपण आनंदी कसे राहतो याकरिता धडपडत असतो. आनंदी कसे रहावे याबद्दल अनेक लेख, पुस्तके - व्हिडिओ उपलब्ध आहेत. मोठमोठ्या ऑफिसेस संघटनांमध्ये आपले कर्मचारी आनंदी कसे राहतील याकरिता विशेष प्रेरणात्मक भाषणे, व्याख्याने, प्रशिक्षण आयोजित केले जातात. जेणेकरून कामाच्या ठिकाणी कर्मचारी आनंदी राहून अधिक उत्पादक कार्य करण्यास प्रवृत्त होईल. अनेक साधुसंतांनी सुद्धा आनंदी राहण्याचे मार्ग सांगितले आहेत. ज्याचे पालन आणि अनुकरण आपण सगळेच करीत असतो. जर एखादा व्यक्ती आनंदी असेल तर तो आपले कुटुंब आनंदी ठेवतो त्यामुळे समाज आनंद होतो व समाज आनंदी असेल तर शहर, राज्य आणि संपूर्ण देश आनंदी राहू शकतो. त्यामुळे सरकारसुद्धा देशातील व्यक्ती आनंदित कसे राहतील त्याकरिता त्यांना विविध सुविधा पुरवित असतात.

आनंद अहवाल (Happyness Report)

संशोधक, राज्यकर्ते आणि धोरणकर्त्यांनी आर्थिक निर्देशकांच्या पलीकडे कल्याणाचे महत्त्व ओळखले म्हणून आनंद निर्देशांकाच्या संकल्पनेने अल्पकाळातच लोकप्रियता मिळविली आहे. अनेक अनुभवाधिष्ठित अध्ययनावरून असे दिसून येते की सामाजिक संबंध, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरणीय गुणवत्ता यासारखे घटक लोकांच्या आनंद आणि जीवनशैलीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

आनंद निर्देशांक व्यापकपणे मान्यता प्राप्त जागतिक आनंद अहवाल आहे. हा अहवाल दरवर्षी २० मार्च या जागतिक आनंद दिनानिमित्त संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास सोल्यूशन्स नेटवर्कद्वारे दरवर्षी प्रकाशित केला जातो. हे दरडोई जीडीपी, सामाजिक समर्थन, निरोगी आयुर्मान, जीवनाची निवड, औदार्य आणि भ्रष्टाचाराच्या धारणेचा अभाव यासह आनंदात योगदान देणाऱ्या विविध घटकांवर आधारित निर्देशांकाचे मापन करून अहवाल सादर केल्या जाते .

आनंद निर्देशांक लोकसंख्येच्या कल्याण आणि जीवनशैलीबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करते. अहवालाच्या माध्यमाने धोरणकर्त्यांना लक्ष्य

निर्धारित करून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करणे शक्य जाते. आरोग्यसेवा, शिक्षण, सामाजिक समर्थन आणि पर्यावरण संवर्धन यासारख्या क्षेत्रात धोरणात्मक निर्णय आणि संसाधनांचे योग्य आवंटन करण्यास देखील मदत करते.

वास्तविकतः आनंदाचे मापन ही एक जटिल आणि व्यक्तिनिष्ठ क्रिया आहे. भिन्न अभ्यास संस्था आनंदाची गणना करण्यासाठी भिन्न पद्धती आणि निर्देशकांचा वापर करतात. याव्यतिरिक्त, अहवालाद्वारे आनंदाचे स्पष्टीकरण देण्यामध्ये सांस्कृतिक आणि वैयक्तिक तफावत दिसून येते. त्यामुळे त्यांची परस्पर तुलना करण्यात अनेक अडचणी येतात. ह्या अडचणी असूनही, आनंद निर्देशांक हे कल्याण समजून घेण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी उपयुक्त साधन आहे, कारण हे पारंपारिक आर्थिक उपायांच्या पलीकडे मानवी भरभराट होण्याबद्दल व्यापक दृष्टीकोन प्रदान करते.

पहिला जागतिक आनंदाचा अहवाल २०१२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. १५६ देशांमधील २००५ ते २०११ या काळात गॅलअप वर्ल्ड पोलच्या आकडेवारीवर हा अहवाल आधारित होता. दुसरा अहवाल, एसडीएसएनच्या संयुक्त विद्यमाने २०१० ते २०१२ च्या आकडेवारीवर आधारित होता. यामध्ये पहिल्या अहवालातील प्रमुख बदलांची नोंद घेण्यात आली होती. मागील दहा अहवालांचा उपयोग, स्थानिक आणि राष्ट्रीय सरकार आपल्या नागरिकांचे जीवन वाढविणारी धोरणे आकार देण्यासाठी करीत आहेत. पुढील तक्ता क्रमांक १ मध्ये २०२३ च्या जागतिक आनंदी अहवालातील पहिले दहा आणि शेवटच्या १० देशांचे मूल्य दिले आहे. २०२३ च्या क्रमवारीत भारताचा क्रमांक १२६ आहे.

अहवालात अर्थशास्त्र, न्यूरो सायन्स आणि आकडेवारीच्या तज्ञांचे विश्लेषण समाविष्ट असते. कल्याणचे मोजमाप देशाच्या प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी कसे वापरले जाऊ शकते यावर विशेष भर देण्यात येतो. व्यक्तींच्या संपूर्ण जीवनाचे सामान्य मूल्यांकन तसेच त्यांच्या भावनिक अनुभवांबद्दलचा समंक गोळा करून त्याचा विचार इथे केला जातो.

सहा चलांच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या निर्देशांकावरून देशातील जनतेच्या जीवनाचे मूल्यांकन केले जाते आणि ० ते १० च्या प्रमाणात निर्देशांक काढला जातो. २०२३च्या अहवालानुसार, फिनलंड सर्वात आनंदी देश असून सलग सहाव्यांदा तो पहिल्या स्थानावर आहे. डेन्मार्क दुसऱ्या स्थानावर तर आइसलँड या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र हा अहवाल आशियाई देशांसाठी निराशाजनक आहे. टॉप 20 आनंदी देशांच्या यादीत एकाही आशियाई देशाचा समावेश नाही.

तक्ता क्र. १

२०२३ च्या जागतिक आनंदी अहवालातील पहिले आणि शेवटचे दहा देश

क्रमांक	**देश**	**मूल्य**	**क्रमांक**	**देश**	**मूल्य**
१	फिनलंड	७.८०४	१३७	अफगाणिस्थान	१.८५९
२	डेन्मार्क	७.५८६	१३६	लेबनान	२.३९२
३	आइसलॅंड	७.५३	१३५	सियरा लॅोने	३.१३८
४	इस्राइल	७.४७३	१३४	झिम्बाब्वे	३.२०४
५	नेदरलॅंड	७.४०३	१३३	कोंगो	३.२०७
६	स्वीडन	७.३९५	१३२	बोटसवाना	३.४३५
७	नॉर्वे	७.३१५	१३१	मलावी	३.४९५
८	स्वित्झर्लंड	७.२४	१३०	कोमोरोस	३.५४५
९	लक्जमबर्ग	७.२२८	१२९	टांझानिया	३.६९४
१०	न्यूझीलॅंड	७.१२३	१२८	झामबिया	३.९८२
१२६	**भारत**	**४.६४**			

देशातील लोकांची जीवनशैली, त्यांचे राहणीमान, जीडीपी , सामाजिक आधार, कमी भ्रष्टाचार आणि एकमेकांविषयी असलेला आदर व प्रेमाची भावना यांचे मूल्यमापन करून जगातील सर्वात आनंदी देशांची यादी बनवली जाते. या सर्व निकषांच्या आधारावर जागतिक आनंदी अहवालामध्ये यावेळीही फिनलंडला आपल्या क्रमवारीत प्रथम स्थानी ठेवले आहे. मात्र अफगाणिस्तान हा देश या यादीत सर्वात खालच्या, १३७ व्या क्रमांकावर आहे.

आनंद निर्देशांक म्हणजे आनंदाचे मापन किंवा व्यक्तिनिष्ठ कल्याण निर्देशांक हे एक देशातील किंवा प्रदेशातील व्यक्ती किंवा लोकसंख्येच्या आनंद किंवा कल्याणचे मापन

करणारेसाधन आहे. आनंदात योगदान देणार्या विविध घटकांचा विचार करून लोकांच्या एकूण गुणवत्तेची आणि लोकांच्या व्यक्तिनिष्ठ अनुभवांचे मोजमाप करणे हा त्यामागचा उद्देश आहे. मागील १० वर्षापासून आनंद निर्देशांकाचे मापन करण्यात येत आहे. या निर्देशांकामध्ये पुढील सहा निर्देशकांचा समावेश केला जातो.

- **आर्थिक घटकः** यामध्ये उत्पन्नाची पातळी, रोजगाराचे दर आणि अन्न, निवारा आणि आरोग्यसेवा यासारख्या मूलभूत गरजा समाविष्ट आहेत.
- **सामाजिक घटकः** यामध्ये सामाजिक संबंधांची गुणवत्ता, समुदायिक समर्थन आणि समाजातील विश्वास आणि सुरक्षिततेची पातळी समाविष्ट आहे.
- **आरोग्य घटकः** यात शारीरिक आणि मानसिक कल्याणचे उपाय आहेत जसे की आयुर्मान, अपंगत्व दर आणि मानसिक आरोग्याच्या विकारांचे प्रमाण.
- **शैक्षणिक घटकः** हे शिक्षण, साक्षरता दर आणि एकूणच शैक्षणिक प्राप्तीशी संबंधित निर्देशकांचा विचार करतात.
- **पर्यावरणीय घटक:** यात नैसर्गिक वातावरणाची गुणवत्ता, हवा आणि जल प्रदूषण पातळी आणि हिरव्या आणि निसर्गरम्य जागांची उपलब्धता आणि प्रवेश यांचा समावेश होतो.
- **सांस्कृतिक घटकः** यामध्ये एखाद्याची सांस्कृतिक ओळख व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रियाकलापांमध्ये प्रवेश आणि सांस्कृतिक वारसा जतन यासारख्या घटकांचा समावेश आहे.

या विविध निर्देशकांकरीता समंक गोळा केले जातात आणि त्यावरून आनंद निर्देशांकाचे मापन केले जाते. निर्देशांकावरून संशोधक आणि धोरणकर्ते आनंदी निर्देशांकाचा सर्वांगीण विचार करून त्यामध्ये व्यक्ती आणि समाजातील लोकांची जीवनशैली सुधारण्यासाठी आनंदात योगदान देणारे आणि मार्गदर्शन करणारे घटक समजण्यास मदत करतात.

हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की वेगवेगळ्या संस्था आणि संशोधकांमध्ये आनंद निर्देशांक मोजण्यासाठी त्यांच्या स्वत: च्या पद्धती आणि विशिष्ट निर्देशक आहेत, त्यामुळे ते कसे मोजले जाते आणि कसे नोंदवले जाते यामध्ये भिन्नता दिसून येते.

आनंद निर्देशांक आणि महिला

लोकसंख्येमधील महिलांच्या कल्याण आणि आनंदावर प्रकाश टाकण्यात आनंद निर्देशांक आवश्यक भूमिका निभावतो. हे लिंग-

विशिष्ट घटकांचे महत्त्व आणि स्त्रियांच्या आनंदावर परिणाम करू शकणार्या अनुभवांचे महत्त्व ओळखते. स्त्रिया आणि आनंद निर्देशांक यासंबंधी काही महत्त्वाचे मुद्देआहेत. यावरून आनंद निर्देशांक आणि महिला यामधील संबंधाची कल्पना करता येते.

लिंग-विशिष्ट घटक: आनंद निर्देशांक महिलांच्या कल्याण आणि आनंदावर परिणाम करणारे लिंग-विशिष्ट घटक विचारात घेते. या घटकांमध्ये शिक्षण, रोजगाराच्या संधी, लिंग समानता, आरोग्य सेवा, सामाजिक समर्थन, सुरक्षा आणि निवडीचे स्वातंत्र्य समाविष्ट आहे. या घटकांचा विचार करून, आनंद निर्देशांक स्त्रियांना त्यांच्या आनंदाच्या शोधात असलेली आव्हाने आणि संधींवर प्रकाश टाकतो. आज समाजामध्ये स्त्री-पुरुष समानतेवर चर्चा केली जाते त्यांना समान अधिकार देण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षामध्ये त्यांची अंमलबजावणी होतेच असे नाही. अशी बरीच उदाहरणे आहेत ज्यामध्ये स्त्रियांच्या नावावर पुरुष निर्णय घेतात.

लिंग असमानता: आनंद निर्देशांक स्त्रियांच्या आनंदाच्या पातळीवर परिणाम करू शकणार्या लिंग असमानता ओळखण्यास आणि त्यांचे निराकरण करण्यास मदत करतो. शिक्षण, उत्पन्न, रोजगार आणि निर्णय घेण्याच्या शक्तीमधील लिंग असमानतेचा महिलांच्या कल्याणावर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. या असमानतेचे मोजमाप आणि देखरेख करून, धोरणकर्ते लैंगिक अंतर कमी करण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करू शकतात, ज्यामुळे स्त्रियांमध्ये आनंद सुधारण्यास योगदान मिळू शकते.

सशक्तीकरण : आनंद निर्देशांक आनंद वाढविण्यात महिलांच्या सक्षमीकरणाचे महत्त्व ओळखते. महिलांनी निवडी करण्याची क्षमता, स्वायत्तता आणि त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवणे यासारख्या घटकांमुळे त्यांच्या एकूण कल्याणात भर पडते. महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंधित निर्देशकांचा समावेश करून, आनंद निर्देशांक लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याचे आणि महिलांना परिपूर्ण जीवन जगण्यास सक्षम करण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

सामाजिक समर्थन आणि संबंध: आनंद निर्देशांक सामाजिक समर्थन आणि संबंधांची गुणवत्ता विचारात घेते, जे महिलांच्या आनंदासाठी विशेषतः महत्वाचे असू शकते. मजबूत सोशल नेटवर्क्स, सहाय्यक संबंध आणि समुदाय संसाधनांमध्ये प्रवेश महिलांच्या कल्याणावर सकारात्मक परिणाम करतात. महिलांच्या आनंदावर सामाजिक संबंधाचा प्रभाव समजून घेऊन, धोरणकर्ते हस्तक्षेप करून सामाजिक

सुसंवाद आणि समर्थन प्रणालीस प्रोत्साहित करतात.

छेदनबिंदू: आनंद निर्देशांक महिलांच्या अनुभवांच्या छेदनबिंदूची कबुली देतो. महिलांचे कल्याण लिंग, वंश, वांशिकता, सामाजिक-आर्थिक स्थिती आणि सभोवतालच्या परिमाणांसह अनेक घटकांच्या संयोजनाने प्रभावित होते. छेदनबिंदूच्या दृष्टीकोनाचा विचार करून, आनंद निर्देशांक महिलांच्या विविध अनुभवांबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करतो आणि महिलांच्या उपेक्षित गटांद्वारे उद्भवलेल्या विशिष्ट आव्हानांना निर्भीडपणे सामोरे जाण्यास मदत करते.

धोरणात्मक परिणाम:

आनंद निर्देशांक धोरणकर्त्यांना लिंग-प्रतिसाद देणारी धोरणे आणि हस्तक्षेप विकसित करण्यात मार्गदर्शन करतात. महिलांच्या आनंदात योगदान देणारे घटक समजून घेऊन, धोरणकर्ते लैंगिक समानता, आरोग्य सेवा, शिक्षण, सामाजिक संरक्षण आणि हिंसाचार प्रतिबंध यासारख्या क्षेत्रातील गुंतवणूकीला प्राधान्य देतात. यामुळे स्त्रियांमध्ये कल्याण आणि आनंदात सुधारणा होण्यास मदत होते.

हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की एकट्या आनंद निर्देशांक संपूर्णपणे महिलांच्या अनुभवांचे आकलन करू शकत नाही किंवा लैंगिक गतिशीलतेची गुंतागुंत प्रतिबिंबित करू शकत नाही. तथापि, हे महिलांच्या आनंद आणि कल्याणवर परिणाम करणारे अद्वितीय घटक समजून घेण्यासाठी आणि त्यास संबोधित करण्यासाठी एक मौल्यवान साधन म्हणून काम करते, शेवटी लिंग समानता आणि सर्वसमावेशक विकासामध्ये योगदान देते.

आनंद निर्देशांक आणि विकास

आनंद निर्देशांक आणि विकास अनेक मार्गांनी परस्पर जोडलेले आहे. जीडीपी आणि आर्थिक निर्देशक यासारख्या विकासाचे पारंपारिक उपाय प्रगतीचे मूल्यांकन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरले गेले आहेत, परंतु आनंद निर्देशांक एक पर्यायी दृष्टीकोनासह कल्याण आणि जीवनाच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करतो. आनंद निर्देशांक आणि विकास यांच्यातील संबंधित काही महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा इथे केली आहे.

विकासाचे आकलन विस्तृत करणे: आनंद निर्देशांक पूर्णपणे आर्थिक घटकांच्या पलीकडे विकासाची समज वाढवते. विकास केवळ आर्थिक संपत्तीपुरते मर्यादित असू नये परंतु सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक आणि पर्यावरणीय परिमाण देखील समाविष्ट केले पाहिजेत. व्यक्तिनिष्ठ कल्याण आणि आनंदाचा समावेश करून, निर्देशांक समग्र विकासाचे महत्त्व अधोरेखित करतो.

आर्थिक निर्देशकांचे पूरक: जीडीपी आणि आर्थिक वाढ ह्या विकासाच्या महत्त्वपूर्ण बाबी आहेत, परंतु ते लोकांच्या कल्याणाचे संपूर्ण चित्र दर्शवित नाहीत. आनंद निर्देशांक सामाजिक संबंध, आरोग्याचा निकाल, शिक्षण आणि पर्यावरणीय टिकाव यासारख्या घटकांचा विचार करून आर्थिक निर्देशकांची पूर्तता करतो. हे धोरणकर्त्यांना सुधारणांमुळे जीवनाची एकूण गुणवत्ता वाढू शकेल अशी क्षेत्रे ओळखण्यास मदत करते.

धोरण प्राधान्यक्रम: आनंद निर्देशांक धोरण ठरवितांना कल्याणात योगदान देणाऱ्या व संबंधित हस्तक्षेपांना प्राधान्य देण्यास मार्गदर्शन करू शकतो. सामाजिक समर्थन, शिक्षण आणि आरोग्य यासारख्या आनंदावर परिणाम करणारे घटक ओळखून, धोरणकर्ते संसाधनांचे वाटप करू शकतात, यामुळे अधिक लक्ष्यित आणि प्रभावी विकासाची रणनीती बनविणे शक्य होते.

मानवी-केंद्रित विकास: आनंद निर्देशांक लोकांना विकासाच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी ठेवण्यावर जोर देते. हे व्यक्तींच्या व्यक्तिनिष्ठ अनुभवांचे महत्त्व आणि कल्याणच्या समजुतीवर प्रकाश टाकते. विकासाच्या चौकटीत आनंद आणि कल्याण समाविष्ट करून, धोरणकर्ते मानवी-केंद्रित दृष्टिकोनांसाठी प्रयत्न करू शकतात जे लोकांचे जीवन आणि आनंद सुधारण्याचे एक महत्वाचे उद्दीष्ट आहे.

शाश्वत विकास: आनंद निर्देशांक पर्यावरणीय घटकांचा विचार करून आणि दीर्घकालीन कल्याणास प्रोत्साहन देऊन शाश्वत विकासाच्या तत्त्वांना अधोरेखित करते. पर्यावरणीय शाश्वतपणाच्या महत्त्वमुळे आणि लोकांच्या आनंदावर निरोगी वातावरणाचा सकारात्मक परिणाम ओळखतो. हे विकासाच्या धोरणामध्ये पर्यावरणीय उद्दीष्टांच्या एकत्रीकरणास आणि टिकाऊ पद्धतींचा पाठपुरावा करण्यास समर्थन देते.

विकासाच्या परिणामाचे मूल्यांकन करणे: आनंद निर्देशांक कल्याणावरील विकास उपक्रम आणि धोरणांच्या परिणामाचे मूल्यांकन करण्यासाठी एक साधन म्हणून कार्य करते. कालांतराने आनंदाच्या गुणांमधील मधील बदलांचे परीक्षण करून, धोरणकर्ते अवलंबविलेल्या धोरणात्मक निर्णयांचे मूल्यांकन करू शकतात आणि त्यानुसार त्यांची रणनीती समायोजित करू शकतात. समाजातील प्रत्यक्ष अनुभवावरून विकासाशी समाज निर्मिती करण्याकरिता योग्य निर्णय घेतले जाऊ शकतात.

आनंद निर्देशांक विकासाच्या व्यापक मूल्यांकनाचा फक्त एक घटक आहे. हे कल्याण आणि पारंपारिक उपाययोजना पूर्ण करण्याबद्दल

मौल्यवान दृष्टीकोन प्रदान करते, ज्यामुळे मानवी विकासाकरीत आवश्यक समजूतदारपणा, व्यक्ती - समाजांचे जीवन आणि जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक धोरणांचा अवलंब करण्यास प्रेरणा मिळते.

आनंदी निर्देशांक आणि भारत

भारताचा लोकसंख्येचे कल्याण आणि आनंदाच्या पातळीबद्दल जाणून घेण्याकरिता विविध आनंद अहवालांमध्ये समावेश केला गेला आहे. भारत आणि आनंद निर्देशांक संबंधित काही महत्त्वाचे मुद्दे येथे आहेत:

जागतिक आनंद अहवालः संयुक्त राष्ट्रांच्या शास्वत विकास सोल्यूशन्स नेटवर्कने (SDSN) दरवर्षी प्रकाशित केलेल्या जागतिक आनंद अहवालात भारताचा समावेश आहे. वर्षानुवर्षे भारताची स्थिती भिन्न राहिली आहे. भारत सामान्यत: जागतिक स्तरावर मध्यम श्रेणीत येते. अहवालात दरडोई जीडीपी, सामाजिक समर्थन, आयुर्मान, जीवनाची निवड करण्याचे स्वातंत्र्य, औदार्य आणि भ्रष्टाचाराची धारणा यासारख्या विविध बाबींचा विचार केला जातो.

अलिकडिल वर्षांत भारताने स्वतःचा राष्ट्रीय आनंद निर्देशांक देखील विकसित केला आहे. भारत सरकारने आपल्या नागरिकांच्या आनंद आणि कल्याणचे मोजमाप आणि मागोवा घेण्याचे उद्दीष्ट ठेवून एकूण राष्ट्रीय आनंद निर्देशांक सुरू केला. निर्देशांक आर्थिक कल्याण, सामाजिक समर्थन, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरणीय टिकाव यासारख्या मापदंडांचा विचार करतो. हे राष्ट्रीय निर्देशांक धोरण कल्याण आणि मार्गदर्शक विकासाच्या प्रयत्नांची विस्तृत माहिती प्राप्त करण्यास मदत करते.

भारत हा एक प्रादेशिक, सामाजिक - आर्थिक आणि सांस्कृतिक भिन्नता असणारा देश आहे. आनंदाची पातळी आणि कल्याण ही भारतातील राज्ये आणि लोकसंख्येमध्ये भिन्न असू शकतात. दारिद्र्य, असमानता, आरोग्य सेवा आणि शिक्षणाची उपलब्धता आणि पोहोच, सामाजिक समर्थन प्रणाली आणि सांस्कृतिक निकष यासारख्या घटकांमुळे आनंदाच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो. कल्याण सुधारण्यासाठी लक्ष्यित हस्तक्षेप आणि धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी या असमानता ओळखणे आवश्यक आहे तरच धोरणांची योग्य मांडणी आणि अंमलबजावणी केली जाऊ शकते.

भारतात आनंद निर्देशांक धोरणकर्त्यांना आनंद आणि कल्याणवर परिणाम करणाऱ्यां महत्वावपूर्ण घटकांची माहिती उपलब्ध करून दिली जाते. ही माहिती विशिष्ट आव्हानांना सामोरे जाणारी आणि एकूणच आनंदाला प्रोत्साहन देणारी आहे. धोरणकर्ते दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण,

आरोग्यसेवा, सामाजिक समावेश, पायाभूत सुविधांचा विकास आणि कल्याण वाढविण्यासाठी पर्यावरणीय शास्वत क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाते.

भारताशी संबंधित आनंद निर्देशांक सांस्कृतिक आणि सामाजिक घटकांचा देखील विचार करतात. पारंपारिक मूल्ये, सामाजिक संबंध, समुदाय समर्थन आणि सांस्कृतिक पद्धती आनंदाच्या पातळीवर परिणाम करतात. विकास रणनीतींमध्ये सांस्कृतिक परिमाण समाकलित केल्याने हे निश्चित होते की धोरणे ही योग्य असून लोकांच्या मूल्ये आणि गरजा पूर्ण करण्यावर भर देण्यात येतो. मागील काही वर्षातील आनंदी निर्देशांका मध्ये क्रमांक आणि मूल्य पुढील तक्ता क्रमांक २ मध्ये दिले आहे.

तक्ता क्र. २

जागतिक आनंदी अहवालातील भारताची कामगिरी

वर्ष	२०१५	२०१६	२०१७	२०१८	२०१९	२०२०	२०२१	२०२२	२०२३
निर्देशांकचे मूल्य	४.५७	४.४	४.३२	४.१९	४.०२	३.८२	३.७८	४.०४	४.६४

मर्यादा

आनंद निर्देशांक कल्याण आणि जीवनशैलीबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करीत असले तरी निर्देशांकाच्या काही विशिष्ट मर्यादा आहेत ज्या विचारात घ्याव्या लागतील.

व्यक्तिनिष्ठता: आनंद हा एक व्यक्तिनिष्ठ अनुभव आहे. आनंद निर्देशांकांमध्ये उपयोगात आणलेले समंक व्यक्तींची समज आणि निर्देशनावर अवलंबून असते. वेगवेगळ्या लोकांमध्ये वेगवेगळया व्याख्या आणि आनंदासाठी निकष असू शकतात, ज्यामुळे समंकाची अचूक तुलना करणे आणि एकत्रित करणे आव्हानात्मक बनते. सांस्कृतिक फरक, सामाजिक निकष आणि वैयक्तिक पक्षपात यासारख्या घटकांमध्ये स्वत: नोंदवलेल्या आनंदाच्या माहितीमध्ये बदल होऊ शकतो.

सांस्कृतिक आणि संदर्भात्मक भिन्नता: आनंदाचा प्रभाव सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भित घटकांद्वारे होतो, जो कदाचित सार्वत्रिक आनंद निर्देशांकाद्वारे व्यवस्थित व्यक्त केला जाऊ शकत नाही. समाजात संस्कृती आणि अद्वितीय मूल्ये, प्राधान्यक्रम आणि कल्याणचे समज भिन्न आहे. एकच निर्देशांक या भिन्नतेचा पूर्णपणे विचार

करू शकत नाही, परिणामी विविध लोकसंख्येमध्ये आनंदाचे मर्यादित प्रतिनिधित्व होते.

वस्तुनिष्ठ उपायांचा अभाव: आनंद निर्देशांक प्रामुख्याने नोंदवलेल्या सर्वेक्षणांवर अवलंबून असतात, जे प्रामुख्याने व्यक्तिनिष्ठ कल्याण दर्शवितात. व्यक्तिनिष्ठ कल्याण महत्त्वाचे असले तरी, उत्पन्नाची पातळी, आरोग्य सेवा आणि शिक्षण, पर्यावरणीय गुणवत्ता किंवा सामाजिक असमानता यासारख्या वस्तुनिष्ठ कल्याणाचा समावेश त्यामध्ये होत नाही. उद्दीष्टधारित निर्देशकांकडे दुर्लक्ष केल्याने कल्याणची अपूर्ण माहिती मिळू शकते.

दीर्घकालीन आणि ऐहिक विचार: आनंद निर्देशांक बर्याच वेळा विशिष्ट ठिकाणी आनंदाचा अभिलेखीत करतात. तथापि, व्यक्तींचा आनंद कालांतराने बदलू शकतो, जीवनातील घटना, परिस्थिती आणि सामाजिक-आर्थिक बदलांमुळे आनंद प्रभावित होतो. निर्देशांक दीर्घकालीन आनंदाच्या प्रवृत्तीचा पूर्णपणे अवलंब करू शकत नाहीत आणि कालांतराने आनंदाच्या पातळीत बदल अचूकपणे प्रतिबिंबित होऊ शकत नाहीत.

नमुना पूर्वाग्रह आणि प्रतिनिधित्व: आनंद सर्वेक्षणात नमुना पूर्वग्रह असू शकतो, कारण काही घटकांना अधोरेखित केले जाऊ शकते किंवा सर्वेक्षणातील लोकसंख्येमधून वगळले जाऊ शकते. परिणामी संपूर्ण आनंदाच्या पातळीचे पक्षपाती स्पष्टीकरण होते. परिणामांची विकृती टाळण्यासाठी विविध आणि प्रतिनिधीचे नमुने सुनिश्चित करणे महत्त्वपूर्ण आहे.

कार्यक्षम संबंधांचा अभाव: आनंद निर्देशांक आनंदाच्या पातळीचे विहंगावलोकन प्रदान करतात परंतु विशिष्ट घटक आणि आनंद यांच्यात कार्यकारण संबंध स्थापित करू शकत नाहीत. आनंद आणि विविध घटकांमधील परस्परसंबंध पाळले जातात, परंतु कार्यक्षमता स्थापित करणे जटिल आहे. उत्पन्न, सामाजिक समर्थन किंवा आरोग्य यासारखे घटक आनंदात योगदान देऊ शकतात, परंतु त्याविषयी देखील त्याचा प्रभाव पडू शकतो.

निर्देशकांची मर्यादित व्याप्ती: आनंद निर्देशांक सामान्यत: निर्देशकांच्या मर्यादित संचावर लक्ष केंद्रित करतात यामध्ये कल्याणवर परिणाम करणारे परिमाणांची संपूर्ण श्रेणी समाविष्ट होऊ शकत नाहीत. ते बर्याचदा व्यक्तिनिष्ठ कल्याणला प्राधान्य देतात आणि सामाजिक न्याय, पर्यावरणीय टिकाव किंवा सांस्कृतिक जतन यासारख्या जीवनातील इतर महत्त्वपूर्ण बाबींकडे दुर्लक्ष करू शकतात. अधिक व्यापक मूल्यांकन करण्यासाठी सूचकांची विस्तृत श्रेणी आवश्यक असते.

ह्या मर्यादा ओळखून, आनंद आणि कल्याणचा एक विशिष्ठ संयोग सुनिश्चित करणे महत्वाचे आहे. आनंद निर्देशांक अंतर्दृष्टी प्रदान करीत असताना, ते इतर निर्देशक आणि गुणात्मक संशोधनाच्या संयोगाने वापरले पाहिजेत त्यामुळे व्यक्तीच्या कल्याण आणि त्यामध्ये योगदान देणार्या घटकांची अधिक व्यापक संयोग साधने शक्य होते.

जागतिक आनंदी अहवालामधील भारताच्या क्रमांकाबाबत बरीच चर्चा करण्यात आली आहे. एका बाजूने भारत हा जगातील सर्वात जास्त वृद्धी दर असणारा देश आहे तर दुसऱ्या बाजूने अहवालातील भारताचा क्रमांक फार कमी आहे. तसेच भारताच्या शेजारील देश जे अनेक बाबतीत भारताच्या तुलनेत फार मागे असून आनंदी निर्देशांकाच्या क्रमवारीत त्यांचा क्रमांक पुढे असलेला दिसून येतो. त्यामुळे अहवाल पूर्णपणे चुकीची आहे असे म्हणणे योग्य नाही तर भारताचा अहवालातील क्रमांक पूर्णपणे बरोबरच आहे असे म्हणणे योग्य नाही. अहवालातील क्रमांक काही निर्देशकावर आधारित असून ते अत्यल्प आकडेवारी गोळकरून काढले जातात. प्रत्यक्षपणे आनंदाचे मोजमाप करणे फार कठीण आहे. त्याकरता वेगवेगळ्या निर्देशकांचा उपयोग केला जातो आणि त्यामध्ये अनेक अडचणी येतात. भारतामध्ये फार मोठ्या प्रमाणात उत्पन्नातील असमानता दिसून येते. तसेच भारतामध्ये पर्यावरण आणि आरोग्य संबंधीत पाहिजे त्या प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध नाही. भारतामध्ये जात, धर्म, लिंग याबाबत भेदभाव दिसून येतो. आजही भारतामध्ये, गरीबी, रोजगार, शिक्षण, आरोग्य, यासारख्या अनेक समस्या आहेत. अशा अनेक कारणांमुळे भारताच्या विकासामध्ये अडचणी निर्माण होतात. त्यामुळे अहवालातील सर्व निर्देशांक हे भारताला योग्यपणे सुचित करतात किंवा त्यावर पूर्णपणे अवलंबून राहणे योग्य नाही.

संदर्भ :

1. WHR (2023), “World Happiness Report 2023”, Sustainable Development Solutions Network.

नवीन शैक्षणिक धोरण: संधी आणि आव्हाने

डॉ. मृणालिनी तापस
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री निकेतन आर्टस कॉमर्स कॉलेज, नागपूर

प्रस्तावना:

कोणत्याही राष्ट्राचे भविष्य हे शिक्षण धोरणावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहत असते. राष्ट्रासाठीचे शिक्षण धोरण हे राष्ट्राच्या भविष्यासाठी विकासाचा एक मार्ग असतो. त्यामुळे शैक्षणिक धोरण आखतांना भविष्य लक्षात घेऊन आखणे गरजेचे आहे. शिक्षण धोरण म्हणजे त्या देशाच्या विकासाची दिशा असते. शिक्षण हे जीवन परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. या धोरणात आपल्या संस्कृतीचा समावेश आहे. शिक्षण आनंददायी करण्याबरोबर ते जीवनाभिमुख व रोजगाराभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना एकांगी शिक्षणाकडून बहुमुखी शिक्षणाकडे नेणारे आहे. हे धोरण म्हणजे शिक्षण क्षेत्राला नवे वळण देणारे आहे. देशातील युवापिढीच्या आकांक्षा आणि हित लक्षात घेऊन जग चैथ्या उद्योग क्रातीच्या उंबरठयावर असतांना वेगाने बदलत असलेली जागतिक आर्थिक रचना आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यांना तत्परतेने प्रतिसाद देणारे हे धोरण असल्याने त्याचे महत्त्व वेगळे आहे. भारताला ग्लोबल नॉलेज सुपरपावर बनविणे हे त्याचे एकमेव ध्येय आहे.

भारताने 21 व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक धोरण 29 जुलै 2020 ला जाहीर केले. पंतप्रधान मोदींच्या पहिल्या कार्यकाळात या धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला होता. 1986 नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहिर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या शिक्षण व्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध आव्हानांचा विचार करण्यात आला. आपण स्वातंत्र्याची 75 वर्षे पूर्ण केली आहे. विकसीत भारत बनविण्याच्या उद्देशाने तसेच भविष्यासाठी युवा पिढी घडविण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या धोरणाद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा योग्य वापर, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येणार आहे. असे हे दूरदर्शी धोरण आहे. या धोरणामुळे शिक्षण सर्वसमावेशक किफायतशीर, परवडण्याजोगे आणि न्याय होण्यास मदत होईल; यावर धर्मेन्द्र प्रधान यांनी भर दिला आहे.

उद्देश -

राष्ट्रांसमोर असणाऱ्या आव्हानांना समोर जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वात महत्वाचे संसाधन आहे. याचाच अर्थ जर राष्ट्रांतील नागरिक सक्षम असतील तर ते राष्ट्र आव्हानाचं रूपांतर संधीमध्ये करू शकतात. त्यामुळे राष्ट्रातील नागरिक हे सक्षम बनविण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपलं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवित असतो. आपल्या राष्ट्रासमोर बेरोजगारी, शिक्षण, पेयजल, भ्रष्टाचार, महागाई, ऊर्जा, पर्यावरण इत्यादी समस्या आहेत. या सर्व समस्यांचे मूळ शिक्षणात रूजलेलं आपल्याला दिसतं आणि त्यासाठीच या धोरणाची पायाभरणी करण्यात आलेली आहे. भारतात सर्वात पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968; दुसरे 1986, याच धोरणात 1992 साली काही सुधारणा करण्यात आल्या. 2009 मध्ये शिक्षण हक्क कायदा आला. 2013 मध्ये शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली.

नव्या शैक्षणिक धोरणाचा उपक्रम

नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येय दृष्टीकोन लक्षात घेऊन विविध क्षेत्रातील लोंकांमध्ये जागृकता निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात बुद्धीमत्तेसोबत आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. तसेच मातृभाषा व प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित *'बॅंक ऑफ क्रेडिट'* हा उपक्रम आणला आहे. या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षणातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले होऊ शकतील. याशिवाय या धोरणात इयत्ता 3री पर्यंत विद्यार्थ्यांचे वाचन,लेखन, संख्याशास्त्र शिकण्याची क्षमता सुधारण्यासाठी निपुण भारत मिशन , पहिलीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्याचा अभ्यासक्रम विद्या प्रवेश शिक्षण अध्यायनासाठीचे दिक्षा हे ॲप आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी निष्ठा हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम असे अनेक उपक्रम शिक्षकांसाठी सरकारद्वारे आणण्यात आले आहे. माध्यमिक स्तरावरील विषयाची निवड, संशोधन संस्थांची निर्मिती, शिक्षणाचे मूल्यमापन, भरती प्रक्रिया, एकात्मिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, शिक्षण आयोगाची स्थापना, कमी पटाच्या शाळा, नव्या अभ्यासक्रमाची रचना यासारख्या अनेक गोश्टींच्या बदलांचा विचारही महत्वाचा आहे.या धोरणात बालकांच्या वयाच्या तीन वर्षापासूनचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली आठ वर्ष अधिक महत्त्वाची असतात. या वयात सुमारे 80 ते 85 टक्के मेंदूचा विकास होतो. त्यामुळे या वयात मुलांच्या शिक्षणाचा विचार होणे गरजेचे आहे. पूर्वीच्या शिक्षण प्रणालीत 10+2+3 च्या आकृतिबंधाऐवजी 5+3+3+4 असा आकृतीबंध

स्वीकारण्यात आला आहे. या आकृतीबंधानुसार पहिले तीन वर्ष अंगणवाडी आणि पहिली दुसरीचे वर्ग यांचा एकत्रीत करून पायाभूत टप्पा म्हणून स्वीकारण्यात आला आहे. येथील अभ्यासक्रमाची तत्त्वे आणि आराखडा देखील केंद्राने निश्चित केला आहे. तिसरी ते पाचवी व सहावी ते आठवी आणि नववी ते बारावी असे टप्पे निर्धारित करण्यात आले आहे. तिसरीच्या आरंभीक टप्प्यावरती प्रत्येक विद्यार्थ्याला भाषीक व अंकीय साक्षरता प्राप्त करून देण्याचे उद्दिष्ट राखण्यात आले आहे. या उपक्रमांची अंमलबजावणी सत्ताधरी पक्षांची ज्या राज्यात सत्ता आहे, अशा मूठभर राज्यात करण्यात आली. 24 ऑगष्टला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरले आहे. अलीकडेच नव्या शैक्षणिक धोरणातील काही उपक्रमांची अंमलबजावणी मध्यप्रदेश व हिमाचल प्रदेश या राज्यांनी करून या मेगा पॉलिसीच्या अंमलबजावणीला हातभार लावला आहे. या अंमलबजावणीने जोर धरला आहे असे म्हणता येईल.

व्यावसायिक शिक्षण

भारतात यापूर्वी व्यावसायिक शिक्षणाला कधीही इतके महत्त्व देण्यात आले नव्हते. या नव्या शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता 6 वी पासून विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेणे बंधनकारक असणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एकतरी व्यावसायिक कौशल्य शिकावे अशी अपेक्षा या धोरणात करण्यात आली आहे. उच्च शिक्षणात प्रवेश हे व्यावसायिक शिक्षणावर अवलंबून असेल, जर एखाद्या विद्यार्थ्याने व्यावसायिक शिक्षण घेतले नसेल तर त्याला पुढील उच्च शिक्षण घेता येणार नाही. अशी तरतूद करण्यात आली आहे. व्यावसायिक शिक्षण घेणे अतिशय महत्वाचे आहे. व्यवसायीक शिक्षणाचे उद्दिष्ट हेच आहे की, विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा या दृष्टीने हे अत्यंत क्रांतीकारी पाऊल आहे. परंतु याची अंमलबजावणी करतांना केंद्रस्थानी असलेल्या शाळेने व व्यवस्थापनाने अधिक जबाबदारी उचलण्याची आवश्यकता आहे.

शिक्षण संकुलाची संकल्पना-

शिक्षण संकुल ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना नवीन शैक्षणिक धोरणात आहे. या शिक्षण संकुलाच्या केंद्रस्थानी सक्षम शाळा अथवा महाविद्यालये असतील. या संस्थेच्या भोवती असलेल्या दहा ते पंधरा शाळांना किंवा महाविद्यालयांना सक्षम बनविणे, त्यांना आवश्यक त्या तांत्रीक सुविधा उपलब्ध करून देणे, तज्ज्ञ शिक्षकाचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही संकुलातील प्रमुख शाळा महाविद्यालयांची जबाबदारी असणार आहे. पुरेसे शिक्षक आजूबाजूच्या शाळेत नसतील तर अशावेळी संकुल केद्रात असलेल्या शाळेत हे तज्ज्ञ व्यक्ती नेमले जावेत व त्यांचे वेळापत्रक अशाप्रकारे

आखावे की एकतर जवळच्या शाळेतील विद्यार्थी मार्गदर्शन घेण्यासाठी या केंद्रीय शाळेत येतील किंवा या तज्ज्ञ शिक्षकांना आजूबाजूच्या शाळांमध्ये जाऊन त्यांच्या विषयाचे प्रशिक्षण देता येईल. संकुलातील कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थी जो विषय निवडेल त्या महाविद्यालयात त्या तासासाठी त्याला उपस्थित राहावे लागेल. यातून विद्यार्थ्यांना निवड करण्याच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होतील. त्यातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडून येईल.

नव्या शैक्षणिक धोरणातील आव्हाने-

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरला तरी ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विकासाचा दृष्टीकोन लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे काम अवघड आहे. आपल्या देशात 15 लाखाहून अधिक शाळा, 25 करोड विद्यार्थी, 89 लाख शिक्षक कार्यरत आहे. भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. ए.आय.एच.एस.ई. 2019 च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास 1000 विद्यापीठे, 39,931 महाविद्यालये आणि 10,725 स्वायत्त संस्थामध्ये मिळून 3.74 करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्वांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे कठीण होणार आहे. राज्या राज्यात समन्वय साधणे फार माठे आव्हान आहे. या धोरणाची अंमलबजावणी केंद्र व राज्य सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून असते भारताच्या शिक्षण व्यवस्थेत आर्थिक बाबी कमी प्रमाणात आढळतात. म्हणजे निधी कमी प्रमाणात उपलब्ध आहे. संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे. नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे. असे असे डी. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनाच्या विशालतेला चालना देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांच्या नियामक संस्थामधील अंतर्गत क्षमता अपूर्ण आहे. पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षणाकडे जाण्यासाठी शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांसोबत शिक्षक, विद्यार्थी पालकांच्या दृष्टीकोनात बदल होणे गरजेचे आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी कायद्याचा समावेश करणे जरूरीचे आहे.

खाजगी क्षेत्र-

या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास 70 टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था

या खाजगी आहेत. एकूण संख्येच्या जवळपास 60 ते 70 टक्के विद्यार्थी खाजगी संस्थेत उच्च शिक्षण घेत आहे. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळविणे व मान्यता देणे ही महत्त्वाची बाब आहे. या धोरणात म्हटल्याप्रमाणे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या 6 टक्क्यांपर्यंत वाढवावे लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता याचा विचार केल्यास हे काम आव्हानात्मक असणार आहे.

सार्वजनिक खर्च-

समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपल्या युवकांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्याइतकी चांगली गुंतवणूक इतर कुठलीही नसल्याने; हे धोरण शिक्षणातील गुंतवणूक वाढविण्यासाठी बांधील आहे. उत्कृष्टतेसह शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यासंबधीत अनेक फायदे राष्ट्राला आणि अर्थव्यवस्थेला मिळवून देण्यासाठी ह्या धोरणाची आखणी केल्या गेली. या धोरणात, केंद्र व राज्य सरकार, सार्वजनिक गुंतवणूकीत लक्षणीय वाढ करण्याला समर्थन देत आहे. ही गुंतवणूक शैक्षणिक संसाधने, पोषणविषयक सहाय्य, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या आणि शिक्षक व कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या शिक्षकांचा विकास व वंचित, तसेच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास गटांसाठी न्याय आणि उच्च गुणवत्तेसाठीच्या शिक्षणाकरिता सर्व उपक्रमांना पाठबळ देणे महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने पायाभूत सुविधा आणि संसाधनाशी संबंधित एकदाच केल्या जाणाऱ्या खर्चा व्यतिरिक्त या धोरणात शिक्षण व्यवस्थेचा विकास साधण्याच्या हेतूने वित्तपुरवठा करण्यासाठी 8 क्षेत्रे निश्चित केली आहे. 1) बाल्यावस्था व संगोपन 2) पायाभूत साक्षरता 3) शाळा संकुल 4) अन्न व पोषण 5) शिक्षकांचा विकास 6) विद्यापिठांमध्ये सुधारणा करणे 7) संशोधन जोपासणे 8) तंत्रज्ञान व ऑनलाइन शिक्षण. भारतीय शिक्षणावर केला जाणारा खर्च अल्प निधी असतो. या धोरणात एकूण खर्चाच्या 20 टक्के व GDPच्या 6 टक्के शिक्षणावर खर्च करण्याचे ठरले आहे. राष्ट्रीय संशोधनासाठी सध्या GDPच्या 0.69 इतकी रक्कम उपलब्ध करून दिली आहे. 1968च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या 6 टक्क्यापर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र गेल्या चार दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या 3 टक्क्यापर्यंत पुढे नेता आला. ज्या वर्षी हे नवे शैक्षणिक धोरण आले, त्या वर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. 2020-21 मध्ये हा खर्च 99,311 कोटीवरून 2021-22 मध्ये 93,224 कोटी इतका कमी झाला. कोरोना काळात सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले. त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील

खर्चात कपात झाली. याबाबत कोणतेही दुमत नाही परंतु येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढविता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

फायदे-

1) सर्वांगीण विकास- हे धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. ज्यामध्ये संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि शारिरीक विकासाचा समावेश होतो.

2) लवचिक अभ्यासक्रम- हे धोरण एक लवचिक अभ्यासक्रम प्रदान करते. विद्यार्थ्यांना स्वतःच्या अभिरूचीनुसार विषयाची निवड करता येते. यात कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा, तंत्रज्ञान, वैद्यकीय यासारखे विषय येतील. चित्रकला ,संगीत, नृत्य, आयुर्वेद, योग, इंडॉलॉजी, मायथालॉजी अशा विविध विषयांचा समावेश असेल.

3) बहुविद्याशाखीय शिक्षण - हे धोरण बहुविषय शिक्षणास प्रोत्साहन देते याचा अर्थ विद्यार्थी विविध विषयांमध्ये किंवा क्षेत्रामध्ये अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात.

4) तंत्रज्ञानावर भर- शिक्षणातील तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखले आहे. अध्यापन आणि शिकण्यात तंत्रज्ञान वापराचे समर्थन केले आहे.

5) शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण- शिक्षण स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करणे. हे धोरणाचे उद्दिष्ट आहे.

आव्हाने -

1) अंमलबजावणीची आव्हाने - नवे शैक्षणिक धोरण 2020 हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. व हे एक सर्वसमावेशक धोरण आहे. ज्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वपूर्ण संसाधने आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे.

2) भाषेच्या समस्या- या धोरणात किमान इयत्ता 5वी पर्यंत शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषा व प्रादेशिक भाषा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे, जे या भाषेशी परिचीत नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी आव्हान निर्माण करू शकते.

3) निधी- या धोरणासाठी पायाभूत सुविधा शिक्षक प्रशिक्षण आणि संशोधनामध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक आवश्यक आहे. जे सरकारसाठी आर्थिक अनिश्चिततेच्या काळात आव्हान असू शकते.

4) प्रमाणीकरण- या धोरणाचे उद्दिष्ट देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण करणे आहे. ज्यामुळे संस्कृती आणि विविधतेचे एकसंधीकरण होऊ शकते.

5) शिक्षणातील असमानता- या धोरणाचे उद्दिष्ट ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी कमी करणे आहे. परंतु संसाधने आणि पायाभूत सुविधांमधील असमानता लक्षात घेता या ध्येयाची अंमलबजावणी करणे आव्हानात्मक असू शकते.

6) उच्च शिक्षणात बदल- या धोरणानुसार अनेक मोठे बदल सुचविलेले आहेत. संपूर्ण देशात 40 हजाराहून अधिक महाविद्यालये बंद करून सक्षम

अशी केवळ पंधरा हजार महाविद्यालये उच्च शिक्षणासाठी चालू ठेवण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे. या महाविद्यालयाची निवड करणे, त्याचबरोबर या महाविद्यालयांना प्रगत शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे, या महाविद्यालयांमध्ये प्रभावी संशोधन प्रकल्प करावेत यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे ही फार मोठी जबाबदारी शासनावर असणार आहे. जी महाविद्यालये बंद करावी लागणार आहेत त्यांच्या इमारती, अन्य साधनसामग्री, तेथे शिकविणारे शिक्षक यांचे समायोजन करावे लागणार आहे. त्यामुळे लगेच एखाद्या वर्षात हे बदल होतील अशी शक्यता कमी आहे. या धोरणानुसार विद्यापीठ व महाविद्यालये यांच्यातील सीमारेषा पुसून टाकण्यात येणार आहे. म्हणजे प्रत्येक महाविद्यालय एकतर केवळ उच्च शिक्षण देण्याचे काम करेल किंवा केवळ उच्च शिक्षण व संशोधन अशी दोन्ही कामे करेल किंवा केवळ संशोधनावर लक्ष केंद्रीत करेल. त्यातून महाविद्यालयातील प्राध्यापकांची क्षमता निश्चित वाढेल. संशोधनाची गुणवत्ता वाढेल. आवश्यक वाटेल त्या ठिकाणी संशोधनासाठी किंवा उच्च शिक्षण करण्यासाठी विदेशातील विद्यापीठे अथवा संशोधक यांच्याशी समन्वय करण्याची अनुमती त्या-त्या महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे. पीएच. डी. ला प्रवेश घेण्यापूर्वी त्या विषयाची काही लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा देऊन त्या विद्यार्थ्याला आपली पात्रता सिद्ध करावी लागेल. संशोधन केवळ नावापुरते किंवा पूर्वी केलेल्या एखाद्या कामाची पुनरावृत्ती असू नये. त्यातून समाजाच्या विकासासाठी अथवा समाजाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी काही मदत व्हावी. काही नवीन तंत्रज्ञान, उपकरणे या संशोधनातून उपलब्ध व्हावी या सर्व संशोधन प्रकल्पाचे कसून सर्वेक्षण करण्यात येईल व उत्तम प्रकारच्या संशोधनांना आर्थिक व अन्य सुविधांच्या माध्यमातुन प्रोत्साहन देण्यात येईल.

7) ऑलाईन व डिजीटल शिक्षण-

आधुनिक युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. यात देशाचा विकास घडवून आणण्यासाठी नवीन उपक्रमांची आवश्यकता आहे. दर्जेदार शिक्षणाची पर्यायी माध्यमे तयार ठेवणे गरजेचे झाले आहे. या संदर्भात तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या फायद्यांचा लाभ घेण्याचे महत्त्व राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ने मान्य करत तंत्रज्ञानाशी संबधीत जोखिमा आणि धोक्याची सुद्धा दखल घेतली आहे. ऑनलाईन शिक्षणातील तोटे दूर करत त्यापासून फायदे प्राप्त करण्याचा विचार केला जात आहे. सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यातील वर्तमान आणि भविष्यातील आव्हानांचा सामना करण्याकरिता विद्यमान डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ICT आधारित शैक्षणिक उपक्रमांचा दर्जा वाढवावा लागेल आणि त्यांचा विस्तार करावा लागेल.

8) योग्य प्रशिक्षणाची गरज-

प्रभावी ऑनलाईन प्रशिक्षक होण्यासाठी शिक्षकांना योग्य प्रशिक्षणाची आणि विकासाची गरज आहे.

पारंपरिक वर्गातील एक चांगला शिक्षक ऑनलाईन वर्गात तेवढीच चांगली कामगीरी करेल असे गृहीत धरता येणार नाही. अध्यापन शास्त्रातील आवश्यक बदलांसाठी तसेच आवश्यक मूल्याकंनासाठी वेगळया दृष्टीकोनाची गरज आहे. मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा आयोजित करण्यात अनेक आव्हाने आहेत. ऑनलाईन पद्धतीने विचारता येऊ शकणाऱ्या प्रश्नांनच्या प्रकारावर मर्यादा, नेटवर्क आणि वीजपुरवठा खंडीत होणे, परीक्षेतील अनैतीक प्रकार रोखणे, तसेच डिजीटल शिक्षणाच्या अवकाशात ललीत, कला, आणि विज्ञान प्रात्यक्षिके अशा प्रकारचा अभ्यासक्रमांना मर्यादा आहेत. ज्यावर नाविन्यपूर्ण उपायांनी काही प्रमाणात मात करता येऊ शकेल.

9) राज्य सरकारचे धोरण व सहकार्य-

राज्य सरकारने आपापले धोरण अजूनही निश्चित केलेले नाही. तसेच यासंबधीचे कायदे केलेले नाहीत. शिक्षण विभागात आवश्यक ते बदल केलेले नाहीत. ते झाल्यावरही एकाएकी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होऊ शकणार नाही कारण या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत समाजात अजूनही खूप गोंधळ आहे. म्हणून संस्थाचालक महाविद्यालयाचे प्रमुख पदाधिकारी यांच्या बैठकीतून हे नवीन शैक्षणिक धोरण सरकारला समजावून सांगावे लागेल. कारण हाच वर्ग धोरणाची अंमलबजावणी करणार आहे. त्यानंतर राज्य सरकारद्वारे सर्व स्तरापर्यंत हे बदल करण्याचा प्रयत्न करता येईल. देशभरात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात आणल्यानंतर शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडून येणार आहे.याच शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आता महाराष्ट्रात सुरू आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून जून 2023 पासून उच्च शिक्षण क्षेत्रात हे धोरण लागू होईल. हे धोरण मुख्यतः केद्र व राज्य शासनाच्या सहकार्यावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षामध्ये केंद्र व राज्य यांच्यातील संघर्ष पाहता केंद्राला काळजीपूर्वक पाऊले उचलावी लागणार आहे. तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. यावर ह्या धोरणाचे भवितव्य अवलंबून आहे.

10) भारतीय संस्कृती व परंपरा-

पूर्वीचे धोरण पाश्चिमात्य जीवनदर्शनावर आधारीत होते. त्याऐवजी भारतीय संस्कृती व परंपरा हा नवीन शिक्षणक्रमाचा व पुनर्रचनेचा पाया असेल. देशाचा विकास हा त्याच्या शैक्षणिक विकासाशी सुसंगत असतो. आजवर शैक्षणिक विकासाकडे शासनाने लक्ष दिले नव्हते. अजूनही देशाचा विकास योग्य प्रकारे झालेला नाही. आता नवीन शैक्षणिक धोरणाच्या स्वरूपात शासनाने शैक्षणिक परिवर्तनाचे मोठे पाऊल उचलले आहे. त्यास सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी तेवढ्याच ताकदीने प्रतिसाद दिला पाहिजे. हे केवळ शिक्षणाचाच नव्हे तर संपूर्ण देशाच्या परिवर्तनातील एक महत्त्वाचे पहिले पाऊल ठरेल.

नवे शैक्षणिक धोरण 2020 हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेवरील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे.

निष्कर्ष-

भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोव्हीड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखविले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रात होणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे. तर काही राज्ये प्रक्रियेतून जात आहेत.

थोडक्यात, नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देणे हे राज्यांच्या क्षमतेवर अवलंबून असते.

संदर्भसूची-

- www.orfonline.org
- https://www.mahamtb.com.Encyc
- https://dnyantarangini.com>
- https://creativelearning.co.in >educ
- https://mespune.in.new
- https://mr.quora.com
- https://www.esakal.com.kolhapur
- https://www.evivek.com>Encyc
- https://www.nitinsir.in>newnation
- https://www.samaveshitshikshan.com
- https://m.youtube.com>watch
- https://askmarathi.com.essay-on-n
- https://www.navdisha.co.in>blog
- https://www.aksharnama.com>client
- https://www.srjis.com>pages
- https://www.education.gov.in

भारताचा अर्थसंकल्प २०२३-२४

-डॉ. प्रशांत हरमकर
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
तिवसा, जि. अमरावती

प्रस्तावना :-

यावर्षी भारताचा अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी 2023 रोजी केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सादर केला. सलग पाचव्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या अर्थमंत्री ठरल्या आहे. कारोना साथी नंतर, रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर, जागतिक अर्थव्यवस्थेची स्थिती बिकट असतांना, महागाईचा दर वाढत असतांना, भारतीय अर्थव्यवस्थेला स्थैर्यासह विकासाचा वेग वाढण्याच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्प 2023-2024 मांडण्यात आला आहे.

अर्थसंकल्प 2023-2024 मांडत असतांना अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी आठ वेगवेगळ्या गटासोबत प्री-बजेट बैठक आयोजित करण्यात आली होती. अर्थसंकल्प तयार करण्याचा तो एक भाग असतो. महसुल विभाग, उद्योग संघटना, चेम्बर्स ऑफ कॉमर्स, शेतकरी संघटना, ट्रेड युनियन यांच्याशी पहिल्या भागामध्ये चर्चा केली जाते. दुसऱ्या भागामध्ये विविध मंत्रालये राज्य आणि केंद्रशासीत प्रदेश, स्वायत्ता संस्था, संरक्षण दल, आर्थिक व्यवहार विभाग यांच्याशी चर्चा करून परिपत्रके काढली जातात. या परिपत्रकामधून खर्चाचा अंदाज लक्षात घेतला जातो. यानंतर विविध विभागांना किती रक्कम देण्यात यावी यावर चर्चा केली जाते. याकरीता वित्त मंत्रालयाकडून आराखडा तयार केला जातो. ही सर्व अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी तयारी वित्त विभाग व अर्थमंत्री करित असतो.

अंदाजपत्रकाचा अर्थ व उद्दिष्ट :-

अंदाजपत्रक म्हणजे वित्तीय दस्ताऐवज असतो. यामध्ये जमा आणि खर्चाचा अंदाज व्यक्त केला जातो. याद्वारे नियोजित उत्पन्न व नियोजित खर्चाची मांडणी केली जाते. अंदाजपत्रक अथवा बजट अर्थव्यवस्थेचे यश आणि सुरक्षिततेचा आधारस्तंभ असतो. यामधून खर्च आणि उत्पन्न निर्मिती होते. आधिक्य बजट, संतुलित बजट आणि तुटीचे बजट हे तीन अंदाजपत्रकाचे प्रकार आहेत. बजटद्वारे वित्तीय लक्ष्यप्राप्ती अर्थपूर्ण खर्च करते, भविष्यासाठी बचती निर्माण करते, आपातकालीन निधी उभारते आणि खर्च करायच्या सवयीचे विश्लेषण केल्या जाते.

एका आर्थिक वर्षात उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन साध्य केल्या जाते. एकूणच आपण पैसा कसा निर्माण करणार आहोत आणि खर्च कशा पद्धतीने करणार आहोत याचे नियोजन म्हणजे बजट अथवा अंदाजपत्रक असते. सरकारला उत्पन्न हे कर आणि महसुल, सरकारी शुल्क आणि दंड लाभांश उत्पन्न, कर्जावरील व्याज इत्यादी स्वरूपात प्राप्त होते. या प्राप्त उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. विविध योजनाकरीता निधी आंवटित केल्या जातो. आर्थिक विकासाला गती दिल्या जाते, दारिद्रय आणि बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न केला जातो आणि पायाभुत सुविधा निर्माण केल्या जातात. अर्थसंकल्प प्रसिद्ध होण्याच्या एक दिवस पूर्व भारताचा आर्थिक पाहाणी अहवाल सादर केल्या जातो. यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची मागील आर्थिक वर्षातील स्थितीचा आढावा घेतला जातो. यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती समाधानकारक दर्शविली आहे.

2023-2024 च्या अंदाजपत्रकाचे विश्लेषण: -

अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी बजट 2023-2024 प्रथमत: अमृतकाळात प्रसिध्द होत असल्याचे म्हटले आहे. 2023-2024 चे अंदाजपत्रक म्हणजे यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या अंदाजपत्रकांना पुढाकार देऊन मांडणी केलेले अंदाजपत्रक आहे. यामधून संपन्न आणि सर्वसमावेशी भारत घडवून आणण्याचा दृष्टीकोन प्रस्तुत केला आहे. अर्थमंत्री आपल्या अभिभाषणात अशा म्हणाल्या की, विकासाची फळ सर्व प्रदेश व सर्व नागरीकांपर्यंत पोहचली पाहिजे. विशेषत: यामध्ये तरूण, स्त्रिया, शेतकरी, ओ.बी.सी., एस.सी. आणि एस.टी. वर्गाचा त्यांनी उल्लेख केला आहे.

भारतीय स्वातंत्र्याचे 75 वे वर्ष आपण मोठ्या उत्साहात साजरे केले. भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF) संस्थेने चमकणारा तारा (ध्रुवतारा) म्हणून मान्यता दिली आहे. 2023-2024 मध्ये आर्थिक वृद्धीचा दर 7 प्रतिशत राहील असे अनुमान अर्थमंत्र्यांनी व्यक्त केले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा हा वृद्धी दर प्रमुख अर्थव्यवस्थाच्या वृद्धी दरामध्ये उच्चतम पातळीचा मानला जातो. कोविड-19 आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात मंदी येऊ घातली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था योग्य दिशेने आणि मंदिचे आव्हान स्विकारण्यास तयार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला उज्वल भविष्य असल्याचा विश्वास अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी व्यक्त केला आहे.

अर्थमंत्र्याचे लक्ष हे आर्थिक सुधारणा आणि धोरणावर केंद्रित आहे. याला अनुसरून ‘सबका प्रयास’ अंतर्गत जनभागीदारी आणि गरजूना मदत करण्यात आली आहे. भारताचा जागतिक पातळीवर उदय होत असून अनेक बाबी

आपण संपादित केल्या आहे. जागतिक दर्जाच्या डिजिटियल सार्वजनिक पायाभूत सुविधा यामध्ये Co-Win, UPI आणि कोव्हिड लसीकरणाचा कार्यक्रम समुहाच्या पातळीवर राबविला आहे. भारताची संरक्षणात्मक भूमिका ही हवामान बदल मिशन लाईफ (Mission Life) आणि राष्ट्रीय हायड्रोजन मिशन बाबत राहिली आहे.

कोव्हिड-19 च्या काळात कोणीही उपाशी राहणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली होती. याकरिता गेल्या 28 महिन्यांपासून मोफत धान्य वाटपाचा कार्यक्रम राबविला आहे. याचा लाभ 80 कोटी लोकांना प्राप्त झाला आहे. यामुळे अन्न आणि पोषण सुरक्षितता प्राप्त करून देण्यामध्ये आपण यशस्वी होऊ शकलो आहे. ऐवढेच नाही तर 1 जानेवारी 2023 पासून प्रधानमंत्री गरिब कल्याण अन्न योजनेंतर्गत अन्न आणि पोषण सुरक्षितता दिल्या जाणार आहे. यावर केंद्र सरकारचा 2 लाख कोटी रू. खर्च होणार आहे.

यावर्षी G-20 चे अध्यक्षपद भारताला प्राप्त झाले आहे. ही भारताकरिता अद्वितीय व सामर्थ्य वाढविणारी बाब आहे. यामुळे जागतिक पातळीवर भारताची भूमिका महत्वाची ठरणार आहे. G-20 चे ब्रीद अथवा घोषवाक्य ‘वसुधैव कुटूंबकम्ब’ आहे. यामधुन आपण आपल्या महत्वाकाक्षांना मार्गदर्शन करणार आहोत. सामुहिक-केंद्रिय कार्यक्रमपत्रिका ही जागतिक आव्हानांना संबोधित करणार आहे. यामधुन शाश्वत आर्थिक विकासाची सुविधा निर्माण केल्या जाणार आहे.

संपादन 2014 ते 2023 पर्यंतच्या अंदाजपत्रकामधुन :-

2014 पासून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सरकार अस्तित्वात आले. मोदींच्या आर्थिक धोरणांनी काय साध्य केले याचा शोध घेतला तर लोकांना चांगले जीवनमान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रति व्यक्ती उत्पन्न 1.97 लाख रू. पर्यंत पोहचले आहे. जागतिक क्रमवारी मध्ये भारतीय अर्थव्यवस्था 10 व्या क्रमांकावरून 5 व्या क्रमांकावर पोहचली आहे. विविध व्यवसायाकरिता चांगले वातावरण निर्माण करून शाश्वत विकास साध्य करण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे. EPFO चे सदस्य 27 कोटी लोक आहेत. 7,400 कोटी रू. डिजिटीयल पेमेंट झालेले आहे. तर 126 लाख कोटी रू. UPI अंतर्गत डिजिटीयल ट्रांजेक्शन झालेले आहे.

समावेशी विकासाच्या योजना यशस्वी झाल्या आहे. विशेषत: यामध्ये स्वच्छ भारत मिशन, उज्वला योजना , कोव्हिड लसीकरण 102 कोटी लोकांना यशस्वीपणे झाले, पी.एम. जनधन योजनेतंर्गत 47.8 कोटी रू. जमा करण्यात आले. पी.एम. सुरक्षा विमा आणि पी.एम. जीवनज्योती योजनेंतर्गत 44.6 कोटी लोकांना विमा सुरक्षितता प्रदान करण्यात आली. पी.एम. किसान निधी अंतर्गत 11.4 कोटी देण्यात आले. प्रत्यक्ष

शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये 2.2 लाख कोटी रू. हस्तांतरण करण्यात आले.

अमृतकाळ : स्वातंत्र्याची 75 वर्ष :-

वित्तीय क्षेत्राला प्रबळ करण्याकरिता तंत्रज्ञान वाहक आणि ज्ञानाधिष्टित अर्थव्यवस्थेसह सबळ सार्वजनिक वित्तीय क्षेत्र करायचे आहे. जनभागीदारीमधून सबका साथ सबका विकास करायचा आहे. हे अर्थसंकल्पाचे मूलतत्त्व आहे. या अर्थसंकल्पाची प्रमुख तीन उद्दिष्ट्ये आहेत. यामध्ये नागरीकांसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध करून देणे. विशेषत: यामध्ये युवा वर्गावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. दुसरे उद्दिष्ट सबळ वेगवान आर्थिक वृद्धी आणि रोजगार निर्मिती करणे, तिसरे उद्दिष्ट समष्टी आर्थिक स्थैर्यता निर्माण करण्याचे सामर्थ्य वाढविण्याचे आहे. स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करतांना भारत कसा असेल याचा पाया अर्थसंकल्पात रुजवला आहे. याकरिता अमृतकाळाची सप्तर्षी नियमावली प्रस्तुत केली आहे. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पटलावरचा चमकता तारा (ध्रुवतारा) आहे. या चकाकणाऱ्या ताऱ्याची चमक सातत्याने वाढविण्याकरिता व त्याचे स्थान अबाधित राखण्याकरिता सप्तीर्षीची मांडणी व विश्लेषण अर्थमंत्र्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

1) समावेशी विकास (Inclusive Growth): -

शासनाचे मुलभूत तत्व ‘सबका साथ, सबका विकास’ आहे. यांतर्गत समावेशी विकासाला अंतर्भूत करण्यात आले आहे. यामुळे आर्थिक विकासामध्ये वंचित आणि दुर्बळ घटकांना प्राथमिकता दिल्या जाणार आहे. दिर्घकालीन गुंतवणुकीवर भर दिला गेला आहे.

2) वंचिताची पोहोच (Reaching Last mail): - यांतर्गत आयुष, मत्स व्यवसाय, पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय, कौशल्य विकास, जलशक्ती आणि सहकार, सिंचनाला सहाय्य, शाळांना सहाय्य, डिजिटायझेशन यावर लक्ष केंद्रित केल्या जाणार आहे.

3) पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक: -

पायाभुत सुविधा मधील गुंतवणुक वाढवली तर ती उत्पादक क्षमता सुधारते. याचा आर्थिक वृद्धी व रोजगारावर गुणक परिणाम दिसून येतो. यांतर्गत खाजगी गुंतवणूक वाढवायची आहे. कोव्हीड-19 नंतर गुंतवणूक वाढवून सृष्ट चक्र निर्माण करायचे आहे. परिणामत: यामधून रोजगार निर्मती घडवून आणायची आहे.

4) क्षमता विकास (Unleashing the Potential): -

सुशासन निर्माण करायचे आहे. सुशासन राष्ट्राच्या प्रगतीचा गाभा आहे. शासनाचे कार्य पारदर्शक व्यवहार आणि प्रशासनाचे मापण यांच्याशी बांधिलकी जपणारे आहे. अशा प्रकारचे कार्य सामान्य माणसाचे जीवनमान उंचावते आणि कल्याण घडवून आणते.

5) हरित वृद्धी (Green Growth): -

पर्यावरणाशी संतुलित जीवनशैलीवर भर द्यायचा आहे. पर्यावरण जागरूक जीवनशैली चळवळीला प्रेरणा द्यायची आहे. एकूण शुन्य कार्बन उत्सर्जन कार्यक्रम इ.स. 2070 पर्यंत राबवायचा आहे. यांतर्गत हरित उद्योग आणि आर्थिक संक्रमण घडून येणार आहे. यामधून हरित वृद्धीवर लक्ष्य केंद्रित केल्या जाणार आहे.

6) युवा शक्ती (Yooth Power): -

युवकांना सक्षम करण्याकरिता अमृतपेढी मदत करणार आहे. युवा शक्तीला अमृत पेटी म्हणून संबोधले आहे. युवकाच्या स्वप्नांना वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. याकरिता नवीन शैक्षणिक धोरणाची मांडणी केली आहे. या शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याला अनुसरून आर्थिक धोरणे आणि रोजगार निर्मिती केल्या जाईल व व्यावसायिक संधी निर्माण केल्या जाणार आहे.

7) वित्तीय क्षेत्र (Financial Sector): -

वित्तीय क्षेत्रामधील सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा नवप्रवर्तनीय उपयोग यामुळे वित्तीय समावेशनामध्ये पुढाकार घेतला जाईल. वित्तीय समावेशनामधून वित्तीय बाजारामधील सहभाग, कर्जामधील प्रवेश, सेवाच्या प्रस्तुतीकरणाचे मापण, योग्यता आधिक्याने वेगवान केल्या जाणार आहे.

अंदाजपत्रक 2023-2024 मध्ये वरिल सात प्राथमिकताचा स्विकार केला आहे. या सात प्राथमिकता एकमेकिंना पूरक आहे. यांना सप्तर्षी म्हणून संबोधले आहे. हि सप्तर्षी अमृतकाळ ते शताब्दी काळ (2023-2047) याकरिता लागू केली आहे.

अंदाजपत्रकाचे उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण :-

केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024 सादर करतांना अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी केंद्रिय अंदाजपत्रकाचा आकार 45.03 लाख कोटी रू. असल्याचे म्हटले आहे. शासन उत्पन्न प्राप्ती आणि खर्च कशा प्रकारे करणार आहे याचे विवेचन पुढील तक्ता क्र. १ च्या आधारे करणार आहोत.

2023-2024 च्या अंदाजपत्रकामध्ये शासनाला करापासून 33.60 कोटी रू. उत्पन्न मिळण्याचे अनुमान आहे. हे उत्पन्न वस्तु व सेवाकर, उत्पादन शुल्क, निगम कर, आयात व निर्यात कर आणि इतर स्त्रोतापासून प्राप्त होणार आहे. सर्वात जास्त उत्पन्न वस्तू आणि सेवा करामधून 9.56 लाख कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. निगम कर 9.22 लाख कोटी रू. उत्पन्न कर 9 लाख कोटी रू. करेत्तर उत्पन्न 3.01 लाख कोटी रू., भांडवलावरील उत्पन्न 84 हजार कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. 2023-2024 च्या अंदाजपत्रकामध्ये शासनाला करापासून 33.60 कोटी रू. उत्पन्न मिळण्याचे अनुमान आहे. हे उत्पन्न वस्तु व सेवाकर, उत्पादन शुल्क, निगम कर, आयात व निर्यात कर आणि इतर स्त्रोतापासून प्राप्त होणार आहे. सर्वात जास्त उत्पन्न वस्तू आणि सेवा करामधून 9.56 लाख कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. निगम कर 9.22 लाख

कोटी रू. उत्पन्न कर 9 लाख कोटी रू. करेत्तर उत्पन्न 3.01 लाख कोटी रू., भांडवलावरील उत्पन्न 84 हजार कोटी रू. प्राप्त होण्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

तक्ता क्र. १

केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024

उत्पन्न व खर्च

अ.क्र.	महसुली उत्पन्न	प्रतिशत	अ.क्र.	महसुली खर्च	प्रतिशत
1.	ऋण आणि प्रतिभूती	34%	1.	व्याज देणे	20%
2.	करेत्तर प्राप्ती	6%	2.	केंद्रिय सहाय्यित योजना	9%
3.	ऋणेत्तर भांडवल प्राप्ती	2%	3.	अर्थसहाय्य	8%
4.	आयात व निर्यात	4%	4.	संरक्षण	8%
5.	वस्तू व सेवा कर	17%	5.	केंद्राच्या योजना	17%
6.	निगम कर	15%	6.	वित्त आयोग व इतर	9%
7.	उत्पादन शुल्क	7%	7.	कर आणि शुल्क	18%
	(महसुली खर्च)			**राज्याचा वाटा**	
8.	उत्पन्न कर	15%	8.	इतर खर्च	8%
			9.	पेंशन	4%
	एकूण उत्पन्न	**100 %**		**एकूण खर्च**	**100%**

स्रोत- Key feature of budget २०२३-२०२४ Govt. of India

शासनाला उत्पन्न प्राप्ती होते तसाच वेगवेगळ्या विभागावर खर्च देखील करावा लागतो. अंदाजपत्रकामध्ये शासन संरक्षणावर 5.14 लाख कोटी रू, पायाभूत सुविधांवर 5.1 लाख कोटी रू, अन्न आणि सार्वजनिक वितरण 2.06 लाख कोटी रू, गृह खाते 1.96 लाख कोटी रू, रसायने, खते 1.78 लाख कोटी रू, कृषी आणि ग्रामिण विकास 2.85 लाख कोटी रू. तर दळणवळणावर 1.23 लाख कोटी रू. खर्च केल्या जाणार आहे.

वरिल विवेचनावरून लक्षात येते की, सरकारला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापेक्षा खर्च हा जास्त करावा लागणार आहे. याकरिता सरकार बाजारातून कर्ज घेते. यामुळे सरकारची वित्तीय तुट वाढते. अंदाजपत्रकामध्ये तुट 17.86 लाख कोटी

रू. आहे. वित्तीय तुट जीडीपी च्या 6.4 प्रतिशत आहे. प्रत्यक्षात ही राजकोषीय तुट 3 ते 3.5 प्रतिशत असायला पाहिजे आहे. म्हणजेच राजकोषीय तुटीचे प्रमाण जवळपास 2.9 प्रतिशतने जास्त आहे. एकूण उत्पन्नाच्या तुलनेत एकूण खर्चाचा विचार केला तर वित्तीय तुट 37 प्रतिशतने जास्त आहे. राजकोषीय नियमनाच्या दृष्टिकोणातुन ही वित्तीय तुट फार जास्त आहे. म्हणून (1) शासनाला उत्पन्न वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. (2) उत्पनाचे नविन स्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. (3) निगम कर वाढविण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे. पण सरकार निगमांना झुकते माप देत आहे.

गेल्या नऊ वर्षापासुन (2014 ते 2022) भारतीय अर्थव्यवस्थेने उदय पावणारी अर्थव्यवस्था म्हणून जागतिक पातळीवर स्थान प्राप्त केले आहे. गेल्या नऊ वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा सरासरी आर्थिक वृद्धीचा दर 6 ते 7 प्रतिशत राहिला आहे. आता उदय पावणारी अर्थव्यवस्था हे स्थान मागे टाकून चमकता तारा (ध्रुवतारा) म्हणून नवी ओळख भारतीय अर्थव्यवस्थेने निर्माण केली आहे. मेक इन इंडिया, हवामान बदल, कोव्हिड-19 शी दिलेला लढा यामुळे भारताला नवी आशा आणि आत्मविश्वास निर्माण झालेला आहे.

महत्वाचे म्हणजे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात वाढ घडून आलेली आहे. यामध्ये समाजाचा प्रत्येक घटक आणि वृद्धीचा प्रत्येक पैलू समाविष्ट आहे. भारताची जागतिक क्रमवारीमध्ये सुधारणा झालेली आहे. World Bank Final Case of doing च्या निर्देशांकामध्ये भारत हा 142 व्या स्थानावर होता. यामध्ये सुधारणा होऊन आता 63 व्या क्रमांकावर पोहचला आहे. शेतकऱ्यांकरीता 2.25 लाख कोटी रू. वित्तीय सहाय्य आणि दोन कोव्हिड-19 विरोधी लसीचे भारताने केलेले उत्पादन (Covaxin आणि Covidshild) यामधुन आत्मनिर्भर भारताचा नवीन अध्याय सुरू झाला आहे. या दृष्टिकोनाची पुष्टी 2023-2024 च्या अंदाजपत्रकातून मिळते. सध्या जग हे अरिष्टामधून पुढे जात आहे. या अरिष्टांचा सामना करण्याकरिता भारतीय व्युहरचना अमृतकाळ ते शताब्दी काळ राहणार आहे. यामधुन भारताच्या सामर्थ्याची बांधणी केल्या जात आहे. उच्च उदयमशील क्षमता निर्माण केल्या जात आहे. सबळ राजनयाचा याला आधार राहणार आहे. जागतिक पातळीवर भारताचा सांस्कृतिक पुर्नउदय घडून येत आहे. या अंदाजपत्रकाला सप्तर्षीचा आधार आहे. धोरणाची निर्मिती व प्रत्यक्ष वापर हा लढा देण्याचा विश्वास निर्माण करणारा आहे.

पायाभूत विकास :-

पायाभूत विकास हा आर्थिक वृद्धीचा केंद्रबिंदू आहे. पायाभूत सुविधामधील गुंतवणुकीमुळे रोजगार आणि उपभोगाला चालना मिळणार आहे. 2023-2024 च्या अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चाची तरतूद

(गुंतवणूक) एकूण खर्चाच्या 33 प्रतिशत करण्यत आली आहे. भांडवली खर्चमध्ये वाढ 10 लक्ष कोटी रू. नी केलेली आहे. रेल्वेच्या भांडवली खर्चामध्ये सर्वात जास्त वाढ केली आहे. ही वाढ 48 प्रतिशत आहे. हा भांडवली खर्च 2.4 लाख कोटी रू. राहणार आहे.

आर्थिक विकासाचा वेग वाढावा याकरिता 100 पेक्षा जास्त वाहतून प्रकल्प, बंदरे, कोळसा, पोलाद, खते आणि अन्नधान्य क्षेत्राकरिता निर्माण केल्या जाणार आहे. याकरिता 75,000 कोटी रू. गुंतवणूक केल्या जाणार आहे. यामध्ये 15,000 कोटी रू. गुंतवणूक खाजगी क्षेत्राची राहणार आहे. याला जोडून 50 एअरपोर्ट, हेलिपॅड, Water aerodromes, Advanced Janding & grownds निर्माण करण्याचे लक्ष 100 पर्यंत आहे. यामुळे सामान्य माणसासाठी प्रवेशित व किफायतशीर विमान प्रवास करण्याचे स्वप्न खरे ठरणार आहे.

सामाजिक सुरक्षितता :-

राष्ट्राच्या बांधणीमध्ये सहभागी होवून सिमांत लोकांकरिता सुरक्षा जाळे निर्माण करून दुर्बळ व वंचिताना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. पी.एम. आवास योजनेअंतर्गत लोकांना आवासाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. याकरिता 500 गटांची ओळख निर्माण करण्यात आली आहे. ही ओळख महत्वाकांक्षी गट कार्यक्रमामधून देण्यात आली आहे. यांतर्गत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि घराच्या सुविधाची निर्मिती करण्यात आलेली आहे. शासनाने अंदाजपत्रकामधून वंचित व दुर्बळाना विविध सुविधामध्ये प्रवेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

जन-जीवन मिशनकरिता 70,000 कोटी रू. आंवटित करण्यात आले आहे. उपाशीपोटी कोणी झोपू नये याकरिता अन्नधान्याच्या पुरवठ्याची तरतुद करण्यात आली आहे. याचा पुरावा 80 कोटी लाभार्थींना झालेला आहे. शासन आर्थिक वृध्दीच्या कार्यक्रमपत्रिकेमध्ये सर्वसमावेशकतेला बिंबवत आहे. PM-PVTG (असुरक्षित आदिवासी समुह) याकरिता 15,000 कोटी रू. आंवटित करण्यात आले आहे. विकासाचे ध्येय शाश्वत जीविकेच्या संधी निर्माण करणे याकरिता शिक्षण, आरोग्य व पोषण, रस्ते व दूरसंचार क्षेत्राचा विकास वेगाने घडवून आणायचा आहे.

युवा विकास :-

जनभागीदारीमध्ये विकासाला वाहून घेतल्या जाणार आहे. देशाला युवा शक्तीवर मोठा विश्वास आहे. श्रमशक्तीचे प्रतिबिंब म्हणजे शिक्षण होय. शिक्षणावरचे आवंटन वाढविलेले आहे. सोबतच प्रशिक्षणावरचा भर वाढविलेला आहे. पी.एम. कौशल्य विकास योजना 4.0 मध्ये स्टायपेंड (Stipend) सहाय्य म्हणून पुरेशा प्रमाणात पुरवल्या जाणार आहे. युवकांकरिता India

National Apprenticeship Promotion Scheme राबविल्या जाणार आहे.

Unified Skill India Digital Platfrom ची संकल्पना राबविल्या जाणार आहे. कौशल्यासाठी Digitl Ecosystem चा विस्तार केल्या जाणार आहे. मागणी आधारीत सामान्य कौशल्याला सक्षम करणे, सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगामध्ये रोजगार निर्मिती करणे. उद्योगामध्ये प्रवेश करण्याकरीता सुविधा पूर्ण योजनांची निर्मिती करणे, 5-जी च्या सेवा देण्याकरिता 100 प्रयोगशाळा विकसित करणे याकरिता अभियांत्रिकी संस्था कडून प्रत्यक्ष नवीन संधीचा विकास आणि प्रारूपाची मांडणी केल्या जाणार आहे.

कृषी क्षेत्र व संरक्षण क्षेत्र :-

कृषी क्षेत्रामध्ये डिजिटियल संरचनाच्या वृद्धीवर बजट मध्ये भर दिलेला आहे. याकरिता कृषी प्रवेग निधी उभारल्या जाणार आहे. याद्वारे शेतकऱ्यांना किफायतशीर प्रवेश तंत्रज्ञानामध्ये मिळण्याचा विश्वास अर्थमंत्र्यांनी दर्शविला आहे. उत्पादन वाढीबरोबरच स्थानिक पातळीवर कृषी माल साठवणुकीची व्यवस्था करणे, ज्वारी, बाजरी, मका, यासारख्या भरड धान्याचे प्रमुख केंद्र म्हणून भारताला तयार करण्याची कल्पना व अंमलबजावणी केल्या जाणार आहे.

संरक्षण विभागावर विशेष लक्ष दिलेले आहे. संरक्षण खर्चामध्ये 20 प्रतिशतने वाढ केलेली आहे. या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षणावर एकूण 5.94 लाख कोटी खर्च करण्याची तरतूद केली आहे. यापैकी शस्त्रात्र खरेदीसाठी 1.62 लाख कोटी रू. ची तरतूद केली आहे. यामध्ये लढाऊ विमाने, युद्ध नौका आणि संरक्षण सामग्रीचा समावेश आहे. चीन सारख्या शेजारी राष्ट्राच्या वाढत्या राष्ट्रविरोधी कृती लक्षात घेऊन हा खर्च वाढविणे आवश्यक आहे.

सक्षम आणि समावेशी अर्थव्यवस्था :-

अमृतकळाचा दृष्टिकोन हा ज्ञानाधिष्टित अर्थव्यवस्थेचा आहे. यासह सबळ सार्वजनिक वित्त आणि वित्तीय क्षेत्राला मजबूत करायचे आहे. याला संपादित करण्याकरिता जनभागीदारी कडून सबका साथ सबका विकास प्रयास आवश्यक आहे.

आर्थिक विकास कार्यक्रम पत्रिकेला संपादित करण्याच्या दृष्टीकोनावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यक आहे. हे लक्ष प्रामुख्याने तीन घटकावर अवलंबून आहे. अ) नागरीकांसाठी सुविधांची संधी मोठ्या प्रमाणात निर्माण करणे. विशेषत: यामधून युवा वर्गाच्या आकांक्षा परिपूर्ण होतील. ब) आर्थिक वृद्धी आणि रोजगार निर्माण करण्याकरिता सबळ प्रेरणाची तरतूद करणे. क) समष्टी आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणे.

आपले आर्थिक वृद्धी व विकासाचे ध्येय स्वातंत्र्याच्या 100 व्या वर्षापर्यंत लक्ष्य केंद्रित करणारे आहे. खाली दिलेल्या चार संधी निर्माण करतांना अमृतकाळाच्या दरम्यान हस्तांतरणं घडून येणार आहे.

अ) स्त्रीयांकरिता आर्थिक सक्षमीकरण :-

दिनदयाल अंत्योदय योजना आणि नॅशनल रूरल लाईव्हहुड मिशन (National Rural Livelihood Mission) यांनी नोंद घेणारे यश संपादित केले आहे. याचा लाभ ग्रामीण भागातील स्वयंचलित गटामधील 81 लाख स्त्रीयांना झालेला आहे. यामध्ये स्त्रीयांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आपण पोहोचलो आहोत. याकडून जास्त उत्पादकता उदयमशीलता आणि संगनमत घडून येण्याची मांडणी झालेली आहे. याचे हजारो सदस्य आहेत आणि व्यावसायिक समायोजन घडून आलेले आहे. याद्वारे कच्चा मालाच्या पुरवठ्याला मदत होते. चांगल्या रचना, गुणवत्ता ब्रँड आणि बाजार त्यांच्या उत्पादनाला प्राप्त होतो. याकडून आर्थिक धोरणाला मदत होते. मोठ्या उपभोक्ता बाजाराला सेवा देऊन त्याला हाताळतांना त्याचे कार्य सक्षम होते. यामधून अनेक स्टार्ट अप उद्योग वृद्धींगत होत आहे.

ब) पी. एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना:-

या शतकामध्ये पांरपारिक कला व कौशल्य असणारे लोक यांच्या हस्तकला व हस्तकाम प्रसिद्ध आहे. त्यांचे हात म्हणजेच साधन आहे. भारतामध्ये अशी साधने व कला प्रसिद्ध आहेत. सामान्यपणे प्रसिद्ध अशा हस्तकलाचा उल्लेख विश्वकर्मा म्हणूनच केला जातो. कला आणि हस्तकौशल्य निर्मिती ही खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर भारताचा पाया आहे. पी.एम. विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना ही सहाय्य करण्याचे पॅकेज आहे. ही नवीन योजना सक्षमीकरण घडवून गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणते. त्याच्या उत्पादनाचे प्रमाण आणि पोहोच याचे एकत्रिकरण सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या (MSEM) मूल्य श्रृंखलेमध्ये एकत्रित आहे. योजनेच्या घटकामध्ये समाविष्ट आहे. केवळ वित्तीय सहाय्यच दिले जात नाही तर पुढारलेले कौशल्य व प्रशिक्षणाला प्रवेश देणे, आधुनिक डिजिटियल तंत्रज्ञानाचे ज्ञान, कार्यक्षम हरित तंत्रज्ञान, ब्रँडची उन्नती, स्थानिक आणि जागतिक बाजाराची ओळख निर्माण करणे, डिजिटियल पेमेंट आणि सामाजिक सुरक्षितता समाविष्ट आहे. याचे लाभ सामान्य लोक आणि दुर्बळ घटकांना मिळणार आहे.

क) पर्यटन :-

देशीय आणि विदेशी पर्यटकाकरिता प्रचंड आकर्षणाच्या संधी निर्माण केल्या जाणार आहे. पर्यटनामध्ये प्रचंड क्षमता आहे. हे क्षेत्र अनेक प्रक़ारच्या संधी निर्माण करणारे क्षेत्र आहे. यामुळे युवकांना रोजगार आणि उदयमशीलतेच्या संधी प्राप्त होणार आहे. पर्यटनाला प्रोत्साहन देऊन ध्येय प्राप्ती केल्या जाणार आहे. यामध्ये राज्याचा कृतीशील सहभाग राहणार आहे. शासनाचा कार्यक्रम एककेंद्रभिमुख असून सार्वजनिक, खाजगी सहभाग राहणार आहे.

ड) हरित वृद्धी :-

हरित इंधन, हरित उर्जा, हरित शेती याबाबतच्या हरित गतिशीलता, हरित बांधणी आणि हरित साधने व धोरणामुळे अर्थव्यवस्थेच्या

विविध क्षेत्रामध्ये याचा कार्यक्षमपणे उपयोग होणार आहे. हरित वृद्धीचा परिणाम घडून अर्थव्यवस्थेमधील कार्बन तीव्रता कमी केल्या जाणार आहे. यामधून हरित रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहे.

इ) हरित संक्रमण :-

हरित संक्रमणामधून शाश्वत औद्योगिक विकासाला मदत केल्या जाणार आहे. यामधून जागरूक आणि जबाबदारपूर्ण आर्थिक वृद्धी संपादित केल्या जाणार आहे. याकरिता 35,000 कोटी रू. चा निधी हा भांडवली गुंतवणूक म्हणून वितरीत करण्यात आलेला आहे. यामधून उर्जा हस्तांतरण आणि एकूण शुन्य उद्दिष्ट साध्य केल्या जाणार आहे. मागच्या 2022-2023 च्या अंदाजपत्रकामध्ये वाहन स्क्रॅपिंग धोरण नमुद करण्यात आले होते. केंद्र सरकारद्वारे याकरिता निधी वितरीत करण्यात आला होता. यामुळे जुन्या वाहनांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे.

अर्थव्यवस्थेतील सहयोगी क्षेत्र आर्थिक वृद्धीला उत्तेजन देत असते. विशेषत: लोखंड, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्वामध्ये कपात होऊ शकते. हरित मार्गावर जाण्यासाठी स्क्रॅप स्टिलचा (Scrup Steel) उपयोग होईल. यामध्ये नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन महत्वपूर्ण भूमिका पार पाडणार आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनामध्ये कपात घडून येईल. तसेच जीवाश्म इंधनावरिल अवलंबित्वामध्ये कपात घडून येईल.

अंदाजपत्रकाचा हा क्षण म्हणजे आपण योग्य दिशेने जात आहोत. ही तात्काळ घडून येणारी कामगिरी नसून आर्थिक पुर्नरूत्थान आहे. जे शाश्वत नसून अल्पकालीन आहे. याचे परिणाम पुढील दशकामध्ये दिसणार आहेत. भारताने 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून स्थान प्राप्त केले आहे. सध्याच्या आर्थिक विकासाबाबत आणि शताब्दी वर्षाच्या भवितव्याबाबत प्रधानमंत्री यानी म्हटले की, जग वृद्धींगत होत आहे तसाच भारत देखीजल वृद्धींगत होत आहे. असे असतांना भारतामध्ये आर्थिक सुधारणा घडून येत आहे. जगातील आर्थिक सुधारणाचा लाभ भारताला विशेष शक्ती म्हणून होणार आहे.

उद्योग, मागणी आणि खर्च :-

केंद्रिय अंदाजपत्रक 2023-2024 हे अमृतकाळातील पहिले बजट आहे. अत्यंत बिकट स्थितीतून आपण जात असतांना अपेक्षित सकारात्मक भावना शेअर बाजारामधून दिसून आल्या. अंदाजपत्रक जेव्हा सादर झाले तेव्हा एका मोठ्या व्यावसायिक समुहाच्या (अदाणी समुह) शेअर किंमती तीव्रतेने घसरल्या होत्या. या पार्श्वभूमीवर उद्योग समुहाचा गट आणि उजव्या विचारसरणींच्या अर्थशास्त्रज्ञांनी परिस्थितीला सावरण्यास मदत करून सरकारमध्ये पुर्नविश्वास निर्माण केला.

अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर उद्योग समुह गट आनंदी होते. वित्त मंत्र्यांनी गतिमान

आधिक्य साधने देण्याचे टाळले आहे. लघु उद्योग आणि नवीन कल्याणकारी कार्यक्रमांना निधी देण्याचे टाळले आहे. वित्तीय दुरूस्तीवर अधिक्याने भर दिलेला होता. वित्तीय तुटीचे मापण सातत्याने केले जाऊन तो कमी करण्याचा प्रयत्न केला जात होता. याऐवजी भांडवली खर्चामध्ये वाढ करण्यात आली आहे. यामध्ये सिमांत वाढ जीडीपी च्या 0.6 प्रतिशने केली आहे. यामुळे खाजगी गुंतवणूक वाढून आर्थिक वृद्धीचा वेग वाढेल असा दावा वित्त मंत्र्यांनी केला आहे.

शासनाने कितीही चकचकीत करून अंदाजपत्रकाची मांडणी केली असली तरीही प्रत्यक्ष उपभोग मागणीमध्ये मोठी तुट निर्माण झाली आहे. यामधील क्षती भरून काढण्याची गती शासनाने गमावलेली आहे. 2022-2023 मध्ये आर्थिक वृद्धीचा दर 7 प्रतिशत असल्याचे म्हटल्या गेले. दुसऱ्या तिमाहीमध्ये आर्थिक वृद्धीचा दर घसरून 4.5 प्रतिशत झाला होता. औद्योगिक वृद्धीचा दर गेल्या पाच वर्षापासून - 2 प्रतिशत आहे. सोबतच स्फिती वाढत आहे. वास्तव प्रति व्यक्ती उत्पन्न स्थिर आहे. प्रतिव्यक्ती अंतिम उपभोग खर्च 5.9 प्रतिशतवर गेल्या तीन वर्षापासून स्थिर राहिलेला आहे.

सध्या देशीय मागणीमध्ये घसरण झाल्याचे दिसून येते. विशेषत: ग्रामीण भागातील मागणीमध्ये घसरण झालेली आहे. याचा पुरावा म्हणजे दुचाकी आणि त्रिचाकी वाहनाच्या मागणीमध्ये प्रचंड घसरण झालेली आहे. ही वाहने ग्रामीण भागाच्या मागणीचे प्रतिनिधीत्व करतात. ही मागणी कोरोनापूर्व काळापेक्षा कमी झालेली आहे. मनरेगा कार्यक्रमांतर्गत रोजगारासाठी मागणी आहे. यामधून सातत्याने ग्रामिण भागाच्या समस्या दिसून येतात. याचे बाह्यदृश्य बघितले तर सबळ प्रतिरोधचक्रिय (Countercyclical) वित्तीय प्रतिसाद आहे. अंदाजपत्रकीय आंवटन व सद्यस्थितीतील परिस्थितीवर मात करण्यास चालना देऊ शकतो यामधून खात्रीशीरपणे शाश्वत पुर्नभरण घडून येवू शकते.

मात्र गेल्या तीन बजट पासून सरकारने खर्च कमी करण्यावर भर दिलेला आहे. बजटच्या समग्र खर्चामध्ये स्थिरपणे घसरण घडून आलेली आहे. ही खर्चामधील घसरण 3 प्रतिशतने झालेली आहे. समग्र खर्चाचे प्रमाण 2020-2021 मध्ये जी.डि.पी. च्या 17.7 प्रतिशत होते ते घसरुण 2023-2024 मध्ये 14.9 प्रतिशत झालेले आहे. केंद्र सरकारच्या बजटमधील कमी खर्चाचा नकारात्मक परिणाम दिसून आला आहे. प्रतिरोधचक्रिय आर्थिक स्थितीद्वारे आंशिक क्षतीपूर्तीचा स्विकार राज्याने बजटमध्ये केला आहे. प्रतिरोधचकिय आर्थिक निती ही सरकारच्या खर्च कमी करण्याला चालना देते.

याहीपुढे जाऊन केंद्र सरकारने केंद्रिय अंदाजपत्रकाच्या संबंधित खर्चाच्या आकारमानामध्ये कपात केली आहे. प्राप्ती खर्चाच्या द्वारे बजटमध्ये सुविधा दिल्या जातात. आवर्ती खर्च/वारंवार होणारा खर्च (Recurring

Expenditure) जो सामान्य लोकांपर्यंत जलद गतीने झिरपत जातो. हा खर्च बजट आवंटन करतांना जी.डी.पी. च्या 4 प्रतिशत केला गेला आहे. याचा परिणाम असा झाला की, अर्थव्यवस्थेच्या एकूणच मागणीमध्ये घसरण निर्माण झाली आहे. परिणामत: क्षतिपुर्ती अथवा पुर्न:भरण घडून येण्यामध्ये दुर्बलता निर्माण झाली आहे. जानेवारी 2023 पासून निर्यातीमध्ये ऋणात्मक दराने वृद्धी घडून येत आहे. निर्यात वृद्धीला आर्थिक वृद्धीचे इंजिन मानल्या जाते. मात्र निर्यातीमधील ऋणात्मक वृद्धी ही मागणी टिकवून ठेवण्यात अपयशी ठरत आहे.

धक्कादायक बाबी अशा आहे की, केंद्रिय अंदाजपत्रकामध्ये खर्च कमी करण्यावर भर दिला आहे. अनेक मार्गानी हा खर्च कमी केल्या जाणार आहे. याचा नकारात्मक परिणाम राज्यावर आणि न्युन उत्पन्न गटावर होणार आहे. गेल्या तीन वर्षापासून राज्यांना हस्तांतरीत करण्यात येणारा खर्च 6.2 प्रतिशने कमी केलेला आहे. यामुळे केंद्राच्या योजना व त्यांचा आकार आकुंचित पावला आहे. राज्यांना कमी निधी दिला जात आहे.

केंद्र सरकारच्या आकुंचित होत जाणाऱ्या आकारमानाचा झटका शासनाच्या अनुदानाना बसत आहे. अनुदानाचे प्रमाण 2020-2021 मध्ये जी.डी.पी. च्या 3.6 प्रतिशत होते. ते घसरून 2023-2024 मध्ये जी.डि.पी. च्या 1.3 प्रतिशत करण्यात आले. 2023-2024 मध्ये एकूण अनुदाने 4.03 लाख कोटी रू. ची आहे. 2022-2023 च्या तुलनेत यामध्ये 1.5 लाख कोटी रू. कमी करण्यात आले आहे. अन्नधान्यावरील अनुदाने 2022-2023 मध्ये 2.87 लाख कोटी रू. होते. यामध्ये कपात करून 2023-2024 मध्ये 1.97 लाख कोटी रू. करण्यात आले आहे. गेल्या तीन वर्षामध्ये शासनाच्या अनुदानामध्ये प्रचंड प्रमाणात घसरण घडून आलेली आहे. हे प्रमाण 2/3 झालेले आहे. मोठ्या प्रमाणात कपात अन्नधान्यावरील अनुदानामध्ये करण्यात आलेली आहे. तीन निम्याने कमी करून केवळ जी.डी.पी. च्या 0.6 प्रतिशत झालेली आहे. अशीच प्रवृत्ती समांतरपणे व्याजदर अनुदानाच्या बाबत आहे. यामध्ये भर घालणारी बाब म्हणजे मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना) करिता अंदाजपत्रकीय आवंटन कमी करण्यात आलेले आहे.

परिणामत: मागणी बाजूने प्रचंड प्रमाणात घसरण करण्यात आलेली आहे. यावर वित्त मंत्रालयाने असा दावा केला आहे की, मागणी बाजूने झालेल्या घसरणीची भरपाई अथवा क्षतिपुर्ती भांडवली खर्चामध्ये वाढ करून केल्या जाणार आहे. भांडवली खर्चामध्ये वाढ केल्याचा गुणक प्रभाव दिसून येणार आहे. नमुद करण्यायोग्य बाब म्हणजे सरकारने भांडवली खर्च हा दुप्पट केला आहे. हा खर्च 2019-2020 मध्ये जी.डी.पी. च्या 1.7 प्रतिशत होता. यावरून तो जी.डी.पी. च्या 3.3 प्रतिशत करण्यात आलेला आहे. या बजटमध्ये भांडवली खर्चात जी.डी.पी. च्या 0.6 प्रतिशतने

वाढ करण्यात आली आहे. मात्र भांडवली खर्चामधील वाढ अत्यंत कमी दराने केलेली आहे. प्रामुख्याने भांडवली खर्च हा रस्ते, रेल्वे, पेट्रोलियम पदार्थ, नैसर्गिक वायू याकरिता केल्या जाणार आहे. मात्र इतर महत्वाच्या क्षेत्रांना मात्र भांडवली खर्चाचे मर्यादित लाभ मिळणार आहे.

आधिक्याने उत्पन्न करामध्ये झालेली कपात मध्यम वर्गाला चांगले भासवणारी (Feel – good) आहे. याचा कोणताही परिणाम उपभोक्ता मागणी वाढीवर घडून येणार नाही. याचे लाभ मोठे लाभार्थी म्हणजेच मोठ्या करदात्यांना होणार आहे. याचे लाभ निगम क्षेत्र आणि निगमत्तेर क्षेत्रातील करदात्यांना होणार आहे. अन्न, इतर अनुदाने आणि रोजगार कार्यक्रमावरील खर्च कमी होतो आहे. म्हणून सरकारने अमृतकाळाला समृद्ध आणि सशक्त म्हटल्या गेले असले तरी तो अर्थव्यवस्थेसाठी नाही असेच म्हणावे लागेल.

समारोप :-

मानव विकास निर्देशांकामध्ये भारत 191 देशांमध्ये 132 व्या स्थानावर आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक 0.633 आहे. याचा अर्थ भारताला आरोग्य, शिक्षण व प्रति व्यक्ती उत्पन्न वाढीसाठी भरीव योगदान व गुंतवणूक वाढविण्याची आवश्यकता आहे. जागतिक भूक निर्देशांक (Global Hunger Index) मध्ये 121 देशाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक 107 वा आहे. जी अत्यंत गंभीर स्थिती मानल्या जाते. यामुळे अन्नधान्यावरील खर्चात कपात करून चालणार नाही. फेब्रुवारी 2023 मध्ये 8.3 प्रतिशत उच्चतम बेरोजगारीचा दर होता. तर स्फितीचा दर 6.7 प्रतिशत होता. वित्तीय तुट 6.4 प्रतिशत आहे. या पार्श्वभूमीवर सप्तर्षीचे चित्र चांगल्या रितीने रंगवल्या गेले असले तरी ते पुढे घेऊन जाणे आव्हान आहे. चांगले शिक्षण, चांगले आरोग्य, जीवनमानाचा स्तर उंचावणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षात आपण साध्य हि उदिष्ट करू शकण्यात कमी पडलो हे आव्हान आहे. प्रति व्यक्ती उत्पन्न वाढवू शकलो नाही. यामुळे आर्थिक विषमता कशी कमी होईल याचे उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. या सर्व आव्हानांना प्रत्यक्षात धोरणकर्ते कसा आकार देईल हे देखील आव्हान आहे. आपण अर्थसंकल्पामध्ये समावेशी विकासाला स्थान दिलेले आहे. मानव विकास, मुलभुत गोष्टींची प्राप्ती, सन्मानाने जगायला मिळणे ही समावेशी विकासाची ध्येय आहे. याचा विचार धोरणाच्या मध्यवर्ती असण्याची आवश्यकता आहे.

संदर्भ सूची :-

- जहागिरदार, दि. व्यं. (२०२३). विविध उद्दीष्टे साध्य करू इच्छिणारा अर्थसंकल्प, १३ फेब्रुवारी, दै. हिंदुस्थान.
- Sitaraman, Nirmala. (2023). Budget 2023-2024 Speech of Ministry of

Finance, Government of India, 1 February

- Ministry of Finance, (2023). Key Featuris of Budget 2023-2024, Government of India.
- Scindia, Jyotirditya. (2023). The worlds oor oyster, 6 February, The Economic Times.
- Munal, Pawan. (2023). Stage is set for Lift - off, 7 February, The Economic Times.

यवतमाळ जिल्ह्यातील कृषी कर्ज पुरवठ्याचे स्वरूप: एक पाहणी

डॉ. धीरज सु. कदम

सहायक प्राध्यापक,

अर्थशास्त्र विभाग, रा.तु. म. नागपूर विद्यापीठ,

नागपूर.

प्रस्तावना:

इतर व्यवसायांप्रमाणे शेतीसुद्धा एक व्यवसाय असल्याने त्यासाठी कर्ज किंवा प्रत्यय (Credit) आवश्यक असते. शेतकऱ्यांना विशेषतः लहान शेतकऱ्यांना उत्पादनास¨बतच उपभोगासाठी देखील कर्जाची गरज असते. याशिवाय शेतीचा विकास, सुधारणा, अनुत्पादक व आकस्मिक कारणांसाठी सुद्धा कर्ज पुरवठ्याची गरज असते. आज देशातील विविध राज्यांमध्ये ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडून येत आहेत, त्यामागे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे मुख्य कारण मानल्या जाते, शिवाय जिल्ह्याच्या समावेशी विकासासाठी कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वित्तीय समावेश ही आवश्यक अट आहे. या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या कर्जपुरवठयाच्या स्थितीचे अध्ययन हे प्रासंगिक ठरते. प्रस्तुत शोध निबंधात यवतमाळ जिल्ह्यातील 212 नमुना कुटुंबांच्या पाहणीद्वारे संकलिक प्राथमिक समकांचे विश्लेषण करण्यात आले आहे. तद्वतच अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासनाचे विविध अहवाल आणि नाबार्ड द्वारे प्रकाशित *'स्टेट फोकस पेपर'* यातील दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील कृषि कर्ज पुरवठ्याची स्थिती

शेती क्षेत्रात कर्ज पुरवठा करणाऱ्या स्रोतांचे विभाजन (अ) खाजगी स्रोत आणि (ब) संस्थात्मक स्रोत अशा दोन गटांमध्ये केले जाते. खाजगी स्रोतांकडून शेतकऱ्यांनी प्राप्त केलेल्या कर्जाची माहिती अचूक आणि सहजरित्या उपलब्ध होऊ शकत नाही परंतु संस्थात्मक स्रोतांद्वारे कृषि व संलग्न कार्यासाठी पुरविण्यात आलेल्या प्रत्ययाची माहिती उपलब्ध आहे. पुढील तक्त्यामध्ये वर्ष २०२१-२२ साठी यवतमाळ जिल्ह्यातील कृषि व संलग्न कार्यासाठी वितरीत एकूण कर्ज तसेच प्रति हेक्टर कर्ज/प्रत्ययाची माहिती विदर्भ व महाराष्ट्र व महाराष्ट्रातील सर्वाधिक कर्जपुरवठा होणाऱ्या तीन जिल्ह्यांच्या सरासरीशी तुलना करून दर्शविली आहे.

तक्ता क्र. 1

कृषि व संलग्न कार्यासाठी वितरीत संस्थात्मक कर्ज पुरवठा (2021-22)

जिल्हा/विभाग/राज्य	कृषि व संबंधित क्षेत्रासाठी कर्ज प्रक्षेपण (लक्ष रु.)	वहीती धारण क्षेत्र (हेक्टर मध्ये)#	प्रति हेक्टर (रू.)
यवतमाळ	300957 (2.7)	903100	33,325
विदर्भ	2394372 (21.6)	5430967	44,087
महाराष्ट्र	11064038 (100)	20506432	53,954
सर्वाधिक तीन जिल्ह्यांची सरासरी	786122 (7.1)	1208091	65,072

स्रोत : * State Focus Paper, NABARD, Maharashtra Regional Office, Pune, 2021-22
Selected Indicators for Districts in Maharashtra and States in India 2020-21.

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सन 2021-22 मध्ये यवतमाळ जिल्ह्यात संस्थागत स्रोतांद्वारे कृषि व संलग्न कार्यासाठी 3,00,957 लक्ष रुपये पत पैसा वितरीत करण्यात आला. जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र 9,0,3100 हेक्टर असल्याने प्रतिहेक्टरी प्रक्षेपित पतपैसा 33,325 रुपये येत. विदर्भातील 11 जिल्ह्यात प्रति हेक्टर प्रक्षेपित पतपैशाची सरासरी 44,087 रुपये होती. तर महाराष्ट्रातील 33 जिल्ह्यांची (मुंबई वगळून) सरासरी विचारात घेता प्रतिहेक्टरी प्रत्यय प्रक्षेपण 53,954 रुपये होते. याच कालावधीत महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रति हेक्टर प्रक्षेपित प्रत्यय असणारे तीन जिल्हे अनुक्रमे अहमदनगर, पुणे आणि सातारा यांची सरासरी 65,072 रुपये येते. यावरून यवतमाळ जिल्ह्याच्या तुलनेत राज्यात सरासरीने 38 प्रतिशत प्रक्षेपित प्रतिहेक्टरी पत पुरवठा जास्त होता तर सर्वाधिक तीन जिल्ह्यांमध्ये तो 2 पटीने अधिक होता. ही वस्तुस्थिती विचारात घेता राज्य सरासरीच्या तुलनेत यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संस्थागत स्रोतांद्वारे प्रतिहेक्टरी अल्प प्रमाणात पत पैसा उपलब्ध होतो. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे जिल्ह्यातील अल्प सिंचन होय. (याठिकाणी आपण नाबार्ड द्वारे अनुमानित प्रक्षेपित कर्जाचा विचार केला आहे, नाबार्डच्या याच अहवालात दर्शविल्या प्रमाणे विदर्भामध्ये प्रक्षेपित कर्ज अनुमानापैकी 2020-21 मध्ये प्रत्यक्षात ४८ टक्केच पीक कर्जाचे वितरण झाले होते.)

धारण क्षेत्र, सिंचन सुविधांची उपलब्धता आणि कृषि कर्ज यांच्यातील सहसंबंधांचे विश्लेषण

शेतकऱ्याला प्राप्त कृषि कर्जाच्या रक्कमेवर धारण क्षेत्राचा आकार तसेच सिंचन सुविधांच्या उपलब्धतेचा कित्ी प्रमाणात प्रभाव पडू शकतो याचे विश्लेषण करण्यासाठी नमुना कुटुंबांच्या संदर्भात शेतकऱ्यांचे एकूण धारण क्षेत्र, सिंचित धारण क्षेत्र तसेच असिंचित धारण क्षेत्र व कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंधांचे विश्लेषण पुढील तक्ता क्र. 2 द्वारे करण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. 2

कृषि कर्जाची रक्कम आणि सिंचित, असिंचित तसेच एकूण धारण क्षेत्राचा आकार यांच्यातील सहसंबंध गुणांक

	एकूण धारण क्षेत्र	**असिंचित**	**सिंचित**	**कर्ज रक्कम**
एकूण धारण क्षेत्र	1			
असिंचित	0.71	1		
सिंचित	0.77	0.1177572	1	
कर्ज रक्कम	**0.57**	**0.31**	**0.56**	1

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारित परिगणना

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नमुना कुटुंबांच्या धारणक्षेत्राचा आकार आणि कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंध गुणांक 0.57 आहे. कृषि कर्जाची रक्कम आणि सिंचित धारणक्षेत्र यांच्यातील सहसंबंध गुणांक 0.56 आहे तर असिंचित धारण क्षेत्राचा आकार आणि कृषि कर्जाची रक्कम यांच्यातील सहसंबंध गुणांकाचे मूल्य 0.31 आहे. यावरून सिंचित धारण क्षेत्र आणि कृषि कर्ज यांच्यात मध्यम कोटीचा धनात्मक सहसंबंध आहे. तर असिंचित धारण क्षेत्र व कृषि कर्ज यांच्या दरम्यान निम्न कोटीचा धनात्मक संबंध आहे. यावरून शेतकऱ्यांच्या वित्तीय समावेशनासाठी धारण क्षेत्राचा आकार आणि सिंचन सुविधांची वाढ याचीही गरज प्रकर्षाने अधोरेखित होते.

धारण क्षेत्रनिहाय कृषि कर्जाचे विभिन्न स्रोत व प्राप्त सरासरी कृषि कर्जाचे विश्लेषण

शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या कर्जाच्या स्रोतांचे वर्गीकरण सामान्यतः संस्थात्मक स्रोत आणि असंस्थात्मक स्रोत याप्रकारे करण्यात येते. संस्थात्मक स्रोतांतर्गत सावकारद्वारे प्राप्त कर्ज सहजने मिळत असले तरी त्याचा व्याज दर अधिक असतो. त्यामुळे शेतकरी मुदतीत कर्ज परत न करू शकल्यास तो कर्जाच्या जाळयात अडकतो. शिवाय सावकारी कर्ज वसुलीची पद्धत जाचक व सक्तीची असल्यामुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो. याउलट संस्थात्मक कर्ज हे सुलभ व्याजदराने प्राप्त होत असून नापिकीच्या काळात कर्ज वसुलीची सक्ती न करता कर्जाचे पुर्नगठन देखील केल्या जात असल्याने सावकरी कर्जाचे पूर्णतः उच्चाटण होऊन पर्याप्त मात्रेत संस्थात्मक कर्ज पुरवठा शेतकऱ्यांना व्हावयास हवा. तथापि संस्थात्मक कर्ज वितरणातील तांत्रिकता व ते पर्याप्त मात्रेत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजास्तव असंस्थात्मक सावकारी कर्जाकडे वळावे लागते. या संदर्भात जिल्ह्यातील नमुना शेतकरी कुटुंबांना वेगवेगळ्या धारणक्षेत्र-निहाय प्राप्त कर्जाच्या विन्नि स्रोतांचे व विश्लेषण पुढील तक्ता क्र. 3 व प्राप्त सरासरी कर्जाचे विश्लेषण आलेख क्र. 1 द्वारे करण्यात आले आहे.

तक्ता क्र. 3

धारण क्षेत्रनिहाय कृषि कर्ज स्रोतांचे वर्गीकरण

धारण क्षेत्र आकार (हेक्टर)	संस्थात्मक			असंस्थात्मक		एकूण
	सहकारी पतसंस्था	व्यापारी अधिकोष	बचत गट	सावकार	नातेवाईक व मित्र	
< 1	15	0	6	1	1	23
1 to 2	37	9	5	6	9	66
2 to4	40	13	6	3	5	67
4 to 10	30	13	2	5	2	52
10 <	11	3	3	1	1	19
एकूण	133	38	22	16	18	227
	193(85.4%)			33(14.6%)		

स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण

आलेख क्र. 1

धारण क्षेत्रनिहाय प्राप्त सरासरी कर्ज

(आकडे रु. मध्ये)



स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण

जिल्ह्यातील 212 नमुना शेतकरी कुटुंबांपैकी 191 (90 प्रतिशत) कुटुंबांनी विभिन्न स्रोतांद्वारे कृषि कर्ज प्राप्त केले होते. कृषिकर्ज प्राप्त करणाऱ्या 191 शेतकऱ्यांपैकी 162 शेतकऱ्यांनी कुठल्यातरी फक्त एकाच स्रोताद्वारे कर्ज मिळवले होते तर 22 शेतकऱ्यांनी 2 आणि 7 शेतकऱ्यांनी 3 स्रोतांद्वारे कर्ज प्राप्त केले होते. त्यामुळे कर्ज प्रकरणांची एकूण संख्या 227 आलेली आहे. 227 कर्ज प्रकरणांपैकी संस्थात्मक आणि असंस्थात्मक असे ढ¨बळ वर्गीकरण विचारात घेता 193 म्हणजे 85.4 प्रतिशत कर्ज ही संस्थात्मक स्रोतांद्वारे घेण्यात आलेली होती, तर 33 म्हणजेच 14.6 प्रतिशत कर्जे ही असंस्थात्मक स्रोतांद्वारे घेण्यात आलेली होती. संस्थात्मक कर्जाचे 80 प्रतिशतपेक्षा अधिक प्रमाण ही निश्चितच चांगली बाब आहे. कर्ज स्रोतांचे सविस्तर वर्गीकरण विचारात घेता, सहकारी पतसंस्थांद्वारे 133 म्हणजे 58.6 प्रतिशत व्यापारी अधिकोषांकडून 38 म्हणजे 16.7 प्रतिशत, बचत गटांकडून 22 म्हणजे 9.7 प्रतिशत, सावकारांकाडून 16 म्हणजे 7 प्रतिशत तर नातेवाईक व मित्र यांच्याकडून 18 म्हणजे 8 प्रतिशत शेतकरी कुटुंबांनी कर्ज घेतले होते.

विविध स्रोतांद्वारे कृषि कर्ज प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांची धारणक्षेत्र निहाय स्थिती विचारात घेता, 1 हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र असणाऱ्या केवळ 78 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 16565

कर्ज प्राप्त केले होते, 1 ते 2 हेक्टर या दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या 83 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 30274 घेतले होते, 2 ते 4 हेक्टर दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या 93 प्रतिशत शेतकऱ्यांनी सरासरी रु. 57958, तर 4 ते 10 हेक्टर दरम्यान धारणक्षेत्र असणाऱ्या सर्वच (100 प्रतिशत) शेतकऱ्यांनी सरासरी रु. 1,21,535 कर्ज प्राप्त केले होते तर 10 हेक्टरपेक्षा जास्त धारणक्षेत्र असणाऱ्या सर्वच (100 प्रतिशत) शेतकऱ्यांची सरासरी रु. 2,03,461 चे कर्ज प्राप्त केले होते.

नमुना कुटुंबांच्या कृषि कर्जाचा वेगवेगळ्या उद्देशासाठी सापेक्ष प्रतिशत वापर

शेतकऱ्याला प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे चक्र हे दीर्घकालीन असून शेतीसाठीचा खर्च तसेच दैनंदिन उपभोगाचा खर्च नियमित करावा लागतो. प्राप्त उत्पन्नाचे दीर्घकालीन निय¨जन बहुतांशवेळी शक्य नसल्याने, कृषि कार्यासाठी शेतकरी जे कर्ज काढतो त्यातील काही हिस्सा नाईलाजास्तव त्याला दैनंदिन उपभोग, जीवनावश्यक गरजा वा इतर उद्देशासाठी वापरावा लागतो. आपल्या नमुना पाहणीमध्ये शेतकरी कुटुंबांनी जे कर्ज घेतले त्यांचा सरासरीने वेगवेगळ्या उद्देशासाठी झालेल्या वापराचे सापेक्ष विश्लेषण पुढील आकृतीद्वारे दर्शविण्यात आले आहे.

आकृती क्र. 4

कृषि कर्जाचा वेगवेगळ्या उद्देशासाठी सापेक्ष प्रतिशत वापर



स्रोत: क्षेत्रीय सर्वेक्षण

आकृतीत दर्शविल्याप्रमाणे नमुना शेतकऱ्यांनी प्राप्त केलेल्या एकूण कर्जापैकी सरासरी 65 प्रतिशत रक्कम शेतीच्या चालू कार्यासाठी उपय¨गात आणली होती, तर बांधबंदिस्ती, विहिर, कुंपण यासारख्या संस्थात्मक कार्यासाठी सरासरी 12 प्रतिशत रक्कमेचा वापर करण्यात आला. त्यानंतर उपभोगासाठी सरासरी 9 प्रतिशत, शैक्षणिक कार्यासाठी सरासरी 6 प्रतिशत, वैद्यकीय उपचारासाठी 5 प्रतिशत तर सामाजिक व सांस्कृतिक (सण-उत्सव, लग्नकार्य, तेरवी इ.) कार्यासाठी सरासरी 3 प्रतिशत रक्कमेचा उपयोग करण्यात आल्याचे दिसून आले. यावरून जिल्ह्यातील नमुना कुटुंबा ंनी प्राप्त केलेल्या कर्जापैकी ढोबळमानाने 77 प्रतिशत वापर उत्पादक कार्यासाठी तर 33 प्रतिशत रक्कमेचा वापर अनुत्पादक कार्यासाठी होत असल्याचे दिसून येते.

सारांश -

जिल्ह्यातील नमुना शेतकरी कुटुंबांना वेगवेगळ्या स्रोतांपासून प्राप्त सरासरी उत्पन्नाचा विचार करता, शेतीपूरक व्यवसायांपासून मिळणारे उत्पन्न अत्यंत अल्प आहे. 1 हेक्टरपेक्षा कमी धारण क्षेत्र असणाऱ्यांना अन्य व्यवसायही करता आलेले नाहीत व 2 हेक्टर पर्यंत धारण क्षेत्र असणाऱ्यांना इतर स्रोतांपासून प्राप्त उत्पन्न जमेस धरूनही किमान जीवनमान प्राप्त करणे अशक्य असल्याचे स्पष्ट होते. यातून धारण क्षेत्राचा आकार वाढण्याची, तसेच एका बाजुला सिंचन सुविधांमध्ये तर दुसऱ्या बाजुला शेती पुरक व्यवसायांमध्ये वाढ घडून आणण्याची गरज प्रकर्षाने अधोरेखित होते.

जिल्ह्यातील नमुना कुटुंबांच्या उपभोग व्ययाच्या आधारे अर्ध्यापेक्षा अधिक कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रामध्ये सापेक्षतः दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण तर अधिक आहेच शिवाय दारिद्र्याची तीव्रतादेखील ग्रामीण क्षेत्रात सापेक्षतः अधिक आहे. विभिन्न प्रवर्गनिहाय दारिद्र्याचे प्रमाण पाहता, अनुक्रमे अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व मुस्लीम अल्पसंख्याकांमध्ये ते सरासरीपेक्षा अधिक आहे. यावरून शहरी क्षेत्राच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात व त्यातही अनुक्रमे अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व मुस्लीम अल्पसंख्याकांमध्ये विकास प्रक्रियेतील अपवर्जनाचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण क्षेत्रसापेक्ष शहरी क्षेत्रात दारिद्र्याचे प्रमाण कमी असले तरी उपभोग खर्च वितरणातील विषमता तेथे अधिक आहे. यावरून विकासाचे लाभ शहरी क्षेत्रात सापेक्षतः अधिक मिळत असले तरी त्याच्या वितरणात समानता नाही. ही सर्व निष्पत्ती आधारित निर्देशके यवतमाळ जिल्ह्यातील विकास प्रक्रिया समावेशी नसण्याकडे निर्देश करते.

वित्तीय समावेशनाच्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना प्राप्त कृषि कर्जाची स्थिती लक्षात घेता, सिंचन सुविधा व धारण क्षेत्राच्या वाढत्या आकारानुसार शेतकऱ्यांना प्राप्त कृषि कर्जाची रक्कम देखील वाढत गेलेली दिसते. म्हणजेच जिल्ह्यातील कोरडवाहू, सीमांत व अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्राप्त कृषि कर्जाच्या अनुषंगाने वित्तीय समावेशन अल्प आहे. यावरून शेतकऱ्यांच्या वित्तीय समावेशनासाठी धारण क्षेत्राचा आकार आणि सिंचन सुविधांच्या वाढीची निकड प्रकर्षाने अधोरेखित होते.

संदर्भ:

- GOI (2022). *State Focus Paper*, NABARD, Maharashtra Regional Office, Pune.
- GOI (2022). *"Selected Indicators for Districts in Maharashtra and States in India 2020-21",* Directorate of Economic and Statistics, Planning Department, Maharashtra State, India.
- कदम, धीरज सु. (2017). *"सर्वसमावेशक विकासाचे यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भात विश्लेषणात्मक अध्ययन"*, पीएच..डी. शोध प्रबंध, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

२१ शतकातील मौद्रिक धोरण - संदर्भ बेन बर्नान्के यांच्या पुस्तकाचा

डॉ. एच. ए. हुद्दा
निवृत्त प्राध्यापक,
वसंतराव नाईक शासकीय
कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

(विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४६व्या वार्षिक अधिवेशनात दि. ५ फेब्रुवारी २०२३ रोजी डॉ. एच. ए. हुद्दा यांनी दिलेल्या 'आर्थिक ग्रंथातील विचार विश्व' या मालिकेतील व्याख्यानाचा सारांश)

प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ, बेन शालांय बर्नान्के यांचा जन्म १३ डिसेंबर १९५३ रोजी जॉर्जीया येथे झाला. ते २००६-१४ पर्यंत फेडरल रिझर्व्ह चे १४ वे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. फेडरल रिर्झव्हचे अध्यक्ष होण्यापूर्वी बर्नान्के हे प्रिस्टन विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यानंतर त्यांनी ब्रकींगस संस्थेत प्रतिष्ठित फेलो म्हणून कार्य केले. फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात बर्नान्के यांनी २०००च्या दशकाच्या उत्तरार्धात आलेल्या आर्थिक संकटावर फेडरल रिर्झव्हच्या कार्यप्रणालीवर नियंत्रण ठेवले. याकरीता त्यांना २००९ मधील *"टाईम पर्सन ऑफ द इयर"* म्हणून त्यांना सन्मानीत करण्यात आले होते. पुढे, डगलस डायमंड आणि फिलिप्स एच. डायबविग यांच्यासोबत *"बँका आणि आर्थिक संकटे"* यावरील संशोधनाकरीता विशेषत: महामंदीच्या विश्लेषणाकरीता २०२२ चा अर्थशास्त्रातील नोबेल मेमोरीयल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

५ ऑगस्ट २००२ पासून २१ जून २००५ पर्यंत ते फेडरल रिझर्व्ह सिस्टमच्या गव्हर्नर्स मंडळाचे सदस्य होते. त्यांनी बर्नान्के सिद्धांताचा प्रस्ताव मांडला आणि प्रथम "द ग्रेट मॉडरेशन" या सिद्धांतावर चर्चा केली, ज्या अंतर्गत पारंपरिक व्यवसाय चक्रात घट झाली असे त्यांनी स्पष्ट केले. अलिकडील दशकात आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत घडलेल्या संरचनात्मक बदलाद्वारे अस्थिरता, विशेषत: विकसनशील राष्ट्राच्या आर्थिक अस्थिरतेमध्ये वाढ समष्टी अर्थशास्त्रातील मौद्रीक व राजकोषीय धोरणाचा प्रभाव असल्याचे ते स्पष्ट करतात.

अमेरिकच्या फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष म्हणून अँलन ग्रीनस्पॅन यांच्यानंतर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यापूर्वी बर्नान्के यांनी अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष म्हणून कार्य पाहिले होते. नंतर २८ जानेवारी २०१० रोजी बर्नान्के यांना अध्यक्ष म्हणून

दुसऱ्यांदा नियुक्त करण्यात आले. फेडरल ओपन मार्केट कमेटीचे चेयरमन म्हणूनही त्यांनी कार्य केले. याद्वारे चलनविषयक धोरणे ठरण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती.

२००८ नंतर फेडरल रिझर्व्ह साधने

२१व्या शतकातील मौद्रीक धोरण ठरविणाऱ्यांना एका वेगळ्या जागसमोर जावे लागले, जे २०व्या शतकापेक्षा कितीतरी बदललेले होते. ज्याचा उल्लेख *'New Normal'* असा केला जातो. तीव्र स्फीतीचे अस्तित्व, व्याजाचा दर एका अल्पकालावधीकरीता कमी केलेला, त्यामुळे परंतरागत मौद्रीक धोरणावर त्याचा परिणाम झाला. याकरीता मौद्रीक धोरणकर्त्यांना याला प्रतिसाद देण्याकरिता अनेक आव्हाने निर्माण झाली होती. २००७ -०९ नंतर जी वित्तिय संकटे फेडरल रिझर्व्ह व अन्य मुख्य केंद्रीय अधिकोषांसमोर उभी होती, त्यासाठी त्यांनी पर्यायी म्हणून मोठ्या प्रमाणावर मात्रात्मक सहजता व दीर्घकालावधीकरिता कमी व्याज दर धोरण अंमलात आणले; ज्याचा उद्देश वित्तिय स्थिरता प्रस्थापित करणे होते, जेणेकरून मौद्रीक धोरण भविष्यकाळात बाजारपेठेला अपेक्षेनुसार आकार देऊ शकेल. कोरोना साथ रोगाच्या काळात फेडरल रिझर्व्ह व अन्य देशातील मुख्य केंद्रीय अधिकोषांनी मोठ्या प्रमाणात उपयोगात आणलेल्या मात्रात्मक सांधनांनी पर्यायी म्हणून चांगले काम केले होते. या साधनांद्वारे कोणती जोखीम व व्यय निर्माण झाले? तटस्थ किंवा नगण्य व्याजदर जे भूतकाळात कमी होते, ते मात्रात्मक सहजतेने त्यांना पुढील मार्गदर्शनाकरीता पुरेसे ठरले काय? जेव्हां या साधनांचा उपयोग करणे सुरू केले, तेव्हा फेडरल रिझर्व्ह वित्तिय संकटाला समोरा जात होता. तेव्हा परिणामकारकपणे चांगले अंदाज उपयोगात आणून उपलब्ध असलेल्या चांगल्या पुराव्याचा वापर केल्या गेला. या साधनांबाबत मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेले पुरावे हे प्रामुख्याने औपचारिक संशोधन व प्रात्याक्षिक अनुभव यातून प्राप्त झालेत. या साधनांचा पर्यायी वापर २००८ नंतर स्वीकृत करण्यात आला. यामुळे महत्त्वाचे म्हणजे आर्थिक प्रोत्साहनाकरीता जेव्हां अल्पकालावधीत व्याजाचे दर कमी करण्यात येत होते; ते आता करणे गरजेचे राहणार नाही आणि त्याचे दुष्परिणाम देखील नगण्य राहतील. त्यामुळे या साधनांचा स्थायी स्वरूपात मौद्रीक धोरणाअंतर्गत एक साधन म्हणून वापर केला जाईल. प्रामुख्याने जेव्हा व्याजाचे दर अगदी तटस्थ असतात किंवा नगण्य असतात व अति अपस्फितीच्या काळात या साधनांचा वापर केला जातो. यातून सहजपणे प्रश्न निर्माण होतो की, या व्यतिरिक्त मौद्रीक धोरणाअंतर्गत किंवा धोरणाकरीता काय करणे गरजेचे किंवा अनिवार्य असेल, ज्यामुळे आर्थिक स्थिरता प्रभावीपणे नेहमीकरीता टिकून राहील.

मात्रातमक सहजता

मात्रात्मक सहजतेची व्याख्या वेगवेगळया दृष्टीकोनातून करण्यात येते. या ठिकाणी “मात्रात्मक सहजता म्हणजे केंद्रीय अधिकोषाने दीर्घकालावधी करीता मोठ्या प्रमाणावर प्रतिभूतींची किंवा रोख्यांची केलेली खरेदी होय, ज्याचा परिणाम दीर्घावधीत व्याजाचा दर कमी करणे, सहज वित्तिय उपलब्धतेची स्थिती आणि पूर्ण रोजगार व किंमत स्थिरता ही समग्र अर्थव्यवस्थेचे उद्देश प्राप्त करणे आहे. उदा. बँक ऑफ जपानने प्रतिभूती किंवा रोखे खरेदी करण्याची सुरूवात ही २००१ मध्ये केली, तो मात्रात्मक सहजतेचा हा पहिलाच प्रयोग होता. ज्याला मात्रात्मक सहजता असे संबोधल्या गेले, ज्यात प्रामुख्याने अपस्फितीवर नियंत्रण हे समग्र अर्थव्यवस्थेचे उद्देश निश्चित करण्यात आले होते. यांतर्गत अल्पकालावधीत प्रतिभूतींची किंवा रोख्यांची खरेदी करणे याचा समावेश होता, याशिवाय यात बँकेची गंगाजळी वाढवणे व मुद्रेच्या पुरवठ्यात वाढ करणे, तर दीर्घकालावधीत व्याजाचा दर कमी करणे या बाबींचा समावेश करण्यात आला होता. जपानचे लोक विश्वास ठेवत होते की, अधिक सरळ व प्रवाही असे मौद्रीक धोरणांचे तत्त्व असावे. त्यांच्या मते, मात्रात्मक सहजतेतून थोड्याफार प्रमाणात प्रतिभूती किंवा रोख्यांची खरेदी यातून कमी करावी व उद्देश असा असावा की, निश्चितपणे एखाद्या वित्तिय बाजाराची स्थिरता निर्माण करावी. युरोपच्या मध्यवर्ती बँकेने एक असे लक्ष निर्धारित केले होते की, जे देश संकटात आहेत अशा देशांचे कर्ज विकत घ्यावे. जेव्हा युरोप हे एकूणच आर्थिक संकटात होते तेव्हा यु.एस.ए. फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरीम पॉल यांनी त्यांच्या कोषागाराच्या प्रतिभूती व रोखे खरेदी करून त्याला सरकारी हमी किंवा सुरक्षा प्रदान केली होती. त्यात तारण ठेवलेल्या प्रतिभूतीचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. त्यामुळे खरेदी करणाऱ्यांना जे शेवटचे आश्रयदाते म्हणून ओळखल्या गेले त्यांना २०२० मध्ये अशा प्रकारची सुरक्षितता प्रदान केल्या गेली. शेवटचे उदा. म्हणजे जरी खरेदीचा जो कार्यक्रम सुरू करण्यात आला, त्याचा महत्वाचा उद्देश म्हणजे बाजाराचे स्थिरीकरण सध्या करणे होता. यु.एस.ए. मध्ये याची सुरूवात करीत असतांना हे शेवटचे माप म्हणून वापरण्यात आले. मोठ्या प्रकारची अनिश्चितता व परिणामकारकता व जोखिमीचे व्यय म्हणून याकडे पाहिल्या गेले. यावर राजकीय टिकाही मोठ्या प्रमाणात केल्या गेली. अशाप्रकारे मात्रामक सहजता उपयोगी असे साधन म्हणून उपयोगात आले व त्यापासून कोणतेही असे दुष्परिणाम जाणवले किंवा दिसले नाही. म्हणून या कार्यक्रमाची लोकप्रियता वाढली. यानंतर फेडरल रिझर्व्ह ने ५ ट्रीलियन यु.एस.ए. डॉलरच्या प्रतिभूती खरेदी केल्या. साथीच्या काळात निर्माण झालेल्या

स्थितीत जी सापेक्षरित्या वसूलीतील झालेली वाढ यांचा अनुभव इतरानाही आला. साथ रोगासारख्या आणीबाणीच्या काळात बँक ऑफ इंग्लंड ने देखील प्रतिभूती व रोख्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. बँक ऑफ जपानने कधीही मात्रात्मक सहजतेचा वापर केला नव्हता परंतु या कालावधीत त्यांना या साधनाचा वापर करावा लागला. या साधनांचा उपयोग बँक ऑफ कॅनडा, रिझर्व्ह बँक ऑफ ऑस्ट्रेलिया व अन्य विकसनशील देशांनी देखील केला.

पूर्वानुमान विरूद्ध वचने

केंद्रीय बँकेद्वारे वेगवेगळया स्वरूपात मार्गदर्शन दिले जाते. शिकॅगो फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष चार्ल्स इव्हेन व अर्थशास्त्रज्ञ जेफ्री कॅम्पबेल, जॉन फिशर व अँलजॅन्डॉ जस्टीनिआनो यांनी २०१२ च्या पेपर मध्ये प्रस्तावित केले होते की, *'डेलफीक'* व *'ऑडसिनि'* या दोन मधील फरकाचा उपयोग पुढील मार्गदर्शनाकरीता अधिक उपयुक्त ठरेल. डेलफीक मार्गदर्शन हे प्रामुख्याने लोकांना व बाजाराला माहिती देऊन धोरणकर्त्याची व अर्थव्यवस्थेची चालू काळातील माहिती देऊन त्यांच्या ज्ञानात वाढ करणे व पुढील काळात धोरण कसे राहिल याची माहिती देणे होय, थोडक्यात डेलफीक मार्गदर्शन हे आर्थिक व धोरण यांचे पूर्वानुमान जे सेंट्रल बँकेशी संबंधीत असेल, ज्यात वचन किंवा निश्चयपूर्वक माहिती देणे, कोणत्याही एका कार्याशी संबंधीत असते याचा त्यात समावेश राहणार नाही. याच्या विपरीत ओडीसीस ने स्वतःला याबाबतीत बांधून ठेवले आणि निश्चितपणे व खरेपणाने सांगणे आरंभ केले. डेलफीक चे मार्गदर्शन हे कोणत्याही काळात उपयुक्त ठरेल. जेव्हा व्याजाचा दर ही बंधाचे मूल्य कमी किंवा जास्त ठेवण्यात एक समस्या असते. म्हणून १९९० नंतर प्रामुख्याने डेलफीक मार्गदर्शनाचा अधिक उपयोग व्हायला सुरूवात झाली व त्याच्या मार्गदर्शनाने वैश्वीक किंवा जागतिक प्रवृत्तीच्या प्रोत्साहनाकरिता याचा उपयोग मध्यवर्ती अधिकोषाच्या पारदर्शकतेकरीता झाला. डेलफीक चे मार्गदर्शन म्हणजे एक विवेकी स्वरूपाचे मार्गदर्शन होय. या मार्गदर्शनात पूर्णपणे खुलेपणा आहे. याचा उपयोग बाजारातील अपेक्षीत अशा धोरणकर्त्यांचा अभ्यास करण्यासाठी करता येतो. या मार्गदर्शनाद्वारे बाजारातील जोखीम कमी करता येते. धोरणकर्त्याच्या क्षमतेचे मूल्यमापन करणे व त्याद्वारा वित्तिय व आर्थिक स्थितीच्या प्रभावाला मोजणे शक्य होते.

धोरणाला अधिक सशक्त करणे

मात्रात्मक सहजता व पुढील मार्गदर्शन याचा वापर समन्वयाने, आर्थिक प्रोत्साहनाचे लोकांना वाटप करणे याकरीता जवळपास बर्नान्केने

३% ने फेडरलचा निधी हा अतिरिक्त निधी समजून त्याचा वापर किमान पातळीवर निश्चित केला होता. धोरणकर्ते हे पुढील पर्यायी साधनाच्या शोधाकरीता सतत संशोधन कार्य करीत असतात ज्यामुळे पर्यायी म्हणून त्याचा उपयोग करता येतो. यात प्रामुख्याने रोजगारात होणारी घट व स्फिती याबाबत गहन कार्य केले गेले. मध्यवर्ती अधिकोष, बाहेरील व्यवहाराकरीता जी साधने उपयोगात आणतात त्या साधनांना फेडरल रिझर्व्ह ची मान्यता असते ज्यात प्रामुख्याने नकारात्मक व्याजाचा दर व नियंत्रीत प्राप्तीचा वक्र व पर्यायी धोरणाचे प्रारूप व कार्य, हे विकासाच्या मागील काही काळाचे स्पष्टपणे विश्लेषण त्यात दिसेल तेच विश्वासदर्शक पुढील मार्गदर्शन होय. परंतु साधनांना सबळ करण्याकरीता भविष्यकाळातील मौद्रीक धोरण हे राजकोषीय धोरणाचे भागीदार असेल. ज्यामुळे खाली गेलेली किंवा गर्ततेत गेलेली व्यवस्था पुन्हा ताळ्यावर आणणे शक्य होईल. राजकोषीय धोरण कठीण राजकीय पद्धतीचे आवश्यक ते कार्य करू शकत नाही. परंतु याचा एक फायदा असा आहे की हे अधिक सशक्त असल्याने जेव्हा तटस्थ व्याजाचा दर त्याहीपेक्षा कमी झाला असेल तर तो मौद्रीक धोरणापेक्षा किती तरी अंशांमध्ये अधिक असेल. हे एक निश्चित असे लक्ष असेल की ज्यात समुहांना किंवा क्षेत्रांना त्याचा उपयोग होईल. अधिक बाह्य शक्यता ज्याकरीता मौद्रीक व राजकोषीय सहकार्य याचा अंतर्भाव हेलिकॉप्टर मुद्रा व आधूनिक मुद्रा सिद्धांत ज्याची मान्यता मुद्रा व राजकोषीय धोरण, हे त्यांच्या उलट भूमिकांमध्ये दिसून येईल.

कर्जाकरीता वित्त

याशिवाय विविध वित्तिय संपत्तीची खरेदी जी मात्रात्मक सहजतेच्या अंतर्गत केल्या गेली. अनेक विदेशी मध्यवर्ती बँकानी कर्ज देण्याकरीता सुविधा निर्माण करून दिल्या त्याकरीता विशेष अशी व्याख्या तयार करण्यात आली. ही व्याख्या बँक ऑफ इग्लंडने तयार केली. या कार्यक्रमाला कर्जाकरीता वित्त कार्यक्रम असे घोषित करण्यात आले. याचा मुख्य उद्देश कुटूंबांना व लहान व्यवसायधारकांना ऋण देऊन मदत करणे हा होता. जे स्कंध बाजारात किंवा बंध बाजारात कार्य करू शकणारे नव्हते केवळ त्याचे अवंलबीत्व मोठ्या प्रमाणात केवळ अधिकोषावर होते. कर्जाकरीता वित्त ही मुलत: योजना प्रामुख्यानें संयुक्तपणे बँक ऑफ इग्लंड व यु. के. च्या कोषागाराने जुलै २०१२ मध्ये सुरू केली होती. या योजना खाली बँक ऑफ इग्लंडने कर्जाचे वितरण कमीत कमी व्याजदर आकारून दिले होते व व्याजाचा दर ०.२५% इतका होता. हे कर्ज चार वर्षाकरीता देण्यात आले होते. याद्वारे बँकानी त्यांच्या कर्ज वाटपाच्या कार्यात मोठी वाढ घडवून आणली व गैर वित्तिय व्यावसायकांनी मोठ्या प्रमाणात कर्जे घेतली. या कार्यक्रमाच्या योग्य अंमलबजावणी करीता अनेक

वेळा मुदतवाढ देण्यात आली व नंतर २०१८ मध्ये हा कार्यक्रम बंद करण्यात आला. नंतर साथ रोग काळात नवीन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. युरोपियन सेंट्रल बँकेनी कर्जाकरीता वित्त ह्या कार्यक्रमाचा अंतर्भाव "शेवटचे कर्जाचे आश्रय दाते" या कृती खाली जागतिक वित्तिय संकटाच्या आणि कर्जरोख्याच्या खरेदीच्या काळात सुरूवात केली. ऑक्टोबर २०१८ मध्ये युरोपियन वाणिज्य अधिकोषाने दीर्घकालावधीकरीता पुनर्वित्त देण्याचे ठरविले, यामुळे बँकांना पुन्हा कर्ज घेण्याकरीता युरोपीयन कर्मशियल बँकेने अनुमती दिली व कर्जाची मर्यादा ही असिमीत होती. जोपर्यंत त्यांच्याकडे कर्ज वितरणाकरीता आवश्यक निधि असेल तो पर्यंत त्यांना कर्जे दिली गेली व याकरीता व्याजाचा दर निश्चित करण्यात आला होता. आरंभीच्या काळात हा व्याजाचा दर ४.२५% इतका होता व कर्ज घेणाऱ्याचा कालावधी सहा महिने इतका निश्चित करण्यात आला होता. मात्र अधिक काळ झाल्यावरही व्याजाचे दर कमीच होते. त्याच्या कालावधीत वाढ करून मागणीत सहजता निर्माण केली. बँकांना कर्ज देतेवेळी कोणतेही प्रतिबंध लादले गेल्या नव्हते, परंतु जून २०१४ मध्ये मारीओ डगी च्या नेतृत्वाखाली युरोपियन अधिकोषाने नंतरच्या कालावधीत कर्ज वितरणावर नियंत्रण आणणे आरंभ केले. केंद्रीय अधिकोषाकडून बँका ४ वर्षाकरीता कर्ज घेतील व त्याचा दर हा कमीत कमी असेल. परंतु ब्रिटीशांच्या कार्यक्रमानुसार जी रक्कम बँकेकडून उसनी घेतली आहे, त्याचा व्याजदर हा त्या संस्थेच्या कार्यावर आधारीत राहील जे प्रामुख्याने गैरवित्तिय व्यवसाय कर्ज देण्याचे कार्य करते.

वाढत्या महागाई दराचे लक्ष

दुसरा अन्य मार्ग तटस्थ व्याजाचा दर कमी ठेवण्याकरीता व त्यातील येणाऱ्या अडचणी किमान करण्याकरीता पुन्हा एक प्रमाणित स्फीतीचा दर लक्ष केला गेला व यात वृद्धी लक्षीत केली गेली. जर फेडरल यशस्वीपणे स्फीतीचे लक्ष जर ४% ऐवजी २ % ठेवणार असेल तर (फिशरच्या तत्वाप्रमाणे) सामान्य व्याज दराची पातळी यात २% वाढ होईल व त्याच प्रमाणे गुंतवणूकदार सुद्धा स्फितीतील वाढीनुसार क्षतीपूर्ती करीता अधिक मागणी करेल. जर तटस्थ व्याज दारातील वाढ २% इतकी असेल तर फेडरलला पुढील मौद्रीक धोरण राबविणे सोइस्कर होईल व यातून महामंदीवर उपाय योजना करण्याकरीता परिणामकारक साधनांचा वापर म्हणजे यात कपात केल्या जाईल व त्यामुळे मात्रात्मक सहजतेत घट व अन्य अनेक उपलब्ध साधनांचा वापर करणे शक्य होईल. सामान्यतः स्फितीच्या लक्षातील वाढ ही जाणतवे. तेव्हा तिचा व्यय किंवा परिणाम अर्थव्यवस्थेवर होणे सुरू होते. यामुळे एकूणच त्याचा परिणाम किंमतीवर होतो व बाजारीय अर्थव्यवस्था प्रभावी होते. यामुळे

दीर्घकालावधीतील नियोजन आवश्यक ठरते. प्रात्याक्षीक स्वरूपात काँगेस मधील अनेकांना हे मान्य व आवडण्याचे कारण नसणे म्हणजे स्फितीतील वाढीचे लक्ष हे दिलेल्या लक्षानुसार नेहमीच असेच राहात असेल तर फेडरलला किंमत स्थिरतेकरीता एक त्यांच्याच धोरणाला आव्हान राहिल. संक्रमण काळातील वाढीचे लक्ष हे अनेक कृत्यावरून स्पष्ट होते. उदा. स्फीतीतील वाढीची अपेक्षा ज्याचा आधार अनेक वर्षाचा असेल हे स्पष्टपणे उघड करते की, फेडरल ने जो २% दर ठरविला होता त्यात बरीच व बरेचदा उच्चावचने घडून आलीत. ज्यातून वित्तिय संकटे व आर्थिक अस्थिरता घडून आलीत. यानंतर लोकांना जर सवय झाली की या निश्चित दरात वारंवार बदल घडून येतात ज्याद्वारे अर्थव्यवस्थेत बदल व त्याचा प्रभाव दिसून येतो, व अन्य घटकावरही त्याचा परिणाम होतो. स्फितीच्या दराची अपेक्षा स्पष्ट करते की कदाचित भविष्यात हे अधिक कठीण होईल व त्याचा नवीन दर निश्चित करणे ही एक समस्या बनेल. व स्फितीचा दर हा २% पेक्षा नेहमीच अधिक राहिल. जरी स्फितीचा दर जास्त असेल व तो योग्य जरी नसेल व बाजारातील सहभागी दरांना हेच अपेक्षीत असेल तर तो तात्पूरता असेल तर अशा वेळेस तटस्थ व्याजाच्या दरात वाढ होईल. या सर्व कारणाकरीता धोरणाच्या पूर्नदृष्ट्कोनाचे अबलोकन करून फेडरल रिझर्व्ह समितीने भविष्यातील स्फितीच्या लक्षातील वाढ नाकारली. तथापी फेडरल रिझर्व्ह समितीने सरतेशेवटी २% पेक्षा स्फितीतील वाढ मान्य केली व याकरीता प्रभावी उपाययोजना करीता पाऊल उचलण्याचे निश्चित केले. एका प्रमाणित स्फितीतील लक्ष २०१२ च्या कालावधीतील नंतर जे कमी झाली होती तिला पुन्हा सामान्य दरावर आणण्याकरीता म्हणजे २% करीता फेडरल रिझर्व्ह ला प्रयत्न करावे लागले व यातील वाढ २% अधिक राहावी असे धोरणा अंतर्गत स्पष्ट करण्यात आले.

मौद्रीक राजकोषीय समन्वयन

राजकोषीय धोरणातील बदल ज्यात सरकार किंवा शासन प्राप्त कर राशीतून खर्च करते. त्याचा उद्देश अर्थव्यवस्थेला स्थिर करणे हा असतो. जेव्हां अर्थव्यवस्था गर्तेत असते. काही अर्थशास्त्रज्ञ याही पुढे जाऊन स्पष्ट करतात की, मौद्रीक धोरणाला जर मर्यादा घातल्या तर दराचा अधिक प्रभाव असेल, अशा वेळेस राजकोषीय धोरण हे मंदीतून किंवा अवनीतीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्याकरीता एक उपयुक्त साधन म्हणून उपयोगात आणणे योग्य होईल व अशा स्थितीत मौद्रीक धोरण एक सहाय्यक साधन म्हणून उपयोगात आणता येईल व त्याची तशी भूमिका राहील. राजकोषीय धोरणाचे अधिक फायदे एक साधन म्हणून असेल व राजकोषीय धोरण हे कधीही अप्रभावित ठरणार नाही. जेव्हा व्याजाचा तटस्थ दर

जर कमी असेल कमी व्याज दराऐवजी सरकारच्या कर्जातील व्ययात घट करून राजकोषीय धोरणाचा विस्तार करून त्याला अधिक आकर्षित केल्या जाईल. परंपरागत पद्धतीने किंवा चालत आलेल्या व्यवस्थेनुसार राजकोषीय धोरणाचा विस्तार करून सरकारने कर्ज घेणे किंवा वित्तिय खर्चात वाढ करणे किंवा करदरात कपात करणे याद्वारा ज्या रकमा एकत्र होईल त्याचा उपयोग गुंतवणूकी करीता करून व्याज दरात बदल केल्याने गुंतवणूक कारखान्याच्या स्वरूपात करणे शक्य होईल व अन्य साधनात देखील गुंतवणूक होईल. तथापी जेव्हा व्याजाचा दर हा खालच्या पातळीवर असतो या वेळेस खाजगी गुंतवणूकीत एक समस्या निर्माण होते, कारण या स्थिती खाजगी कारखान्यांना किंवा कंपन्यांना बाजारातून पाहिजे त्या प्रमाणात गुंतवणूकीची राशी प्राप्त होत नाही. दीर्घकालावधीत व्याजदरात वाढ, ही राजकोषीय धोरणात विस्तार घडवून आणणारी बाब ठरू शकेल व त्याचा लाभ प्राप्त होणे शक्य होईल यातून परतव्याचा दर अधिक राहिल व मौद्रीक धोरण राबवितांना त्यांना एक चांगली संधी प्रापत होईल ज्यात तटस्थ व्याजदराला देखील एक स्थान प्राप्त होईल. जर राजकोषीय धोरणाची व मौद्रीक धोरणाची ही तुलना केल्यास हे लोकाकरीता एक चांगले लक्ष असेल किंवा अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्राकरीता अधिक उपयोगी ठरेल. उदा. साथीच्या रोग काळात २.२ ट्रीलीयन डॉलरची केवळ अर्थव्यवस्थेला मदतच केली नाही तर याच निधीतून लोकांच्या आरोग्यावरील खर्च करण्यात आल होता व अनेक समुह तयार करून या संकटातून बाहेर काढण्याकरीता प्रयत्न करण्यात आले. ज्यात बेरोजगार व लहान व्यवसाय धारकांचा अंर्तभाव होता.

पॉवेल व बर्नान्के यांच्या सर्तकतेने वस्तुस्थितीचे प्रतिबिंब जे फेडरल रिझर्व्हच्या नेत्यांनी राजकोषीय धोरणाच्या कार्यात समावेश करण्यात आला. दुसऱ्या बाजूने विधायक जे मध्यवर्ती अधिकोषाकरीता निवडून आलेले नव्हते व राजकोषीय निर्णयाकरीता व फेडरलने या संदर्भात उचललेल्या पावलाकरिता त्यांचा क्रोध दिसून येत होता व त्यांची असहमती होती. मध्यवर्ती अधिकोषांच्या त्यांच्या विश्लेषण करणाऱ्याकडून व अर्थव्यवस्थेची माहिती देणाऱ्याकडून त्यांनी राजकोषीय हस्तक्षेपांची गरज व्यक्त केली तरी राजकोषीय धोरणकर्त्यांनी लक्ष देण्याचे टाळले. राजकोषीय धोरण व निर्णय यांचे केवळ प्रत्यक्ष वहन जे फेडरलच्या क्षमतेचे दोन्ही आज्ञांचे किंवा हुकमांचे पालन करणे होते. योग्य संतुलन, जे फेडरल करीता लोकांसमोर बोलायचे होते ते म्हणजे राजकोषीय कृती जी अर्थव्यवस्थेच्या स्थिरीकरण्याकरीता आवशयक होती. परंतु याकरीता पक्षपाती किंवा पक्षभिमानी म्हणून वाद

टाळणे गरजेचे होते. मुद्रा व राजकोषीय धोरण यातील समन्वयन घडून येणे व कायदा तयार करणारे एका अर्थाने अशा प्रकारचा नवीन कायदा तयार करून राजकोषीय कायद्याची अंमलवजावणी करण्याचे अधिकार फेडरलला दिले जाईल. तेव्हा मौद्रीक धोरण व राजकोषीय धोरण एकत्रीत कार्य करेल. व्याजदरातील बदलामुळे शासनाच्या किंवा सरकारच्या कर्जातील व्ययात वाढ होण्यामुळे त्याचा परिणाम होणार असेल तर फेडरल रिझर्व्हचे विशेष अधिकार जे स्पष्ट किंवा ध्वनीत आहे जे सर्वच मध्यवर्ती अधिकोषांना दिले आहे. ते सरकारी प्रतिभूतीची खरेदी करतील, कंपन्याचे बंध जे पत जोखीम वहन करतात त्यांचीही खरेदी केल्याने राजकोषीय धोरणांना प्रभावित करेल कारण प्राप्ती किंवा हानीचा प्रभाव संपत्तीतून प्राप्त होणाऱ्या मध्यवर्ती बँकाना प्रभावित करतात व जे राष्ट्रीय कोषागाराला नंतर स्थानांतरीत करण्यात येतात. या कारणाने फेडरल रिझर्व्हला दीर्घकाळात होणाऱ्या नुकसानीला सामोरे जावे लागते. युरोपियन मध्यवर्ती अधिकोषाने त्यांना जो लाभ प्राप्त होतो त्याद्वारा हे अधिकोष वाणिज्य अधिकोषाना देण्यात येणाऱ्या कर्जात संतुलन निर्माण करतात. याकरीता ते दीर्घकालावधीत पूर्न वित्ताचे दीर्घकालीन वितरण करून संतुलन साधण्याचा प्रयत्न करतात. यालाच ते (TLTRO's) Targeted by tern refinancing operation असे म्हणतात. दुसरे उदा. म्हणजे राजकोषीय धोरणाचे विशेष अधिकार जे मध्यवर्ती अधिकोष वापरतील तेव्हा सामान्यपणे मुद्दा असा आहे की ज्यात मुद्रा धोरण व राजकोषीय धोरण या दोन्हीना विभक्त करणारी रेखा म्हणजे त्यातील कायद्याचा प्रवाह होय. व याचे अवलंबित्व म्हणजे जे सामान्यत: त्याच्या कार्यपद्धतीवर व प्रत्यक्षपणे, राजकारण व कायदेव्यवस्था ही संख्यात्मक असलेली व्यवस्था होय. या कारणाने विधायक यांनी देखील ही बाब काळाची गरज ओळखून मौद्रीक राजकोशीय धोरण एकत्रीत करण्याला मान्यता दिली पाहिजे अशी भूमिका बर्नान्के यांनी घेतली.

आकाशयान मुद्रा (Helicopter Money)

काही अर्थशास्त्रज्ञांनी प्रस्तावित केले आहे की, अधिक उचित मुद्रा धोरण व राजकोषीय धोरणाचे प्रारूप यातील समन्वयन जे दोघांच्याही मर्यादा आज आपण अनुभवतो आहे व आज नित्यपणे विकसित व्यवस्थेचा ते एक भाग म्हणून कार्यरत आहे. बर्नान्के असे म्हणतात की त्यांना याठिकाणी वाटत नाही की, यात एकूणच विदेशी प्रारूपातील समन्वयन लवकरात लवकर घडून येईल. विशेषत: यु.एस.ए. मध्ये ते शक्य नाही. परंतु हे पर्यायी धोरण म्हणून अतिशय गर्त अवस्थेत उपयोगी ठरेल. याकरीता नाविन्यपूर्ण उदा. म्हणजे, आकाशयान मुद्रा होय (Helicopter Money) मिल्टन फ्रीडमन यांचा भविष्याचा विचार,

वर्तमानात जपानमध्ये असलेल्या चालू स्थितीपेक्षा वेगळी राहणार नाही, अर्थव्यवस्था सातत्याने मंदीमुळे त्रस्त आहे. ज्यात अल्पकालावधीतील व्याजदर व दीर्घकालावधीतील व्याजदर हा शून्य आहे केवळ मौद्रीक धोरणाने हे प्रश्न सुटणार नाही व त्यांचे उद्दिष्ट पण प्राप्त करता येणार नाहीत. यानंतर जर फ्रीडमनच्या मुलत: विचारातील अनुभव अधिकारी यांनी जर आकाशयान पाठवून नवीन मुद्रा किंवा चलन ह्या आकाशातून खाली टाकल्या तर लोक ते ताबडतोब गोळा करतील व ही नवीन मुद्रा लोक खर्च करतील तेव्हा यावर फ्रीडमन म्हणतात किंमतीत वाढ होईल व मंदी किंवा अपस्फिती समाप्त होईल जर हे फ्रीडमनचे तत्त्व वास्तवात आणले तर आपण यातून निर्माण होणारी स्थिती समजू शकतो जी आकाशयान मुद्रा, मंदी किंवा अपस्फिती थांबविण्याकरीता योग्य असेल किंवा नसेल! जर याचा उपयोग आधुनिक अर्थव्यवस्था म्हणून यु.एस.ए. ने केला तर आकाशयान मुद्रेला दोन घटनांना सामोरे जावे लागेल. पहिला भाग म्हणजे कॉंग्रेस हे करात मोठी कपात सुचवेल, जे काही नसनाऱ्याकडे त्याचा वापर करतील. हे स्वीकारल्यास, यातील निश्चितपणा जर उपहार म्हणून करकपात ५०० बिलीयन डॉलरची असेल तर सामान्य स्थितीत कोषागार हे ५०० बिलीयन डॉलरचे उपहार (Rebate) सरकारच्या नावे म्हणून कर्ज देतील. जे नंतर खाजगी गुंतवणूकदारांना विकल्या जातील पण असे करण्यापूर्वी व करण्याऐवजी, दुसरे म्हणजे फेडरलने प्रत्यक्षात उपहार द्यावे. प्रत्यक्षात याचे सर्वात साधा मार्ग म्हणजे फेडरलने कोषागाराचे खाते लेखा उघडावे, ज्यात ५०० बिलीयन डॉलरचे क्रेडीट व डेबीट बाजूला नोंद घेण्यात येईल. त्यानंतर कोषागार या खात्यातून पैसे काढून लोकांना धनादेशाचे वितरण करेल. पर्यायाने व सारखेपणाने, कोषागार शून्य व्याजदराने पैशाचे वितरण करेल जे निश्चित असे कर्जाचे स्वरूप असेल, नंतर फेडरल खरेदी करेल याचे देणे ठेवी राखून त्यातून देण्यात येईल व हे देणे फेडरलला आपल्या लेख्यातून कोषागाराला वळते करावे लागेल. या दोन्ही पद्धतींना एकत्रीत केल्यास करातील कपातीतून फेडरलच्या ताळेबंदातील विस्तार हे खरोखरच वास्तविक किंवा समतूल्य असे फ्रीडमचे अनुभव व्यवहारीय ठरेल.

याचे अंतिम परिणाम म्हणजे आकाशयान मुद्रेचा पुरवठा करून हे सांगण्यासारखे होईल की, जे परंपरेने चालत आलेले आहे "कर्जाच्या वित्तावरील कर उपहार" असे राहिल. कदाचित पूरक म्हणून मात्रामक सहजता याला दीर्घकालावधीकरीता त्याच्या दरात कपात करण्यासाठी होईल. आपण १९२० पासून विविध देशातील एकूण स्थितीचे अध्ययन करतो तेव्हा व्हेनेझुएला ते जर्मनी अलीकडच्या किंवा नजदिकच्या कालावधीतील

ज्यातील सरकारी खर्च किंवा व्यय दरातील वित्त मुद्रा निर्मित अति स्फिती निर्माण झाली. कधी कधी तर उच्च स्फितीचा दर निर्माण झाला. या दोन उदाहरणात फरक म्हणजे मध्यवर्ती अधिकोष हे स्वतंत्र नाही व ते शासनाचे साह्यक आहे. स्वतंत्र मध्यवर्ती अधिकोष जे किंमतीच्या स्थिरतेबाबत निश्चित सांगू शकतात व सरकारी खर्चावर प्रतिबंध लावू शकतात व कडक शिस्तीच्या धोरणाचा वापर करतात, जेव्हा स्फितीच्या वाढीची शक्यता किंवा तशी भिती निर्माण होते. ज्या मध्यवर्ती अधिकोषांना स्वातंत्र्य नाही त्यांना अशा प्रकारचा विकल्प नसतो त्यामुळे त्यांना मुद्रेचा सतत पुरवठा करणे व दर कमी ठेवणे जेव्हांपर्यंत शासनाला वाटत असेल, तोपर्यंत अशा स्थितीत शासनाचे प्राधान्यरूप त्याची राजकोषीय गरज किंमतीच्या स्थैर्यापेक्षाही अधिक महत्वाची असेल तर स्फितीचा दर नियंत्रणाच्या बाहेर जाईल. अशा स्थितीत सरकार, मध्यवर्ती अधिकोषाच्या स्वातंत्र्यापेक्षा मौद्रीक धोरणावरील नियंत्रण व किंमत स्थिरता आपल्या अवाक्यात आणेल त्याच्या राजकोषीय आवश्यकतेनुसार याला "राजकोषीय प्रभाव"(Fiscal Dominance) असे म्हणतात. राजकोषीय प्रभाव "अवकाशयान मुद्रा" हे स्फितीकारक असेल. तथापी यु.एस.ए. या स्थितीपेक्षा अजूनही दूर आहे.

आधुनिक मौद्रीक सिद्धांत

अनेक अर्थशास्त्रज्ञ राजकोषीय प्रभावावरील विश्वास या बाबीशी संबंधीत आहे. असतात एखाद्या देशाच्या युद्धामुळे निर्माण झालेल्या स्थितीने, फार मोठे निर्माण झालेले संकट, किंवा राजकोषीय अस्थिरता होय. जे आपण टाळू शकतो, तथापी आधुनिक मुद्रा सिद्धांताचे पुरस्कर्ते यांच्या अनुसार राजकोषी प्रभुत्वाचे प्रारूप किंवा चौकट हे अर्थव्यवस्थेला एक चांगल्या प्रकारचे व्यवस्थापन देऊ शकतात. आधुनिक मुद्रा सिद्धांत यांना लोकशाही प्रगती, राज्यकर्त्यांनी ज्यात जेरीन सॅनडर्स व अल्केझांड्रीयाचे प्रतिनिधी, ऑडेसीओ, कॉर्टेज यांनी या बाबीकडे आपले लक्ष ठेवले. आधुनिक मुद्रा सिद्धांत हे एक सैध्दांतिक मिश्रण होय ज्यात सैध्दांतकीय समस्या व धोरण व विषयी सुचना दिलेल्या असतात. ज्या अंतर्गत शासनाने नौकरी देण्याच्या संदर्भात स्पष्ट केले आहे. याठिकाणी मी स्पष्ट करतो की काही समस्येचे संबंध ज्या मौद्रीक व राजकोषीय या दोन्ही धोरणातून दिसून येते. परिणामकारक पणे आधुनिक मुद्रा सिद्धांत व त्याला मान्यता देणारे हे स्पष्ट करतात की मध्यवर्ती अधिकोषाचे स्वातंत्र्य काढून टाकावे व राजकोषीय प्रभुत्वास संस्था म्हणून मान्यता देण्यात यावी. यादृष्टीने मौद्रीक धोरण हे व्याजाचा दर किमान किंमतीला नेहमीच निश्चित करतात. जर त्याचा दर शुन्य असेल तर त्या दोन मधील फरक

म्हणजे मुद्रा वित्त व कर्ज वित्त, शासकीय खर्च हे कमी करावे, शासनाचे किंवा सरकारचे सर्व प्रकारचे दायित्व हे शुन्य व्याजदराने देण्यात येतील. अशा वेळेस राजकोषीय धोरण अशा प्रकारचा भार (Charged) निश्चित करतील ज्यात अन्य देशाचा पण समावेश असेल यामुळे आर्थिक स्थिरतेची निश्चितता व किंमत स्थिरता आपोआप निर्माण होईल.खर्चाचे धोरण, उदा. उच्च कर यामुळे खाजगी खर्च कमी होतो, ज्यामुळे स्फितीवर नियंत्रण येईल व अन्य धोरणानुसार ज्यात किंमत नियंत्रण व रोजगाराची हमी चा समावेश असेल यात असेही दिसून येते की दीर्घकालावधीतील परिणामकारक अडथळे या कारणाने मौद्रीक धोरण व राजकोषीय धोरण हे दोन्ही धोरणे दीर्घकालावधीत वर्तमानात महत्वाची भुमिका भुतकाळा पेक्षा जास्त महत्वाची ठरणारी असेल. ज्यात प्रामुख्याने अपूर्ण रोजगार दर निश्चित करणे किमान स्फीतीचा दर टाळणे असेल. राजकोषीय धोरणाच्या परिणामामुळे स्वयं स्थिरतेत वाढ होण्यास मदत झाली. सरकारी खर्चाबद्दल किंवा कर यांच्यात समन्वय निर्माण करून त्याचा संबंध आर्थिक निर्देशासी करून त्याचा उपयोग करून घेण्यात येईल उदा. काँग्रेसने आधीच कायदे करून विम्याच्या बेरोजगारीतील वाढ जी स्वयंभू बेरोजगारीत अधिक वाढ झाल्याने त्यात वाढ घडून आली. यातील वाढ होण्याचे कारण म्हणजे आर्थिक स्थितीतील बदल होय. स्वयंचलीत स्थिरता ही राजकोषीय धोरणांना अधिक जबाबदार व किमान राजकीय अडचणींना किंवा संकटाशी सामना करणारा असेल. काँगेसने सापेक्षपणे यात आपला कमी सहभाग नोंदविला. तथापी, यातून मुख्य कष्ट किंवा परिश्रम म्हणजे राजकोषीय धारेणाच्या लवचिकतेत वाढ करणे होय व मौद्रीक धोरणातील सातत्यता ही देखील अन्य धोरणाच्या स्थिरतेकरीता एक महत्वाचे साधन ठरेल.

मौद्रीक धोरण व वित्तिय स्थिरता

फेडरल रिझर्व्हची स्थापना १९१३ मध्ये झाली. मौद्रीक धोरण तेव्हा आधुनिक स्वरूपात नव्हते सुवर्ण प्रमापाचे युग किंवा काळ सुरू होता. परंतु दीर्घकाळात जर एखादे वित्तिय संकट आले असेल व शेवटचा आश्रयदाता म्हणून कार्य करावयाचे असेल तर हे सर्व थांबविण्याकरीता व मदत करण्याकरीता फेडरल रिझर्व्हची भुमिका महत्वाची ठरत होती. वालटर बॅगहॉट ने सांगीतलेल्या नियमाप्रमाणे, जेव्हा बँकेत ठेविदार व अन्य अल्पकालावधीत कर्ज देणारे आपला विश्वास गमावतात आणि त्यांच्या ठेवी म्हणून ठेवलेल्या रकमा काढून घेतात. अशा वेळेस मध्यवर्ती अधिकोषाचे कार्य म्हणजे त्यांनी कर्जाचा पुरवठा वित्तीय संस्थांना विनामुल्य करावा. त्यांनी गौण हमी म्हणून त्यांच्या वस्तूचा, कर्जाचा व कमी मुल्य झालेल्या संपत्तीचा उपयोग याकरीता करावा.

याद्वारा ते खाजगी क्षेत्राच्या कर्जाचे, पूर्ण निर्माण करून व याशिवाय शेवटचा आश्रयदाता म्हणून जे याकरीता व्यय येतो त्यात ते यशस्वीपणे सहकार्य करून अशा प्रकारच्या पैशाची हमी घेतील व ते आपल्या ठेविदाराकरीता प्रेरक म्हणून कार्य करतील याचा परिणाम वित्तिय प्रवाह चालू ठेवणे शक्य होईल व बँकांच्या अतिमहत्वाच्या असलेल्या संपत्तीची विक्री केली जाईल व यामुळे बँकांना आपले पुढील व्यवहार करण्याकरीता सहजता प्राप्त होईल व निर्माण झालेल्या भितीच्या स्थितीला शांतपणे समोर जाणे बँकांना शक्य होईल. जरी मुलभूत तर्क तसाच राहणार असेल तरी फेडरल रिझर्व्ह शेवटचा आश्रयदाता म्हणून कार्य करेल. त्यांच्या कृतीचा व धोरणाचा समावेश यु.एस.ए. च्या वित्तिय पद्धतीच्या रचनेत केल्या जाईल. जेव्हां फेडरल रिझर्व्हची स्थापना केल्या गेली, पत वितरणाचे कार्य त्यावेळी बँकाद्वारा केल्या जात होते व यामुळे बँकांना त्यांच्या स्थिरतेविषयी प्रश्न व भिती निर्माण होत होती. तथापी २००७ मध्ये मोठ्या प्रकारचे कर्ज हे प्रतिभूतीच्या बाजारातून गैर अधिकोषीलय वित्तिय संस्थेतून दिले गेले. यालाच आपण प्रति व्यवस्था पद्धती म्हणतो (Shadow Banking System) वित्तिय संकटाच्या कालावधीत, फेडरलने आपली भूमिका या कालावधीत नियमाप्रमाणे विस्तारीत केली व त्यात वाढ घडवून आणली व शेवटचा आश्रयदाता म्हणून त्यांनी आपली भूमिका योग्यपणे अंमलात आणली. या कालावधीत त्यांनी आणिबाणीच्या काळातील असलेल्या कायद्याचा वापर केला व याचा आधार घेत मोठ्या प्रमाणावर कर्जाचे वितरण केले. ज्यात बाजार व संस्थांचा अंतर्भात होता व काही गैरवित्तीय संस्थांना कर्जाची मदत दिली गेली. अल्पकालावधीतील अतिशय तिव्र अशा वित्तिय संकटाने जे मार्च २०२० मध्ये निर्माण झाले होते व या स्थितीत फेडरलने अधिक समोर जाऊन खरेदीदार म्हणून व शेवटचा आश्रयदाता म्हणून ट्रेझरीकडून व अन्य संस्थेकडून प्रतिभूतींची खरेदी करून त्याद्वारा एकत्रीत मदत करण्याचे कार्य केले. महामंडळाला देण्यात येणाऱ्या कर्जाला मदत करणे शिवाय स्थानिक संस्थांना व मध्यम प्रकारच्या व्यापाऱ्यांना मदत करणे हा उद्देश फेडरलने ठरवलेला व यात त्यांना यश आले. जरी वैश्वीक वित्तिय संकट व साथीचे रोग (Pandemic) याब्दारा मोठ्या प्रमाणात व प्रबळ अशी प्रतिसादाची गरज होती; ती फेडरलने योग्य प्रकारच्या नियंत्रणाचा वापर करून व याकरीता त्या साधनाचा उपयोग करून जी अस्थिरता निर्माण झाली होती त्यात शिरकाव करण्याचे एक मोठे कार्य फेडरलने केले. तथापी फेडरलच्या इतिहासावरून हे स्पष्ट होते की, त्यांच्या हस्तक्षेपाने केवळ तात्पूरत्या स्वरूपाची होती, व त्यांचा कार्यभाग स्वतंत्र होता. जो बौद्धीक पेटीतून मौद्रीक

धोरणाचा भाग म्हणून धोरणकर्ते मौद्रीक साधन याचा उपयोग हे निर्माण झालेल्या वित्तिय स्थितीत ज्यात गडबड व गोंधळ निर्माण झाला अशा वेळेस या साधनाचा परिणामकारक वापर फेडरल द्वारा केला गेला . एशियाच्या १९९० च्या वित्तिय संकटकाळात ही याचाच वापर केला. परंतु २१ व्या शतकात फेडरलच्या भूमिकेबद्दल जी वित्तिय स्थिरता निर्माण करण्यासाठी उपयोगात आणली जात होती त्यात पुढील दिशेने त्या भूमिकेचे स्थानांतरण केले. यात प्रामुख्याने शेवटचा आश्रयदाता म्हणून जी साधने उपयोगात आणली जात होती त्यातील बदल किंवा स्थानांतर महत्वाचे होते.

वित्तिय अस्थिरता व त्याचे आर्थिक परिणाम

मागील काही वर्षात फिनाशियल टाईम्स मधील,स्तंभातून या वैशिष्याचे ज्याचे लहान स्वरूपात नामकरण करून त्याला " गहनसमस्या" म्हणून फिनाशियल टाईम्सने लिहले त्यातून दिसून येते की ते कायद्याच्या विरोधात किंवा वित्तिय बाजाराची अविवेकी भुमिकेच्या संदर्भात यावर जेव्हा लिहिल्या गेले तेव्हा ते कधी कधी मनोरंजनात्मक व सुचना करणारे आहे असा त्यांचा भास झाला. यावरून हे स्पष्ट होते की, पुढील काळात भयानक प्रकारे वित्तिय संकट निर्माण होणार आहे व हे अनेक भागातून ध्वनित होते. हे सत्य आहे की, अधिक व निश्चित संपत्ती किंवा व्यापार जेव्हा अतिरिक्त जोखीमीचे वहन करतो तेव्हा त्यातून स्पष्ट होते की, वित्तिय संकटे हे जरी दुर्मिळ असले तरी वैयक्तीक वैचीत्र्याने संपत्तीच्या किंमतीत गोंधळ निर्माण होईल ज्याचा प्रामुख्याने उल्लेख फिनाशियल टाईम्स ने केला आहे. याद्वारा सुचित केले जाते की प्राप्त सुचनेपासून हे स्पष्ट होते की तयार केलेला कायदा दुर्बल किंवा निराधार स्वरूपाचा आहे आणि म्हणून एका निश्चित रकमेतील उच्चावचने ज्याचे विश्लेषण वित्तिय बाजारातील किंमतीच्या संदर्भात करणे एक कठीण कार्य असेल जे संपूर्णपणे सामान्यत: एक सतत चांगल्या अर्थव्यवस्थेकरीता उपयुक्त म्हणून असणार नाही. याच्या विपरीत वित्तिय अस्थिरता ज्याद्वारा वित्तिय कार्य करण्याकरीता एक भिती त्या संपूर्ण व्यवस्थेतून दिसून येत असेल व एक मुख्य व कार्यक्षम अशा अर्थव्यवस्थेत पुढे दिसणारे असेल ज्यात वास्तविक अर्थव्यवस्था प्रामूख्याने गैर वित्तिय व्यवस्थेकरीता ते लागू होणारे असे असेल, हे त्या राबवलेल्या धोरणाशी मुख्यत: संबंधीत असेल. योग्य पद्धतीचे वित्तिय प्रसंग वित्तिय संकटाच्या प्रमाणे किंवा २०२० चे साथीच्या रोगाचे संकट हे फार दुर्मिळ आहे पण त्याद्वारे अनेक प्रकारचे नुकसान घडून आले असेल तर अशा प्रसंगात किंवा संकटाचा सामना करण्याकरीता यात घट करणे व त्याच्या परिणामाचा चांगल्या पद्धतीने उपयोग करणे याची शक्यता घडून येते तेव्हा अशा

साधनाचा वापर महत्वाचा ठरेल व याला धोरणकर्त्यांनी प्राथमिक स्थान देण्याचे करावे.

स्कंध बाजारातील बुडबुडा

स्कंध बाजारातील अतिशय तेजी व घसरण त्याला नेहमीच घडून आल्यावर याला बुडबुडा म्हणून संबोधण्यात येते किंवा भांडवल बाजारातील अतिशय तेजीच्या अवस्थेत याचे असेच नामकरण केल्या जाते हे जर घातक ठरणार असेल तर ते इतिहासाचा एक प्रसंग म्हणून ओळखला जाईल. १९२९ च्या महामंदीत जेव्हां भांडवल बाजार तिव्र वेगाने खाली आला तेव्हा यु.एस.ए. मधील अनेक लोकांनी याला अवनितीची स्थिती म्हणून ओळखले. ज्याप्रमाणे २००१ मध्ये तंत्रज्ञानाचा बुडबुड पूर्णत: तुटला व फुटला. या नेहमी घडून येणाऱ्या स्थिती यातून एक वेगळा मार्ग म्हणजे १९९० मध्ये अति उत्साहवर्धक व २००० मध्ये उत्साहीत स्थिती निर्माण झाली होती. स्कंधातील निर्माण झालेल्या बुडबुड्यांचा स्रोत म्हणजे, हे प्रामुख्याने मानसशास्त्रीय व आर्थिक घटकाचे परिणाम होय. या बाबतीत याचे पूर्वानुमान करणे किंवा तशी अपेक्षा करणे हे एक कठीण कार्य आहे. व ही कारणे शोधून काढणे शक्य होत नाही. अधिक गतीने व शाश्वत पणे, स्कंध बाजारातील किंमतीतील वाढ हे आशावादी धोरण समोर ठेवून व अर्थव्यवस्थेवर विश्वास ठेवून जी नवीन काळातील एक जमेची मोठी बाजू होय. १९२० मध्ये मोठ्या प्रकारचे उपभोक्ता उत्पादन झाले व भृतीच्या दरातही याच कालावधीत मोठी वाढ झाली व लोकांना त्यांच्या कामातून कार्य अवकाश सुद्धा प्राप्त झाला होता. यातूनच आशावाद निर्माण झाला. १९९० चा बुडबुडा इंटरनेट च्या क्रांतीमुळे व यातून लोकांचा विश्वास निर्माण झाला व या क्रांतीने लोकांमध्ये एक उत्साह नव्याने निर्माण झालेल्या औद्योगिक क्रांती सारखा होता व जो पूर्णपणे चुकीचा नव्हता. प्रत्येक नवीन तंत्रज्ञानामुळे त्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आर्थिक व सामाजिक जीवनावर झाला व जे अधिक लाभदायक ठरले. परंतु या दोन्ही ठिकाणी कमी परिपक्क असलेला वाद किंवा प्रसंगाच्या हस्तक्षेपामुळे स्कंधाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात घट झाली. किंमती कमी होण्यामागे दुसरा घटक म्हणजे मौद्रीक धोरण होय. सुलभ मुद्रा धोरण स्कंधाच्या किंमतीत वाढ घडवून आणते. याचे कारण म्हणजे अर्थव्यवस्था पुढील दिशा स्पष्ट करते. यात कंपन्यांचा वाढणारा नफा होय व्याजाच्या कमी दरामुळे ज्यामुळे भविष्यातील लाभ किंवा नफा कमी होणार असेल तर तो कमी नफा स्विकारणे शक्य होणार नाही. परंतु गुंतवणूकदार काही कालावधीकरीता हे सहन करून जोखीम स्विकारणे पसंत करतील. आणि म्हणून सहजमुद्रा ही वास्तविक उत्पन्नाला प्रभावित करते. कारण अशा प्रसंगी संपत्तीच्या किंमतीत मोठी वाढ

होते. एकूण अभ्यासावरून असे दिसून येते की, अनेक वस्तुस्थिती अंतर्गत सापेक्षरित्या मौद्रीक धोरण हे केवळ आधुनिक साधन म्हणून त्याचा प्रत्यक्ष परिणाम स्कंधाच्या किंमतीवर होतो. याच्या उपरोधात सक्षम असा परिणाम जेव्हा मुद्रेचे योगदान स्कंधाच्या किमतीतून नगद स्वरूपात प्राप्त केले जाते जे १९२९ मध्ये व २००१ मध्ये दिसून आले.

संघर्षा विरूद्ध साधनाची लढाई

समग्रदृष्टी धोरणाचा उपयोग, संघर्ष व त्याच्या तीव्रतेची वारंवारिता कमी करण्यात मदत झाली याचा आपल्याला कधीही विसर पडणार नाही. जेव्हा आपणास पाहिजे त्या प्रमाणात साधनांची गरज संकटे किंवा त्याचातील तीव्रता कमी करण्याकरिता भासेल. जेव्हा अशा प्रकारची स्थिती निर्माण होईल, तेव्हां या साधनाचा वापर करता येईल. यु.एस.ए. मध्ये डॉड फ्रँकद्वारा याच स्थितीवर नियंत्रण ठेवून त्यांनी नियामकाला जर स्थितीत काही गडबड झाली असेल किंवा होणार आहे असे दिसत असेल तर अशा वेळेस योग्य कार्य करीत नसलेल्या किंवा योग्य पद्धती उपयोगात आणण्यात येणारी नसेल तर अशा किंवा स्थितीत गैरअधिकोषीय किंवा गैर बँकींग पेढीचे कार्य वित्तिय स्थिरता अस्थिर वेळेस किंवा स्थितीत गैर किंवा गैर बँकींग पेढीचे कार्य व ज्याद्वारे वित्तिय स्थिरता अस्थिर केली जाते अशावर कार्यवाही करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करणे याचा अधिकार नियामकांना देण्यात आला होता. त्यांच्या करीता दुसरी अशी एक नियंत्रणाची चौकट निर्माण केली होती ज्यात अशा साधनाचा समावेश होता ज्याद्वारे निर्माण झालेले संकटे / व संघर्ष सोडविले जातील व संपूर्ण देश म्हणून एक कार्य करेल व निर्माण होणाऱ्या कोणत्याही संकटाचा सामना करील. जे संकटे प्रामुख्याने अनेक पेढ्याद्वारा निर्माण झालेले असेल. यात संयुक्तपणे देखील कार्य नियामकाचे कार्य अपेक्षीत आहे. दुसऱ्या बाजूने जी या कार्याकरीता अधिकार पद असणारी व्यवस्था आहे ती संस्था गैर बँकींगचे संकटे दूर करतील जे कमी लवचिक असतात त्याचा निपटारा फेडरल रिझर्व्ह च्या समितीद्वारा केला जाईल व याद्वारा ज्या बँका योग्य नियमानुसार कार्य करीत नाही त्यावरही कार्यवाही करण्याचे अधिकार फेडरलच्या समितीला आहे व नियामकाद्वारा जे विमा वित्त पूर्व नियोजीत आहे ते कमी किंवा काढून घेणार नाही, जेव्हा ते गैरबँकेचे व पेढीचे समस्याचे निराकरण करतील. या संदर्भात येणारा कोणताही व्यय किंवा खर्च, सरकार देण्याकरीता बाध्य करेल जेव्हा वस्तुस्थितीचे योग्य व समर्पक असे मुल्यमापन झाल्यावर उद्योगांना शुल्क भरणी करावे लागेल. यातून हा बदल बदल जाणवणारा असेल तर यापेक्षाही जे २००८ मध्ये घडून आले तेव्हां डॉड फ्रँक चा कायदा व ती समिती या कार्याकरीता खरी उतरली आहे असे म्हणता येत नाही.

फेडरलचे स्वातंत्र्य

फेडरल रिझर्व्हने बरेचदा त्याच्या स्वातंत्र्या विषय विवेचन व आपली स्पष्टता दर्शविली आहे. याचा अर्थ असा होणार नाही की फेडरलला पूर्ण स्वयत्तता द्यावी. लोकशाही दृष्ट्या ते मान्यही होणार नाही किंवा या कारणाने फेडरलने राजकारणापासून घटस्फोट घ्यावा. याच्या विरोधात आपणास असे म्हणता येईल की फेडरल हे राजकीय व्यवस्थेचे एक घटक होय. त्याची सत्ता व रचना व त्यांचे असणे हे फेडरलच्या अंतर्गत सांगीतल्या गेलेल्या नियमाप्रमाणे कार्यान्वित होते. जे काँग्रेस यात केव्हांही दुरूस्ती करू शकते. फेडरलच्या मंडळाचे पदाधिकारी, हे राजकीय व्यवस्थेतून नियुक्त केले जातात व त्याचा प्रमुख व अन्य पदाधिकारी हे कायद्याद्वारा ठरत असल्याने त्यांना फेडरलची माहिती व कृती व नियोजन हे कागदपत्रांच्या साह्याने उपलब्ध करून द्यावे . मी माझ्या शेवटच्या वार्ताहर परिषदेत अध्यक्ष म्हणून बोलतांना स्पष्ट केले व जेव्हा मला माझ्यानंतर अध्यक्ष म्हणून निवड केलेल्या व्यक्तीला उपदेश दिला की काँग्रेस हे सर्वात वर व आमचे श्रेष्ठ आहे, ज्याने आमची अर्थव्यवस्था व वित्तिय पद्धत प्रभावित होते कधी कधी ते रक्षणकर्ता म्हणून तर कधी कधी दुसऱ्याच्या दोषाबद्दल सांगणारा अशा प्रकारे फेडरल अनेक विषयाशी संबंधीत असून त्यांचा भावनिक आपलेपणा व हित राजकीयाशी संबंधी असतो. तथापी वास्तविक राजकीय अडथळयांनी फेडरलला प्रत्यक्षात स्वातंत्रय असणे आवश्यक आहे. काँग्रेस हे फेडरलचे उद्दिष्टे निश्चित करते ज्यात किंमत स्थिरता अधिकत्तम रोजगार असते व दुरदृष्टिकोनाची जबाबदारी दिली जाते. परंतु फेडरल दरांचे निर्धारण करणे, एखाद्यावर ऑक्शन घेणे व त्याची अंमलबजावणी करणे, त्यांना दिलेल्या हुकूमाद्वारे व उद्देशानुसार, कार्य करणे ज्यात कोणताही राजकीय हस्तक्षेप नसतो ही फेडरलची जबाबदारी होय.

अनेक देशात वेगळ्या पद्धतीने, परंतु यु.एस.ए. मध्ये असा कोणताही कायदा नाही जो स्पष्टपणे फेडरलच्या स्वातंत्र्याची हमी घेईल तरी परंतु प्रत्यक्षात फेडरलची ध्येय धोरणे हे काही प्रमुख उपलब्ध असलेल्या कायद्याने संरक्षीत असतात. यात दीर्घकालीन अशा मंडळाच्या प्रमुखांचा समावेश आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, जर धोरणात मतभेद असेल तर गर्व्हनरला अध्यक्ष काहीही बोलू शकत नाही व फेडरलच्या कार्यक्षमतेत बदल (हे काँग्रेसवर अवलंबून असेल) देखील बोलता येणार नाही ज्यात प्रामुख्याने वित्तिय व्यवस्था व त्यापासूनचे परतावे जे प्रतिभूतींतून प्राप्त होते. जे फेडरलने धारण केले आहे. याप्रमाणे जर याला विरोध होत असेल तर काँग्रेसवर अधिक अवलंबून असल्याने अशा स्थितीतील वित्ताची सोय काँग्रेसकडून केली जाईल. सर्व अशा तरतुदीना

मदत केली जाईल ज्याचे प्रतिबिंब दीर्घकालीन विश्वास हा सर्वांचा काँग्रेसवर राहील. याला काही अपवाद असेल तर मुख्यत: निकसन नंतर ट्रम्प यांना स्वतंत्र्य अशा मध्यवर्ती अधिकोषाने राजकीय व आर्थिक लाभ सढळ हाताने उपलब्ध करून दिले. फेउरल रिझर्व्ह सिस्टमच्या द्वारे तयार केलेले उद्देश निहाय पत्र हे देखील त्याच्या स्वातंत्र्याला साह्य करते. अध्यक्ष व मंडळाचे सभासद जे प्रादेशिक रिझर्व्ह बँकेचे द्वारे जवळचे संबंध विकसित होऊन त्याचे रूपांतर संबंधामध्ये होते. ज्याने स्थानिक राजकीय व व्यापारी नेते जे अडचणीच्या प्रसंगी फेडरलच्या स्वायत्त होण्याला मदत करतात.

फेडरल रिझर्व्ह व समाज

फेडरलचा मुख्य उद्देश व कार्य म्हणजे अर्थव्यवस्थेचे स्थिरीकरण करणे होय व वित्तिय पद्धतीतील निर्माण झालेल्या प्रश्नावर काही मदत करणारे ठरेल काय, जे नव्याने आव्हाने निर्माण करणारा असेल अशाही आव्हानांना फेडरल समोर गेला आहे. उदा. दाखल, पर्यावरणीय बदल, सामाजिक बदल, राजकीय बदल यांचा परिणाम होय. दुसऱ्या बाजूने साथीच्या रोग काळातील संकट अमेरिकन समाजव्यवस्थेत त्यांनी मोठी दरी निर्माण केली यामुळे यु.एस.ए. मध्ये मोठी विषमता निर्माण झाली आहे. जी प्रामुख्याने संपत्ती व उत्पन्नाच्या बाबतीत आढळून येते. याचा परिणाम व आर्थिक व्यवस्थेच्या गतिशीलतेवरही झाला. निरंतर घडून आलेल्या विषमतेने त्याचा परिणाम आरोग्य व शिक्षण व प्राप्त होणाऱ्या आर्थिक संधीवरही झाला. काळे लोक, हिस्पॅनीक लोक व अन्य असे अल्पसंख्यातील समुह हे अतिशय त्रासदीच्या स्थितीत होते व या काळात त्यांना कोणताच मोठा लाभ प्राप्त झाला नाही. अशा प्रकारची समस्या सोडविण्याकरीता फेडरलने कोणती मदत केली? दुसऱ्या बाजूने अधिक सत्ता असलेली फेडरल. लोकांकरीता काही करण्याकरीता त्यांना काँग्रेसची अडचण येत होती की मर्यादीत साधनाची अडचण? लोकशाही मध्ये, निवडून आलेले प्रतिनिधी हे काही नियुक्त केलेले नाही जसे फेडरलच्या गव्हर्नरची नियुक्ती केली जाते तशी, आणि म्हणून जनप्रतिनिधीने कार्याचा पसंती क्रम निश्चित करावा व यातून कठीण अशा सामाजिक प्रश्नांची उकल करावी व यातूनच फेडरलची कार्य करण्याची क्षमता व मर्यादा तपासता येईल. दुसऱ्या बाजूने जेव्हां फेडरलला संधी प्राप्त झाली, जी कायद्याद्वारे प्राप्त अधिकारातून त्यांनी त्या कायद्याचा रचनात्मक वापर केला व नियमीत अशा दिशेने जे राज्यकर्त्यांनी व लोकांनी ठरविले होते त्याप्रमाणे फेडरलने आपले कार्य केले.

आर्थिक धोरणांचा या आव्हाना पलीकडे फेडरल ला लोकांच्या बाबातीत असलेली जाणिव अगोदर पासूनचीच होती. अलीकडील काळातील

फेडरलची भुमिका ही आर्थिक व वित्तिय संकटाच्या संदर्भात अतिशय महत्वाची असल्याने अशा स्थितीत कार्य न करणाऱ्या संस्था किंवा सुस्त झालेल्या संस्था यांनी कार्यास सुरूवात करून त्या देखील आर्थिक प्रवाहात येऊन कार्य करू लागल्या. यामुळे आर्थिक जगात १९९६ पासून मोठ्या प्रमाणात बदल घडवून यायला सुरूवात झाली. अँलन क्लिंडर जे मंडळावर माजी अध्यक्ष म्हणून कार्यरत होते ते लक्षावधी अमेरिकन लोकांना सांगत ते की अजूनही तुम्ही विचार करा, फेडरल रिझर्व्ह व त्यांची पद्धत ती शासनाची एक पद्धत होय व शासकीय पुरस्कृत संस्था होय, जे वने व वनजीवन धारण करते व ज्याठिकाणी अपेक्षीतपणे बैल व अस्वल हे जंगलात फिरतात प्राणी उड्या मारून मौज मजा एकत्रीतपणे करतात. यामुळे वरदान प्राप्त असलेली एकात्मता त्यातून दिसून येते. फेडरलच्या पुढाऱ्यांना गरज आहे की त्यांनी लोकांसोबतचे आपले कार्य संबंध अधिक सलोख्याचे करावे, व ते जे म्हणतात त्याच्याशी त्यांचा संबंध ठेवावा व त्यांनी अनेकांना आपल्या धोरणाचे पारदर्शक स्पष्टीकरण द्यावे व एक राजकीय नेतृत्व म्हणून एकस्वतंत्र संस्था म्हणून व वस्तुनिष्ठ धोरणांची अंमलबजावणी करणारी संस्था म्हणून दीर्घकाळात अर्थव्यवस्थेचे हित लक्षात घेत कार्य करणारी संस्था म्हणून तिने आपली ओळख लोकांना द्यावी. भूतकाळात फेडरलद्वारा झालेल्या चुका भविष्यात संशया शिवायही घडू देणार नाही याची त्यांनी काळजी घ्यावी. नंतर जेरीम पॉल ने स्पष्ट केले की त्यांच्याद्वारे भविष्यात कोणतीही चूक होणार नाही व घडू देणार नाही जी त्यांच्या चारित्र्याशी व एकात्मतेशी संबंधीत असेल.

संदर्भ: Bernanke, Ben S. (2022). *"21st century monetary policy: the federal reserve from the great inflation to COVID-19"*, W.W. Norton & Company.

ग्रंथ परिचय

भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे: सिंहावलोकन आर्थिक बदलांचे

संपादक - दि. व्यं. जहागिरदार

प्रकाशक- कौटील्य ज्ञान प्रबोधिनी संचालित सेंटर फॉर एकॉनोमिक अँड सोशल स्टडीज, अमरावती

डॉ. वनिता चोरे
प्राध्यापक
कै.ना.देशमुख महाविद्यालय, चांदूर बाजार

"भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे: सिंहावलोकन आर्थिक बदलांचे" हे डॉ. दि. व्यं. जहागिरदारांनी संपादित केलेले पुस्तक आहे. भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना अमरावती येथील 'कौटील्य ज्ञान प्रबोधनीच्या' नियमित उपक्रमांमध्ये, भारतीय अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्योत्तर 75 वर्षातील आर्थिक बदलांचा समष्टी अर्थशास्त्रीय विश्लेषणात्मक आढावा घेणारे हे पुस्तक डॉ दि. व्यं. जहागिरदार यांनी 25 तज्ज्ञ लेखकांच्या लेखांना संपादित करून प्रकाशित केले आहे; त्याबद्दल सर्वप्रथम संपादक व सर्व लेखकांचे मनस्वी अभिनंदन करते. विशेष म्हणजे हे पुस्तक संपादकांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी स्वातंत्र्यविरांना समर्पित केले आहे. संपादकीय मनोगतामधून, पुस्तकांची मुख्य वैशिष्ट्य विषद करतांना काही विशेष बाबीं नोंदाविल्या आहेत. विशेष म्हणजे, हे पुस्तक भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंचे संशोधनात्मक विश्लेषण करणारे असले तरीही; आर्थिक घडामोडी जाणून घेण्याची आवड असणाऱ्या सर्वसामान्य वाचकांकरिता देखील ते उपयुक्त ठरेल अशी सुबोध मांडणी करून सदर ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले आहे.

पुस्तकाची मुखपृष्ठ रचना ही त्याच्या शीर्षकाला समर्पक असून; 332 पानांच्या या पुस्तकात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या पैलू व समस्यांचे विश्लेषण करणारे एकूण 25 लेख समाविष्ट असून शेवटी लेखकांची सूची दिलेली आहे. महाराष्ट्र व भारतातील प्रसिद्ध अभ्यासकांच्या 14 लेखांचा पुस्तकात समावेश असून त्यामध्ये तीन विविध विद्यापीठाच्या कुलगुरूंचे लेखही आहे. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. जे. एफ. पाटील आणि इतर जेष्ठ अभ्यासक व नवोदित अभ्यासकांच्या लेखांचे समष्टी दृष्टीकोणातून कृषी क्षेत्र, सेवाक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व परराष्ट्र धोरणासह अर्थव्यवस्थेचे इतरही आयाम असलेले लेखांचे हे उत्तम संग्रहण आहे. भारतीय

अर्थव्यवस्थेच्या स्वातंत्र्योत्तर 75 वर्षातील लेखाजोखा मांडत असतांनाच अनेक लेखकांनी स्वातंत्र्यपूर्व काळाचाही थोडक्यात आढावा घेतलेला आहे. प्रत्येक लेखाच्या मागे संदर्भसूची प्रकाशित केली आहे.

एकूण 25 लेखांपैकी 2 लेखांमध्ये कृषीक्षेत्राचा आढावा असून वसंतराव जुगळे व अशोकराव चौसाळकर यांनी अनुक्रमे कृषी क्षेत्रापुढील उत्पादन वाढीची आव्हाने, समस्या व बदलत्या कृषी विकासाच्या व्यूहरचनेसह उपायांचा परामर्श घेतला आहे. चौसाळकरांनी भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळींचा आढावा घेऊन ग्रामीण भारताचे, शहरी इंडियाद्वारे होणारे शोषण व आर्थिक सुधारणा अंतर्गत चळवळींचा उहापोह केलेला आहे.

राजेश परचुरे व प्रणय राज यांनी भारताच्या समग्रलक्षी अर्थव्यवस्थेचा 1990-2020 च्या कालखंडातील तेजी मंदीच्या चक्रांचा आलेखासह मागोवा घेत, उदारीकरणानंतर भारतातील समग्रलक्षी आर्थिक घटकांतील बदलांच्या योग्य परिणामाकरिता सुयोग्य प्रयत्नांची जोड आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे.

आर्थिक सुधारणा अंतर्गत सुषमा देशमुख, ज्योती ढोमणे, आर.बी.भांडवलकर, लीला कुळकर्णी, आश्लेषा कुलकर्णी यांनी सेवाक्षेत्रातील बदलांचा आढावा घेतला आहे. भांडवलकरांनी ऊर्जेचे बदलते स्त्रोत, पर्यायी शोध व वीज बचतींचे महत्त्व स्पष्ट केले आहे. बँकिंग क्षेत्रातील अमृत महोत्सवी वाटचालीमध्ये स्वातंत्रपूर्व बँकिंग क्षेत्राची व्यवस्था, राष्ट्रीयीकरण, बँकेचा विस्तार वर्तमान व भविष्यातील बँकेचे स्वरूप कसे असावे याचे विश्लेषण केले आहे.

शैलेंद्र देवळाणकर यांनी भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा विस्तृत स्वरूपात आढावा घेऊन भारतीय अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्व विशद केले आहे. वैशाली देशमुख यांनी संघराज्य शासनप्रणाली, वित्त आयोगाची स्थापना, त्यानुसार केंद्र व राज्य सरकारकडे प्राप्त उत्पन्न व संघीय वित्ताच्या समस्यांचे विश्लेषण केले आहे. रामदास माहोरे व समित माहोरे यांनी विविध निर्देशांकाद्वारे भिन्न क्षेत्रातील भारतातील प्रादेशिक विषमतेचे स्पष्टीकरण केले आहे. जयराम गायकवाड यांनी नागरीकारानातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे विस्तृत विवेचन केले आहे.

ज. फा. पाटील यांनी आपल्या लेखात स्वातंत्र्योत्तर 75 वर्षातील अर्थसंकल्पांचा आढावा घेत भारताची अर्थव्यवस्था विषमतेच्या चक्रव्युहात अडकल्याचे स्पष्ट केले आहे. धीरज कदम यांनी प्रामुख्याने भारतातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर

निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेचे विविध अंगप्रत्यांगाने सार व मीमांसा केली आहे. भारतातील वाढत्या विषमतेचे भयावह स्वरूप आकडेवारी व आलेखांसह स्पष्ट करून या ज्वलंत समस्येचे चित्रण आपल्या लेखांमधून केले आहे. नवोदित लेखकांमधील हा अत्यंत उत्कृष्ट लेख असल्याचे जाणवते.

आर्थिक विषमतेचे मुख्य कारण म्हणजे रोजगार स्थिती यावर गुरुवर्य डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी ‘भारतातील रोजगार: स्थिती व उपाय’ या लेखांमध्ये सैद्धांतिक स्पष्टीकरणासह औद्योगिकक्रांती पासूनच भांडवलदारांचे प्राबल्य त्यामधून निर्माण झालेले श्रमिकांचे तत्त्वज्ञान व आर्थिक सुधारणानंतर वाढत गेलेला रोजगार व बेरोजगार यांचे अत्यंत मार्मिक लेखन करून उपाययोजना सुचविल्या आहेत. जेवढी बेरोजगारी जास्त तेवढ्या आर्थिक समस्यांना अनुसरून शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक समस्या निर्माण होणारच, विषमतेला कारणीभूत सर्वच घटकांचा विचार पुस्तकामध्ये लेखाद्वारे स्पष्ट होत आहे. तेव्हा शिक्षणामधून समृद्धीकडे वाटचाल व त्याकरिता आवश्यक शैक्षणिक धोरण याचा परामर्श डॉ. राजश्री रायभोग यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या निमित्ताने या लेखात गुरूकुल पद्धती ते राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 पर्यंतच्या धोरणांचा आढावा घेतला आहे. साधारणतः अजून पर्यंत 2020 पर्यंतच्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणीची प्रक्रियाच सुरू झालेली असल्यामुळे त्यांनी त्यावर भाष्य केलेले नसावे.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या विविध आयामांना निरनिराळया लेखांमधून विषयाचे विस्तृत अभ्यासपूर्ण विश्लेषण विशेषत्वाने उल्लेख करावे लागेल असे लेख म्हणजे दि.व्य. जहागीरदार व मुक्ता जहागिरदार यांचा ‘मागोवा विकासात्मक वाटचालीचा’ समाजाच्या विकासाच्या विचाराकरीता सामाजिक कल्याण व त्याच्या अटी नियोजनबद्ध विकासाद्वारे अर्थव्यवस्थेचा विकासाची अपेक्षा त्यांनी वर्तवली आहे. याला अनुसरून अतिशय समर्पक अशा मौद्रिक धोरणाची उत्क्रांती व स्वतंत्र्यानंतर वर्तमान काळातील मौद्रिक घटना मधली भाववाढ यांचे नियंत्रण असे महत्त्वपूर्ण बाबी डॉ. विनायक देशपांडे यांनी आपल्या लेखातून स्पष्ट केले आहे.

पुस्तकांचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे अर्थव्यवस्थेची आर्थिक सुधारणानंतर वर्तमान काळातील महत्त्वपूर्ण आयाम असलेले लेख आहे. डॉ. अंजली कुळकर्णी यांच्या ‘बौद्धिक संपदा व भारत’ या संदर्भातील हक्क व त्याला अनुसरून असणाऱ्या कायद्यांचे विश्लेषण अत्यंत सोप्या व सरळ शैलीत केले असून वाचकांकरीता ही पर्वणीच

आहे. डॉ. अनंत बा. मराठे यांचा 'क्रिप्टोकरन्सी समजून घेताना', डॉ. कुमुदिनी जोगी, यांनी आत्मनिर्भर भारत योजनेचे प्रारूप स्पष्ट केले व मंजुषा मुसमाडे यांनी आर्थिक विकास प्रक्रियेतील विकासाचे महत्त्व विशद करताना अमृतमहोत्सवी भारतीय अर्थव्यवस्थेमधील नव-उद्योगांची दिशा या लेखांमध्ये धोरण बदलांच्या अपेक्षेसह मानवी भांडवलांचे महत्त्व स्पष्ट करून शासनाला केलेल्या अत्यंत उपयुक्त मार्गदर्शक सूचना या लेखांमध्ये आहे.

समृद्ध शैली मध्ये ग्रंथ वाचकांच्या हातात सादर करतांना खरोखरच संपादक डॉ. जहागिरदार सरांनी लेखकांना दिलेली साद व लेखकांनी लेवढ्याच समर्थपणे प्रतिसाद देवून भारताच्या आर्थिक बदलांचे चित्रण केले; केवळ भारतामधीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील विकासाचे प्रारूप, चिरकालीन विकास, तुलनात्मक चित्रण; धनश्री महाजन, मृणालिनी फडणवीस, प्रशांत हरमकर, विजया कुट्टी यांनी केले आहे. अत्यंत श्रेष्ठ अशा अर्थशास्त्रातील तज्ज्ञ, जेष्ठ अशा लेखकांसोबत प्रशांत हरमकर यांनी देखील आपल्या लेखाची मांडणी समर्पक पणे केलेली आहे. त्यांचे विशेष अभिनंदन!

भारताच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 75 वर्षाचा आढावा घेऊन ग्रंथाची निर्मिती करण्याचे अत्यंत कठीण कार्य संपादक डॉ. जहागिरदार सरांनी पार पाडले; त्यांना सादर प्रणाम! लेखकांनी समग्रलक्षी दृष्टिकोणातून केलेले लिखाण, विकास प्रक्रियेतील अडथळे व विसंगती, अर्थव्यवस्थेच्या व्यापक विषयांचा आढावा घेत असताना नवीन आयाम देण्याचे कार्य पुस्तकाने केले आहे. अर्थशास्त्र मानव्य विद्याशाखा, समाजशास्त्र व इतर अभ्यासकांना नव संशोधकांना, सामान्य वाचकांना अत्यंत उपयुक्त असे संदर्भ यामधून मिळेल याची खात्री आहे. पुस्तकाच्या शीर्षकाप्रमाणे, भारतातील आर्थिक बदलांचे अतिशय सजग असे सिंहावलोकन या पुस्तकात करण्यात आले आहे, हेच खरे या पुस्तकाचे यश आहे. हे पुस्तक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयुक्त ठरेल पुनश्च असे संदर्भ ग्रंथ प्रसिद्ध करण्याकरिता कौटिल्य ज्ञान प्रबोधनीला सुयश चिंतीते व शुभेच्छा देते.

****